CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३५० | पाने १२ | किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



विद्यार्थी उद्याचा नव्हे, तर आजचा नागरिक आहे. कारण तो समाजाशी जोडलेला आहे आणि त्यासाठी समाज परिवर्तनात त्याचे योगदान आवश्यक आहे. त्याने समाज परिवर्तनात साथ देणे आवश्यक आहे.

**- मदनदास देवी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# १७ अल्पवयीन मुलांसह १९ जणांना ठेवले ओलीस

## पवईत थरार, आरोपी रोहित आर्याचे एन्काऊंटर

**◆ मुंबई, ३० ऑक्टोबर**

**पवईतीलल एका स्टुडिओमध्ये ऑडिशनसाठी आलेल्या १७ मुलांसह १९ जणांना एका माथेफिरुनं ओलीस ठेवल्यानं मोठी खळबळ उडाली आणि तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. ही घटना पवई येथील आरए स्टुडिओमध्ये घडली. मात्र, मुंबई पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रोहित आर्या नामक ओलीस ठेवणारा व्यक्ती ठार झाला. गुरुवारी दुपारी सुरु झालेला हा थरार सायंकाळी संपला.**




रोहितने याच आरए स्टुडिओमध्ये मुलांना ओलीस ठेवले होते

### कोण होता रोहित आर्या?



पुण्याचा रहिवाशी असलेला रोहित आर्या प्रोजेक्ट लेट्स चेंज या संस्थेचा संस्थापक व संचालक होता. २०१३ मध्ये गुजरातमध्ये त्यांनी स्वच्छता मॉनिटर हा उपक्रम सुरू केला होता, तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी याबाबत त्याचं कौतुक केलं होतं. प्रोजेक्ट लेट्स चेंज ही स्वयंसेवी संस्था (एनजीओ) आहे जी शाळांमध्ये स्वच्छता जागृती आणि मुलांना स्वच्छता दूत बनवण्यावर काम करते. जी शाळांमध्ये स्वच्छता जागृती आणि मुलांना स्वच्छता दूत बनवण्यावर काम करते. तसेच ''माझी शाळा, सुंदर शाळा'' या प्रकल्पाचे डिझाईनही त्यानेच केल्याचा दावा त्याचा आहे. पण त्याची दखल घेतली नसल्याने त्याने सरकारच्या विरोधात देखील मागीलवर्षी आंदोलन केले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईच्या पवई परिसरात असलेल्या एका इमारतीच्या तळमजल्यावरील आरए स्टुडिओमध्ये चित्रपटाच्या ऑडिशनसाठी सुमारे १०० मुले जमली होती. याच दरम्यान रोहित आर्य नावाच्या एका व्यक्तीने १७ अल्पवयीन मुलांसह १९ जणांना ओलीस ठेवले. त्यांना एका खोलीत डांबून ठेवले होते. पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आरोपीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मुलांचे पालक आणि इतर लोकही घटनास्थळी जमा झाले होते. सुदैवाने, पोलिसांनी अत्यंत शिताफीने स्टुडिओमध्ये आत प्रवेश केला. मात्र, आरोपी आर्यने पोलिसांवर एअरगनने गोळ्या झाडल्या. त्याला प्रत्युत्तर देताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आर्या गंभीर जखमी झाला. त्याला तातडीणे रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. आर्याला जखमी अवस्थेत ताब्यात घेतल्यानंतर सर्व बंधकांना सुखरुप सोडविले.

**तर मी मुलांना आग लावून देईन**

मुलांना ओलीस ठेवल्यानंतर आरोपीने व्हिडिओ मेसेज प्रसारीत करीत (पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सरकारकडून समिती स्थापन

**शासनाने काढला अध्यादेश | प्रवीण परदेशी यांच्याकडे अध्यक्षपद | सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश**

**◆ मुंबई, ३० ऑक्टोबर**

कर्जमाफीचा निर्णय घेवून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी प्रहार संघटनेचे माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात नागपुरातील जामठा परिसरात आणि नागपूर-वर्धा महामार्गावर दोन दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडू यांना मुंबईत बैठकीसाठी बोलावले. गुरुवारी त्यांच्यासोबत चर्चा सुरू असताना राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचा अध्यादेश काढला.

समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्र्यांचे प्रधान आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्याकडे देण्यात आले असून, सहा महिन्यांत समितीला कर्जमाफिसंदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा निर्णय घेताना शेवटच्या घटकातील एकही शेतकरी सुटू नये, याची खबरदारी घेण्यासाठी अहवाल तयार करण्याची जबाबदारी समितीकडे आहे.

कर्जमाफीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या बैठकांना बच्चू कडू यांना निमंत्रित करण्यात येईल. त्यांच्या सर्व सूचना आणि प्रस्तावांचा आग्रहपूर्वक समावेश केला जाईल. या समितीचा अहवाल सर्वांसाठी खुला राहील. त्यासोबतच येत्या खरीप हंगामासाठी कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्ज देण्यात येणार असल्याचे अध्यादेशात नमूद आहे.

**शेतकऱ्यांचे जीवनमान बदलण्यासाठी सूचना करणार**

ही समिती शेती क्षेत्रात आणि अनेक कर्जमाफी योजना असूनही कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तनकारी बदल आणण्यासाठी अभ्यास करेल आणि सुधारणा सुचवेल. या समितीमध्ये महसूल, वित्त, कृषी आणि सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र आणि माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. समिती गरजेनुसार इतर विभागातील तज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांना आमंत्रित करू शकेल. *(वृत्तसंस्था)*

### मुंबईत मुख्यमंत्री फडणवीस-बच्चू कडू यांच्यात चर्चा

बुधवारच्या आंदोलनानंतर बच्चू कडू सरकारशी चर्चेसाठी मुंबईला रवाना झाले. गुरुवारी रात्री बच्चू कडू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात सह्याद्री अतिथीगृहात चर्चा झाली. या प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.



गुरुवारी मनोज जरांगे पाटील आणि बच्चू कडू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे जरांगे यांनी सांगितले

## महत्त्वाचे

### ट्रम्प-जिनपिंग कराराचा बाजाराला फटका

**मुंबई** : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे जिनपिंग यांच्यात व्यापार करार होण्याच्या शक्यतेची बातमी देशांतर्गत बाजारांसाठी प्रतिकूल ठरली. बुधवारच्या तेजीनंतर गुरुवारी देशांतर्गत बाजारात मोठी घसरण झाली. दिवसभरातील कारभारादरम्यान विक्रीचा दबाव कायम राहिला. निर्देशांकात ५९३ अंकांची घसरण झाली आणि तो ८४,४०४ वर बंद झाला तसेच निफ्टी १७६ अंकांनी खाली येत २५,८८८वर स्थिरावरला. बाजाराची सुरुवातच घसरणीने झाली. बहुतांश क्षेत्रातील शेअर्स खाली आले होते. त्यात धातू, आयटी, ग्राहकी वस्तू आणि औषधी कंपन्यांचा समावेश होता. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मात्र बाजाराला मोठ्या घसरणीपासून सावरले.

### २४ नोव्हेंबरला शपथ घेणार नवे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने गुरुवारी अधिकृतपणे पुढील सरन्यायाधीशांचे नाव जाहीर केले. न्यायमूर्ती सूर्यकांत हे पुढील सरन्यायाधीश असतील. विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई २३ नोव्हेंबर रोजी निवृत्त होतील आणि न्या. सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी नवे सरन्यायाधीश म्हणून शपथ ग्रहण करतील, अशी घोषणा केंद्रीय कायदेमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केली. सरन्यायाधीश गवई यांनी पुढील सरन्यायाधीश म्हणून न्या. सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस केंद्र सरकारकडे केली होती. वरिष्ठतेच्या आधारावर ते सरन्यायाधीश होणार आहेत.

### टेंभुर्णीत आज ऊस परिषद

**टेंभुर्णी** : शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, गतवर्षी अनेक साखर कारखान्यांनी जाहीर केलेला ऊस दर दिला नाही, सध्याच्या गळीत हंगामासाठी पहिली उचल किती? या व आदी मागण्यांसाठी ना पक्षाचा, ना नेत्याचा, ना जातीचा; लढा फक्त शेतकरी एकजुटीचा या तत्त्वाखाली टेंभुर्णी येथे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ऊस परिषदेचे आयोजन शुक्रवार, दि.३१ रोजी केले असल्याची माहिती रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुहास पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यातील सुरू होणाऱ्या गाळप हंगामातील पहिली उचल जिल्ह्यातील एकाही कारखान्याने जाहीर केलेली नाही. कारखानदारांकडून एक ते दोन टक्के रिकव्हरी कमी दाखवली. जाते, उप पदार्थापासून मिळणाऱ्या उत्पन्नात शेतकऱ्याची वाटणी का नाही? साखरेला चाळीस रुपये हमीभाव करावा, साखरेचा दर उद्योगासाठी जास्तीचा व सामान्य नागरिकांसाठी कमी असावा, इथेनॉल निर्मितीवर जास्त भर देऊन परकीय चलन वाढवून जनतेच्या हिताचा निर्णय केंद्र सरकारने घ्यावा आणि संपूर्ण कर्जमाफी मिळावी या व इतर मागण्यांसाठी या ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती सहकारी साखर कारखाने ३४०० रुपये पहिली उचल जाहीर केली आहे. हीच पहिली उचल ऊस परिषदेमध्ये ठरवण्यासाठीच परिषदेचे आयोजन केले आहे.

# लाचखोर विस्तार अधिकाऱ्यास अटक

## बिलाची रक्कम बँक खात्यातून काढण्याची परवानगी देण्यासाठी घेतली २ हजाराची लाच

### गुरुवारी सायंकाळी जिल्हा परिषदेत झाली कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. ३० ऑक्टोबर -**

मंजूर बिलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यातून काढण्याची परवानगी देण्यासाठी २ हजारांची लाच स्विकारणाऱ्या दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहात अटक केली.



ही कारवाई गुरुवारी सायंकाळच्या सुमारास जिल्हा परिषद कार्यालयात करण्यात आली. संदीप सुधाकर खरबस (वय ५२, रा. जुळे सोला-पूर) असे अटक करण्यात आलेल्या विस्तार अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत येळेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे सिमेंट कॉक्रींट रोडचे काम करण्यात आले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर यातील तक्रारदार यांनी सदर कामाचे १ लाख रुपयांचे बिल मूल्यांकन प्रमाणपत्राप्रमाणे मिळण्यासाठीचा प्रस्ताव दक्षिण सोलापूर पंचायत समिती कार्यालयात सादर केला होता. त्याचा पाठपुरावा तक्रारदार करीत असताना सदर कामाचे मंजुर बिलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यातून काढण्याची परवानगी देण्यासाठी विस्तार अधिकारी संदीप खरबस यांनी २ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुरुवारी सायंकाळी जिल्हा परिषद आवारात सापळा लावला होता. त्यावेळी २ हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारताना विस्तार अधिकारी संदीप खरबस यास रंगेहात पकडण्यात आले. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपअधिक्षक प्रशांत चौगुले, पो. नि. शैलेश पवार, हवालदार अतुल घाडगे, स्वामीराव जाधव, सलीम मुल्ला यांनी केली.

### वडीलांनी काम केलेल्या पोलिस ठाण्यातच मुलावर गुन्हा दाखल...

लाचखोर विस्तार अधिकारी संदीप खरबस याचे वडील तत्कालीन पोलिस निरीक्षक सुधाकर खरबस यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक म्हणून काम करून सेवानिवृत्त झालेले आहेत. वडील काम केलेल्या पोलिस ठाण्यातच मुलावर लाचखोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संशयित दहशतवादी जुबेरच्या संपर्कातील सोलापूरचे दोघे एटीएसच्या ताब्यात

## सीडीआरवरून कारवाईने सोलापुरात खळबळ; इतरांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

पुणे एटीएस पथकाने सीडीआरवूरन सोलापूर शहरातील दोघां बंधूंना ताब्यात घेत पुण्याला नेले आहे. एकास पुण्यातून तर दुसऱ्या भावास बुधवारी शहरातून चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. हे दोघे बंधून उच्च शिक्षित असून ते चांगल्या ठिकाणी नोकरीस आहेत. ताब्यात घेतलेल्या दोघांपैकी एकजण सोलापूर महापालिकेच्या शाळेत शिक्षक व तर दुसरा आयटी कंपनीत चांगल्या पगारावर नौकरीस आहे.

अल कायदा या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असलेल्या जुबेर यांच्या हे दोघे संपर्कात होते, अशी माहिती एटीएस पथकाकडे असल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेतले आहे. सोलापुरातून ताब्या घेतलेला व्यक्ती हा जेलरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहे. एटीएसने सोलापुरात केलेल्या दहदतवादी विरोधी कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. अक्कलकोट तालुक्यातील वळसंग येथील एका शाळेत १७ ते १९ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान व्यक्तीमत्व विकास शिबिराचा कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमाचे आयोजन सोलापूर शहरातील एक वकील अध्यक्ष असलेल्या संघटनेने आयोजित केला होता. या शिबीरात विविध जिल्ह्यातील १६ ते २० वर्षे वयोगटातील काही ठरावीक मुलांनी हजेरी लावली होती. त्या कार्यक्रमास त्यांनी उच्च शिक्षित व आयटीमधील तज्ञ जुबेर हंगरगेकर (वय ३५, रा. कोढवा, पुणे मूळ रा. सोलापूर) यास बोलावले होते. १७ ते १९ ऑक्टोबर २०२५ रोजी वळसंग (ता. अक्कलकोट) येथील शाळेत त्याने हजेरी लावली होती. या शिबीरात कोणत्या प्रकारची माहिती किंवा प्रशिक्षण देण्यात आले याचा तपास सुरु आहे.




दहशतवादी संघटनेशी संपर्कात असल्याने एटीएस पथकाने पुणे रेल्वे स्थानकातून त्याला अटक केली आहे. त्याच्या संपर्कात असलेले सोलापूर शहरातील दोघां बंधूंना देखील एटीएस पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांची चौकशी सुरु आहे. मात्र सोलापुरात जुबेर यास कार्यक्रमासाठी बोलणाऱ्यांना त्या संस्थेचा अध्यक्ष व सचिव यांना देखील एटीएस पथकाकडून ताब्यात घेण्याची कारवाई होऊ शकते, असे सांगण्यात येत आहे. जुबेर हंगरगेकर उच्च शिक्षत आहे. त्याबरोबर त्या दिवशी कार्यक्रमासाठी संभाजी नगर आणि पुणे येथीलही एक व्यक्ती उपस्थित होता. त्यामुळे जेवढे जण संपर्कात आले त्या सर्वांना एटीएसचे पथकाकडून चौकशीसाठी ताब्यात घेतले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# ऑस्ट्रेलियाला हरवून भारताच्या वाघिणींची फायनलमध्ये एन्ट्री




**जेमिमा रॉड्रिग्ज**
**धावा : १२७**
**चेंडू : १३४**
**चौकार : १४**

**नवी मुंबई** : महिला वर्ल्ड कप २०२५ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीत टीम इंडियाने दमदार खेळ करत ऑस्ट्रेलियाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या शतकी भागीदारीमुळे भारताने ऑस्ट्रेलियाला पाच विकेट्सने पराभूत केले. या विजयासह टीम इंडियाने ऐतिहासिक कामगिरी करत अंतिम फेरी गाठली आहे. आता विजेतेपदासाठी भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी रविवारी, २ नोव्हेंबर रोजी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर होणार आहे. जेमिमा रॉड्रिग्जने उपांत्य फेरीत नाबाद १२७ धावांची अप्रतिम खेळी करत सर्वांना मंत्रमुग्ध केले. उजव्या हाताच्या या तडाखेबाज फलंदाजीनं १३४ चेंडूंत १४ चौकार लगावले आणि ९४.७८ चा स्ट्राईक रेट राखला. शेफाली वर्मा बाद झाल्यानंतर जेमिमा क्रीजवर आली आणि त्यानंतर सामना पूर्णपणे आपल्या नियंत्रणात घेतला. तिनं सुरुवातीपासूनच सिंगल-डबल्ससह जबरदस्त चौकारांची आतषबाजी केली. कर्णधार हरमनप्रीतसोबत तिनं शतकी भागीदारी केली. कौरच्या दमदार ८९ धावांच्या खेळीमुळे भारताने अवघ्या ९ चेंडू शिल्लक ठेवत विजय मिळवला आणि लक्ष्य सहज गाठले.

# निवडणूक प्रचार खर्चाच्या मर्यादेत वाढ

## १५ लाख खर्च करू शकतील मुंबई, पुणे, नागपूरचे उमेदवार

**◆ मुंबई, ३० ऑक्टोबर**

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांकडून प्रचारासाठी करण्यात येणाऱ्या खर्चाची मर्यादा आठ वर्षांनंतर वाढवली आहे. मुंबई, पुणे आणि नागपूरसाठी खर्चाची मर्यादा प्रती उमेदवार १५ लाखापर्यंत निश्चित करण्यात आली.

निवडणूक आयोगाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राज्यातील 'अ'वर्गात मोडणाऱ्या तीन महानगरपालिका मुंबई, पुणे आणि नागपूरसाठी प्रती उमेदवार प्रचारासाठी १५ लाखापर्यंत खर्च करू शकतील. 'ब' वर्गात मोडणाऱ्या महापालिकांसाठी १३ लाख तर 'क' वर्ग महापालिकांसाठी ११ लाखांची मर्यादा निश्चित करण्यात आली. वर्ग 'ड' मध्ये येणाऱ्या १९ महापालिकांसाठी निवडणूक लढवणारे उमेदवार ९ लाखापर्यंत खर्च करू शकतील.



'अ' वर्ग नगरपरिषदांसाठी नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवणारे उमेदवार प्रचारावर १५ लाख रुपये आणि सदस्य पाच लाखापर्यंत खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. याशिवाय 'ब' वर्ग नगरपरिषदांमध्ये नगराध्यक्षाची निवडणूक लढवणारे उमेदवार प्रचारावर ११.२५ लाख आणि सदस्य ३.५ लाखापर्यंत खर्च करू शकतील. 'क' वर्गात मोडणाऱ्या नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारासाठी ७.५ लाख आणि सदस्यपदाच्या उमेदवारासाठी २.५ लाख रुपये खर्चाची मर्यादा निश्चित आहे. *(वृत्तसंस्था)*

### नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला सहा लाखांपर्यंत मर्यादा

नगरपंचायतीसाठी थेट अध्यक्षपदाची निवडणूक लढवणारा उमेदवार सहा लाखापर्यंत तर सदस्यपदासाठी २.२५ लाखांपर्यंतचा खर्च प्रचारावर करता येईल. ७१ ते ७५ जागा असलेल्या नगरपंचायतीच्या निवडणुका लढवणारे उमेदवार प्रचारावर ९ लाखापर्यंत खर्च करू शकतील, तर पंचायत समिती सदस्याची निवडणूक लढवणारे सहा लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा असेल. ६१ ते ७० जागा असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा अनुक्रमे ७.५ लाख आणि ५.२५ लाख इतकी निश्चित केली आहे. ग्रामपंचायतीसाठी सरपंचाची निवडणूक लढवणारे ७५ हजार आणि सदस्याची निवडणूक प्रचारासाठी ४० हजार इतकी मर्यादा निश्चित करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### आयकर परतावा भरण्यास मुदतवाढ




**नवी दिल्ली** : आयकर परतावा भरण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. आयकर विभागाने तशी नोटीस काढून सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर जारी केली आहे. यात ऑडिट केलेले आयकर रिटर्न दाखल करण्याची अंतिम तारीख १० डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे ज्यांना कर ऑडिट करणे बंधनकारक आहे आणि ज्यांचे कर ऑडिट बॉकी आहे, अशा करदात्यांना आता दंडाशिवाय आपले रिटर्न दाखल करण्यासाठी आणखी वेळ मिळाला आहे. याआधी ही तारीख ३० सप्टेंबर होती. नंतर ती ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली होती. सीए संस्था आणि कर व्यावसायिकांच्या मागणीनंतर आयकर विभागाने पुन्हा याला मुदतवाढ दिली आहे.

### ड्रग्ज माफियांविरोधातील कारवाईत ४ पोलिसांसह ६४ जणांचा मृत्यू

**रिओ दि जानेरो** : ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथील पोलिसांनी ड्रग्ज माफियांविरोधात राबविलेल्या मोहिमेत ६४ जणांचा मृत्यू झाला, त्यात चार पोलिसांचा समावेश आहे. कारवाईसाठी आलेल्या पोलिसांच्या ताफ्यावर ड्रग्ज माफिया आणि तस्करांनी गोळीबार केला. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, रिओ दि जानेरोच्या उत्तरेकडील भागात असलेल्या अलेमाओ आणि पेन्हा येथे मंगळवारी सकाळी सुमारे २५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांनी ड्रग्ज माफिया आणि तस्करांवर कारवाई केली. पोलिस पथके पुढे जात असताना, रेड कमांड टोळीच्या सदस्यांनी गोळीबार सुरू केला. पोलिसांना अडथळा आणण्यासाठी ड्रोनमधून बॉम्ब टाकले. पोलिसांनी जोरदार प्रत्युत्तर दिले, या चकमकीत ६४ जणांचा मृत्यू झाला, त्यात चार पोलिसांचा समावेश आहे. या कारवाईत आतापर्यंत ८० पेक्षा अधिक तस्करांना अटक करण्यात आली, तर २०० किलोपेक्षा जास्त ड्रग्ज, अनेक रायफल आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली.

### ठाण्यातील सदनिकेमध्ये आग, एकाचा मृत्यू


**ठाणे** : ठाणे शहरातील एका चार मजली सदनिकेमध्ये आग लागल्यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. वागळे इस्टेट परिसरातील प्रथमेश अपार्टमेंटच्या चौथ्या मजल्यावर असलेल्या फ्लॅटमध्ये बुधवारी रात्री ९.४५ वाजता आग लागल्याची माहिती मिळाली, असे ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासीन तडवी यांनी सांगितले. अग्निशमन दलाला माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेतली आणि रात्री १०.१० वाजता आग विझवण्यात आली, असे त्यांनी सांगितले. या आगीत सदनिका मालक सचिन निकम (४५) गंभीर भाजले होते. त्यांना कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यांना दाखल केल्यानंतर मृत घोषित करण्यात आले. आगीत सदनिकामधील विजेचे वायरिंग, छतावरील पंखे, गाद्या आणि इतर घरगुती वस्तूंचे नुकसान झाले आहे.

### जम्मू-काश्मीर विधानसभेत आमदारांत हाणामारी

**श्रीनगर** : गुरुवारी जम्मू आणि काश्मीर विधानसभेत विरोधी पक्षाच्या भाजपा आमदारांची एनसी आमदारांशी हाणामारी झाली. सभागृहाचे कामकाज सुरू होताच भाजपा नेते उभे राहिले आणि त्यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची मागणी केली. त्यांनी जम्मूच्या पूरग्रस्त भागांवर अर्धा तास चर्चा करण्याची मागणी केली. तथापि, सभापती अब्दुल रहीम राथेर यांनी भाजपा आमदारांना प्रश्नोत्तराचा तास सुरू ठेवण्याची विनंती केली.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८४,४०४.४६ (-५९२.६७) |
| निफ्टी | २५,८७७.८५ (-१७६.०५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२०,९०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,४९,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.६ | २३.0 |
| अमरावती | २९.८ | २१.१ |
| भंडारा | २८.० | २०.० |
| बुलडाणा | २९.६ | २१.२ |
| चंद्रपूर | २९.२ | २२.६ |
| गडचिरोली | २८.० | २२.६ |
| गोंदिया | २५.४ | २२.० |
| नागपूर | २६.४ | २३.४ |
| वर्धा | २९.० | २३.० |
| वाशीम | -.- | २१.६ |
| यवतमाळ | २८.० | २२.० |

# दारू पिऊन ड्युटीवर येणाऱ्यांची खैर नाही

## एसटी महामंडळाची व्यापक तपासणी मोहीम ● कठोर कारवाईचा परिवहन मंत्र्यांचा निर्देश



◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**

कर्तव्यावर असताना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा चालक, वाहक किंवा अन्य कर्मचारी मद्यपान करून असल्यास आता त्याची खैर नाही. अशा कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहे.

एसटी ही महाराष्ट्राची 'लोकवाहिनी'आहे. दररोज लाखो सर्वसामान्य नागरिक एसटीच्या प्रवासी सेवेचा लाभ घेतात. त्यांना सुरक्षित आणि सौजन्यशील सेवा देणे हे एसटीच्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. परंतु काही कर्मचारी कर्तव्यावर असताना मद्यपान करून गैरवर्तन करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

त्या अनुषंगाने एसटीच्या सुरक्षा व दक्षता खात्याला तातडीने मोहीम राबवण्याच्या सुचना करण्यात आल्या होत्या. त्यातून अशा मद्यपी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार राज्यभरात एकाच वेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता कडक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या तपासणी मोहिमेत सापडलेल्या मद्यपी कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

**मोहीम कशी राबवली**

मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या निर्देशानुसार एसटी महामंडळाच्या सुरक्षा आणि दक्षता खात्याने २८ ऑक्टोबरला राज्यभरातील सर्व विभागांमध्ये कार्यरत असलेले चालक, वाहक आणि यांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मद्यपान तपासणीची एक मोठी मोहीम राबविली. या अचानक केलेल्या तपासणी मोहिमेमुळे महामंडळात एकच खळबळ उडाली. या कारवाईत संशयास्पद एकूण ७१९ चालक, ५२४ वाहक आणि ४५८ यांत्रिक कर्मचारी अशा सुमारे १७०१ कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत दोषी आढळलेल्या ७ कर्मचाऱ्यांवर दोषारोप निश्चित करण्यात आले आहेत.

◀(तभा वृत्तसेवा)

### भंडाऱ्यात आढळला मद्यपी कर्मचारी

धुळे विभागाच्या तपासणीत एक यांत्रिक कर्मचारी, एक स्वच्छक आणि एक चालक मद्यपान करताना आढळले.नाशिक येथे तपासणी केलेल्यांमध्ये एक चालक दोषी आढळला. परभणी आणि भंडारा विभागांत प्रत्येकी एक यांत्रिक कर्मचारी मद्याच्या अंमलाखाली काम करताना आढळला. नांदेड विभागामध्ये तपासणीत एक वाहक मद्यपान केलेला आढळला. ■

# रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील राऊत यांचे निधन

◆ **पुणे, ३० ऑक्टोबर**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आणि सिंहगड भागाचे संघचालक सुनील मधुकरराव राऊत यांचे गुरुवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई आणि नात असा मोठा आप्तपरिवार आहे. १९६४ पासून संघाचे निष्ठावंत स्वयंसेवक असलेले सुनीलजी राऊत यांनी आपल्या जीवनातील बहुतांश काळ संघकार्याला समर्पित केला होता. व्यवसायाने इलेक्ट्रिकल इंजिनीयर असलेल्या राऊत यांनी सुरुवातीला काही काळ नोकरी केली, त्यानंतर उद्योग क्षेत्रात नाव कमावले. परदेशात असतानाही त्यांनी संघाच्या विचारांशी नाळ जोडलेली ठेवली. संघाचे तृतीय वर्ष पूर्ण केल्यानंतर त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात तीन वर्षे प्रचारक म्हणून पूर्णवेळ कार्य केले होते.

संघाच्या सिंहगड भागाचे संघचालक म्हणून ते जबाबदारी सांभाळत होते. तसेच त्यांनी कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान या सामाजिक संस्थांचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.

◀(वृत्तसंस्था)

# क्षयरोगमुक्त मोहिमेत गोंदियाची आघाडी

◆ **गोंदिया, ३० ऑक्टोबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणानुसार २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठरविण्यात आले. पंतप्रधान क्षयरोगमुक्त भारत मोहिमेंतर्गत गोंदिया जिल्ह्याने २०२४-२५ या वर्षात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. २०२५-२६ या वर्षातही जिल्ह्याने केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या १० बिंदूवर काम करण्यास सुरुवात केली असून, यावर्षी सुद्धा राज्यात अव्वल स्थान टिकवून ठेवण्याकरिता आरोग्य विभाग कामाला लागल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी दिली.



कार्यक्रमाला उपस्थित डॉ. गोल्हार, डॉ. विनोद चव्हाण व अन्य

डॉ. गोल्हार यांनी प्रेस क्लबच्यावतीने आयोजित मिट द प्रेस या कार्यक्रमात सांगितले की, आधीच्या तुलनेत आमच्याकडे आता तपासणी प्रयोगशाळा व निक्षय मित्रांचा मिळत असलेल्या उत्कृष्ट सहभागामुळेच जिल्ह्याचे नाव राज्यपातळीवर आले आहे. योग्य औषधोपचार, समतोल आहार घेतल्यास या रोगावर सहज मात करता येते. क्षयरोगाने बाधित रुग्ण दगावू नये म्हणून शासनातर्फे जिल्ह्यात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याने जिल्ह्याने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला. जिल्ह्यात २१ प्रयोगशाळांतून तपासणी केली जात असून, डिसेंबरअखेर ४९ हजार ५४७ तपासणीचे लक्ष्यांक देण्यात आले होते, जे सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करीत ६७ हजार ८१९ तपासण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे १०० दिवस कार्यक्रमांतर्गत ३२० रुग्ण शोधण्याचे उदिष्ठ असताना ७२० नवीन रुग्णांचा शोध घेण्यात आले.

◀(तभा वृत्तसेवा)

# रा. सू. गवईंच्या स्मारकाचे थाटात लोकार्पण

### शासनाकडून गौरव

◆ **अमरावती, ३० ऑक्टोबर**

रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे कार्य मार्गदर्शक ठरावे तसेच त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, यासाठी स्मारक आणि सर्वकष वाटचालीचा दस्तावेज तयार करण्यासाठी संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही प्रकल्पांतून त्यांच्या कार्याचा गौरव राज्य शासनाने केला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

दिवंगत नेते रा. सू. गवई यांच्या स्मारकाचे गुरुवारी दुपारी उद्घाटन केल्यानंतर स्मारकस्थळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते स्मारकाचे लोकार्पण झाले. यावेळी कमलताई गवई, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, रा. सू. गवई यांच्या अंगी विनयशिलता, नम्रता आणि शालिनता होती. त्यांनी चळवळ जीवंत ठेवण्याचे काम केले. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, येत्या कालावधीत रा. सू. गवई यांचे जन्मशताब्दी वर्ष येणार आहे. यानिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात यावे. आमदार, खासदार, राज्यपाल म्हणून त्यांची राजकीय वाटचाल दीर्घकाळ राहिली. उत्कृष्ट वक्तृवाने नेतृत्व आणि कर्तृत्व घडविले असल्याचे पवार म्हणाले. स्मारकाच्या कामात योगदान देणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. स्मारकाच्या दर्शनी भागावरील दादासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी स्मारकाची पाहणी केली. कार्यक्रमात दादासाहेब गवई यांच्या जीवनावरील चित्रफित दाखविण्यात आली. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले.

◀(तभा वृत्तसेवा)



रा. सू. गवईंच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी उपस्थित सरन्यायाधीश. गवई, मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार व अन्य

### स्मारक विद्यार्थांसाठी उपयुक्त ठरेल : न्या. गवई

न्या. गवई म्हणाले, रा. सू. गवई यांचे स्मारक पूर्ण होणे ही एक स्वप्नपूर्ती आहे. स्मारकाची पायाभरणी ते उद्घाटन ही कामे गतीने करण्यात आली आहे. या वास्तूचा लाभ नागरिकांना होणार आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल, हा दृष्टिकोन ठेवून स्मारक उभारण्यात आले आहे. स्मारकात जीवनपट दर्शविताना कल्पकता ठेवली आहे. त्यामुळे स्मारक सर्वांग सुंदर झाले आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नुकताच झुडपी जंगलाचा प्रश्न सोडविण्यात आल आहे. ■

# दुचाकींच्या धडकेत राठोड दाम्पत्यासह तिघे ठार

◆ **मानोरा, ३० ऑक्टोबर**




मृत सदाशिव राठोड, सरला राठोड

तालुक्यातील गिर्डा गावचे निवासी आणि रोजगारानिमित्त मुंबईला वास्तव्याला असलेले राठोड दाम्पत्य दिवाळी सण आटोपून दुचाकीने मुंबईकडे जात असताना वाशीम-मालेगाव रस्त्यावर समोरून आलेल्या दुचाकीसोबत झालेल्या धडकेत ठार झाले. दुसऱ्या दुचाकीवरील युवकही ठार झाला. राठोड दाम्पत्याच्या अपघाती मृत्युमुळे गावात शोककळा पसरली आहे.

सदाशिव रामदास राठोड, त्यांची पत्नी सरला दिवाळी सणानिमित्त आपले गाव गिर्डा येथे मागील आठवड्यात आले होते. सदाशिव राठोड हे मुंबईत वाहन चालक म्हणून काम करीत असल्याने त्यांचे कुटुंबीय मागील अनेक वर्षांपासून मुंबईलाच राहायला होते. दिवाळीनिमित्त गावाकडे येताना रेल्वे आणि राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचे तिकीट मिळणे अवघड असल्याने व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचे तिकीट दर परवडणारे नसल्याने हे दाम्पत्य आपल्या दुचाकीने गावाकडे आले होते. दिवाळी आटोपून दुचाकीने मुंबईकडचा परतीचा प्रवास करताना गुरुवारी शेलूबाजार-मालेगाव मार्गावरील जऊळका रेल्वे गावाजवळ चुकीच्या मार्गाने दुचाकी घेऊन आलेल्या कृष्णा भोकरेसोबत समोरासमोर भीषण धडक झाल्याने हे दाम्पत्य जागीच ठार झाले, ष्णा भोकरे हा दुचाकी स्वारसुद्धा उपचारादरम्यान मरण पावल्याने अपघातातील मृतांची संख्या तीन झाली असून, भोकरे याच्या दुचाकीवर मागे बसलेला इसम गंभीर जखमी झाला.

◀(तभा वृत्तसेवा)

# रेल्वे पुलावरून क्रेन कोसळली, दोघांचा जागीच मृत्यू

**धार** : मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यातील पिथमपूर औद्योगिक क्षेत्रात गुरुवारी पिथमपूर सेक्टर ३ मधील बांधकामाधीन सागौर रेल्वे पुलावर काम करणारी क्रेन अचानक कोसळली. क्रेनने टाटा मॅजिक आणि पिकअप ट्रक पूर्णपणे दबला, त्यात दोन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी आहे. गुरुवारी सकाळी ९.३० च्या सुमारास, पिथमपूर सेक्टर ३ मधील बांधकामाधीन सागौर रेल्वे पुलाच्या दोन्ही टोकांवरून दोन क्रेन गर्डर उचलत होते. सागौर बाजूने एक क्रेन अचानक खाली पडली आणि ती जाणाऱ्या टाटा मॅजिक आणि पिकअप ट्रकवर आदळली. माहिती मिळताच जिल्हा प्रशासन आणि पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले. ट्रकमध्ये अडकलेल्या नागरिकांना रुग्णालयात पोहोचविले असता, डॉक्टरांनी दोघांना मृच घोषित केले, तर चार जणांवर उपचार सुरू आहे. ■

### १७ अल्पवयीन मुलांसह १९ जणांना ठेवले ओलीस

(पान १ वरून) ▸

मी रोहित आर्या आहे. मी आत्महत्या करण्याऐवजी काही मुलांना बंधक बनवले आहे. माझ्या फार मोठ्या मागण्या नाहीत. माझे काही प्रश्न आहेत. मला काही लोकांकडून उत्तरे हवी आहेत. मी कोणताही दहशतवादी नाही. माझी पैशांची मागणी नाही. मी एका नियोजनानुसार मुलांना बंधक बनवले आहे, असे धमकावले.


**'ए थर्सडे' चित्रपटाची पुनरावृत्ती**

२०२२ मध्ये अभिनेत्री यामी गौतमचा 'ए थर्सडे' नावाचा एक चित्रपट प्रदर्शित झाला होता. यावेळी यामी गौतमसोबतच मराठी अभिनेते अतुल कुलकर्णी, नेहा धुपिया आणि डिम्पल कपाडियासारखे दिग्गज कलाकार यात होते.

या चित्रपटाचे कथानक हे आजच्या घटनेशी मिळतेजुळते आहे. चित्रपटात एक नैना जयस्वाल (यामी गौतम) कुलाबासारख्या भागात काही लहान मुलांना आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी ओलीस ठेवते. ते का घडतं? कसं घडतं? तिच्या मागण्या काय असतात? ते पाहून हे खूप रंजक वाटले होते. पण, असाच प्रकार मुंबईतील पवईमध्ये गुरुवारी घडला आणि याचा थरार मुंबईकरांनी प्रत्यक्ष अनुभवला.

◀(तभा वृत्तसेवा)

# गोर बंजारा समाजाचा समृद्धी महामार्गावर भोग लावून रास्ता रोको



### एसटी आरक्षणाची मागणी

◆ **वाशीम, ३० ऑक्टोबर**

गोर बंजारा समाजाला एसटी दर्जाचे आरक्षण मिळावे, हैदराबाद गॅझेट लागू करून सेवा सवलती उपलब्ध करून देण्यात याव्या, या मागणीसाठी गोर बंजारा महाराष्ट्रभरातून समृद्धी महामार्गावर उतरून सद्गुरू सेवालाल अन याडी मरियामाला भोग लावून बंजारा आरक्षण कृती समितीच्या वतीने गुरुवारी मालेगाव पाईंटजवळ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात वाशीम जिल्ह्यासह अकोला, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली जिल्ह्यातील पाच हजारांवर आंदोलकांनी भाग घेतला होता.

पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांनी विंती आरदास बोलून संदेश चव्हाण, महंत संजय महाराज, जानू महाराज, प्रा. अनिल राठोडसह हजारो गोर बंजारा आंदोलकांनी यात सहभाग घेतला. सुरुवातीला पोलिस प्रशासनाने संदेश चव्हाण यांना वारंगी फाट्यावर दोन तास अडवून ठेवले.

हैदराबाद-अकोला महामार्गावर थांबलेले आंदोलक काही वेळातच समृद्धी महामार्गावर एकवटले व एक तास ठिय्या मांडून आंदोलन केले. यावेळी समृद्धी महामार्गावर पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांनी संबोधित केले.

नंतर नामा बंजारा, राजू रत्ने, अनिल चव्हाण, कांतीलाल नायक प्रा डॉ अनिल राठोड, प्रा संदेश चव्हाण यांनी संबोधित केले.

संदेश चव्हाण यांनी, प्रशासनाने गोर बंजारा समाजाच्या सहनशिलतेचा अंत पाहू नये, महिनाभरात ५५ महामोर्चे काढून शासन दखल घेत नाही म्हणून आम्हाला समृद्धी महामार्ग बंद पाडावा लागले. भविष्यात गोर बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणासाठी केंद्राकडे शिफारस न केल्यास रेल रोको, पोहरागड येथे साखळी उपोषण करू आणि हिवाळी अधिवेशनात नागपूरला लाखो गोरबंजारा उतरवू, असा इशारा दिला.

◀(तभा वृत्तसेवा)

# सुबहान खानने घेतले कठोर कलारीपयट्टूचे प्रशिक्षण

◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**



दैवी बंधुत्वाची कथा जिवंत करणारी 'गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय' ही मालिका आपल्या भावपूर्ण कथनशैली, भव्य पौराणिक सादरीकरण आणि प्रभावी अभिनयामुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे.या मालिकेत भगवान कार्तिकेयाची भूमिका साकारणारा अभिनेता सुबहान खान याने कार्तिकेयाच्या पात्राला न्याय देण्यासाठी गरजेची असलेली शारीरिक ताकद आणि योद्ध्याचे मनोबल दाखवण्यासाठी भारतातील सर्वात प्राचीन मार्शल आर्ट्सपैकी एक असलेल्या कलारीपयट्टूचे तीन महिन्यांचे कठोर प्रशिक्षण घेतले.

सुबहानसाठी ही भूमिका साकारणे म्हणजे फक्त एका दैवी व्यक्तिमत्त्वाचे रूप धारण करणे नव्हते, तर शरीर आणि मन या दोन्ही स्तरांवर संपूर्ण परिवर्तनाची प्रक्रिया होती. भगवान कार्तिकेयांच्या पराक्रम आणि सौंदर्याचे वास्तव दर्शन घडवण्यासाठी सुबहान यांनी प्रसिद्ध मार्शल आर्ट्स गुरू दीपक दास यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले. दीपक दास यांनी यापूर्वी टायगर श्रॉफ आणि क्रिती सेनन यांसारख्या बॉलिवूड कलाकारांनाही प्रशिक्षण दिले आहे. सुबहानचा प्रवास कॅमेऱ्यांपासून दूर अशा मास्टर दीपक दास यांच्या प्रशिक्षण केंद्रातील चटईवर सुरू झाला. यातील प्रत्येक हालचाल - ज्यात झपाट्याने मारलेली किक असो वा नाजूक, पण प्रभावी आसन - या सर्वांतून संतुलन, नियंत्रण आणि एकाग्रतेचे धडे त्यांना मिळाले. दक्षिण भारतीय परंपरेशी खोलवर जोडलेल्या या प्राचीन कलारीपयट्टू मार्शल आर्टद्वारे सुबहान यांनी केवळ आपली चपळता आणि शक्ती वाढवली नाही, तर दैवी योद्ध्याचे प्रतीक असलेली शिस्त आणि मानसिक शांतताही आत्मसात केली.

◀(वृत्तसंस्था)

# मैदानावर अपयशी ठरल्याने तेजस्वी झाले क्रिकेटपटू

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ३० ऑक्टोबर**




बिहारमध्ये महाआघाडीने राजदचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तसेच विद्यमान विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. लालूप्रसादांना यादवांना मोठा तेजप्रताप आणि लहान तेजस्वी अशी दोन मुलं. तेजस्वी यादवला आपला राजकीय उत्तराधिकारी करण्याची लालूप्रसादांची इच्छा होती, त्यातून त्यांच्या घरात वादही झाले, तेजप्रताप दुखावला गेला. पण लालूप्रसाद आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आणि तेजस्वीला त्यांनी आपला राजकीय वारस म्हणून प्रस्थापित केले. क्रिकेटच्या मैदानावर अपयशी ठरल्यामुळे तंजस्वी यादव यांना राजकारणात यावे लागेल.

शालेय जीवनापासूनच तेजस्वी यादव यांना क्रिकेटची आवड होती. शाळेच्या क्रिकेट संघाचे ते कर्णधार होते. अष्टपैलू खेळाडू म्हणून त्यांची ख्याती होती. दिल्लीच्या १५ वर्षाखालील क्रिकेट संघात तेजस्वी यादवचा समावेश झाला. विराट कोहली या त्यावेळी संघाचा कर्णधार होता. या संघाने १५ वर्षाखालील खेळाडूंचा राष्ट्रीय स्तरावरील अंतिम सामना जिंकला. या सामन्यात तेजस्वी यादवने ईशांत शर्मासोबत चांगली भागिदारी केली होती.



अंडर १७ आणि अंडर १९ क्रिकेट संघातही त्यांचा समावेश झाला. १९ वर्षाखालील राष्ट्रीय क्रिकेट संघात तेजस्वी यादवचा राखीव खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला.

तेजस्वी रणजी चषक स्पर्धा खेळले आहेत. मुश्ताक अली आणि विजय हजारे चषकात ते झारखंडतर्फे खेळले होते. २००८ ते २०१२ या काळात तेजस्वी यादव आयपीएलमध्ये दिल्ली डेयरडेव्हील संघाचा भाग होते. पण दिल्ली डेयरडेव्हीलतर्फे या चार वर्षात ते एकही सामना खेळू शकले नाहीत. मैदानावर खेळत असलेल्या खेळाडूंना पाणी पाजणे, एवढेच काम दिल्ली संघाचा खेळाडू म्हणून तेजस्वी यादवला करावे लागले, असे लालूप्रसाद यादवांनी याबाबत एकदा सांगितले होते.

क्रिकेटपटू म्हणून तेजस्वी यांना आपले करीअर बनवायचे होते, पण त्यात ते अपयशी ठरले. त्यामुळे त्यांना राजकारणात यावे लागले. ■

### दोन बहिणी डॉक्टर पण तेजस्वी केवळ नववी

तेजस्वी यादव सात बहिणी आणि दोन भावात सर्वात लहान. त्यांच्या दोन मोठ्या बहिणी डॉक्टर आणि एक इंजिनीयर असताना तेजस्वी यादव शिक्षणातही फारसे चमकू शकले नाहीत. नववीनंतर त्यांनी शाळा सोडून दिली. शिक्षण आणि क्रिकेटमध्ये चमकू न शकलेले तेजस्वी यादव राजकारणात मात्र बऱ्यापैकी यशस्वी झाले. बिहारचे उपमुख्यमंत्रिपद त्यांनी दोनदा भूषवले. यावेळी तिसऱ्यांदा तेजस्वी यादव राघोपूरमधून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात आहे. २०१५ मध्ये पहिल्यांदा त्यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. २०२० मध्ये दुसऱ्यांदा ते राघोपूरमधून विजयी झाले. ■

# लालूप्रसाद, राबडीदेवीही लढले होते राघोपूरमधून निवडणूक

◆ **नवी दिल्ली, ३० ऑक्टोबर**

राघोपूरमधून लालूप्रसाद यादव आणि राबडीदेवी यांनीही निवडणूक लढवली आहे. या मतदारसंघातून लालूप्रसाद दोनवेळा तर राबडी देवी तीन वेळा निवडणूक जिंकले. पहिल्यांदाच राघोपूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आले असताना नितीशकुमार यांच्या नेतृत्वातील महाआघाडीच्या सरकारमध्ये तेजस्वी यादव वयाच्या २६ व्या उपमुख्यमंत्री झाले.

१९ ऑगस्ट २०२४ ला दुसऱ्यांदा ते नितीशकुमार यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. २०२४ पर्यंत म्हणजे नितीशकुमार महाआघाडी सरकारचा राजीनामा देईपर्यंत ते उपमुख्यमंत्री होते. देशातील सर्वात कमी वयाचा उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता म्हणून तेजस्वी यादव यांच्या नावाची नोंद झाली. विशेष म्हणजे २०२० च्या विधानसभा निवडणुकीतही महाआघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून समोर केले होते. या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआने १२५ तर तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वातील महाआघाडीने ११० जागा जिंकल्या. महाआघाडीला बहुमतासाठी १२ जागा कमी पडल्या, तर रालोआला विधानसभेत काठावरचे बहुमत मिळाले.

तेजस्वी यादव यांच्यावरही भ्रष्टाचाराचे तसेच हत्येच्या प्रकरणात सहभागी असल्याचे अनेक आरोप झाले. आयआरसीटीसी घोटाळ्यात लालूप्रसाद आणि राबडीदेवी यांच्यासोबत आरोप निश्चित करण्यात आले आहेत. जमिनीच्या बदल्यात नोकरी प्रकरणातही त्यांच्यावर आरोपपत्र निश्चित होण्याची टांगती तलवार आहे.

◀(तभा वृत्तसेवा)

# सर्वांत भ्रष्ट कुटुंबातील दोन युवराज मला शिव्या देताहेत

## मोदींचा हल्लाबोल ● दोघेही हजारो कोटींच्या घोटाळ्यात जामिनावर

◆ **मुजफ्फरपूर, ३० ऑक्टोबर**

एक देशातील सर्वांत भ्रष्ट घराण्याचा युवराज आहे, तर दुसरा बिहारमधील सर्वात भ्रष्टाचारी घराण्याशी संबंधित आहे. या दोघांनी मिळून आता खोट्या आश्वासनांचे दुकान सुरू केले आहे. हे दोघेही मला भर-भरून शिव्या देत आहेत. मात्र, बिहारची जनता यांच्या जाळ्यात अडकणार नाही. बिहारने विकासाची गती पकडली आहे, अशा शब्दांत गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राजदचे तेजस्वी यादव यांच्यावर थेट हल्ला चढवला. ते बिहार विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मुजफ्फरपूर येथील मोतीपूर साखर कारखान्याच्या मैदानावर आयोजित सभेत बोलत होते.



मोदी पुढे म्हणाले, दोन्ही 'युवराज' हजारो कोटींच्या भ्रष्टाचार प्रकरणांत जामिनावर आहेत आणि जामिनावर असलेल्यांचा सन्मान होत नसतो. हे नामदार लोक कामगारांना शिव्या देऊनच दिवसाची सुरुवात करतात. मागास आणि दलित समाजाचा अपमान करणे हा ते त्यांचा जन्मसिद्ध अधिकार समजतात. एका चहावाला इथवर पोहोचला, हे त्यांना अजूनही पचत नाही.

पंतप्रधान म्हणाले, राजद आणि काँग्रेसचा संबंध तेल आणि पाण्यासारखा आहे. यांचे कदीच पटू शकत नाही.

बाहेरून एक दिसतात. पण आतून वेगवेगळे आहेत. त्यांचा हेतू केवळ सत्तेवर कब्जा करणे एवढाच आहे. एवढ्या एका लालसेपोटीच ते सोबत आहेत. जेणेकरून पुन्हा बिहार लुटता यावा.

यावेळी मोदींनी लालू प्रसाद यादवांवरही निशाणा साधला. ज्या बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण देश पूजतो, त्यांचा हे लोक अपमान करतात. बिहारमध्ये एनडीएला सर्वात मोठा विजय मिळणार असून राजद-काँग्रेस आघाडीला इतिहासातील सर्वात मोठा पराभव होईल. बिहारचे मतदार ६ नोव्हेंबरला मतदानाद्वारे या दोन्ही पक्षांना त्यांची जागा दाखवतील, असा विश्वासही मोदींनी व्यक्त केला. ◀(वृत्तसंस्था)

### छट महापर्वाला युनेस्कोचा टॅग मिळवण्यासाठी केंद्राचे प्रयत्न

आमचे सरकार छटपूजा उत्सवाला युनेस्कोचा टॅग मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. पण जेव्हा तुमचा हा मुलगा छटपूजेला जगभरात प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील असताना काँग्रेस आणि राजदचे नेते मात्र छटमातेचा अवमान करत आहेत. मला सांगा, कुणी मतांसाठी छटमातेचा अपमान करू शकतं का? बिहार आणि भारत हे सहन करेल का? छटपूजेच्या दिवशी उपवास करणाऱ्या माता हे सहन करतील का? राजद आणि काँग्रेस किती निर्लज्ज आहेत. त्यांच्यासाठी ही पूजा म्हणजे ड्रामा आणि नौटंकी आहे. तुम्ही अशा लोकांना शिक्षा करणार की नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. ■

# चीनवरील शुल्क १० टक्यांनी घटविले

## जिनपिंग यांच्या भेटीनंतर ट्रम्प यांची घोषणा, दुर्मिळ खनिजांचा पुरवठा सुरळीत करण्यावर सहमती

### अमेरिकेकडून खरेदी करणार सोयाबीन

◆ **सेऊल, ३० ऑक्टोबर**

गेल्या काही महिन्यांपासून अमेरिका आणि चीन यांच्यात टॅरिफ वॉर सुरू आहे. दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध ताणले गेलेले असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी दक्षिण कोरियाच्या बुसान शहरात चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी व्यापार, सुरक्षेसह विविध मुद्यावर चर्चा केली, त्यानंतर ट्रम्प यांनी चीनवरील १० टक्के शुल्क कमी करण्याची घोषणा केली.

चीनने अमेरिकेला दुर्मिळ खनिजांचा पुरवठा सुरळीत करण्यावर सहमती दर्शवली, तसेच अमेरिकेकडून सोयाबीन खरेदी करण्यासाठी करार होणार असल्याची माहिती ट्रम्प यानी दिली. अमेरिकेच्या निर्णयामुळे चीनवरील व्यापारी शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांवर खाली आले आहेत. शी यांच्याशी झालेल्या भेटीनंतर ट्रम्प पत्रपरिषदेत सांगितले की, चीनवरील कमी केलेले शुल्क हे तत्काळ प्रभावाने लागू झाले आहेत. जिनपिंग यांनी अमेरिकेला दुर्मिळ खनिजांचा पुरवठा करण्यासंदर्भात करार केला आहे. अमेरिका आणि चीनमधील सर्व वाद मिटले आहेत. त्यामुळे चीनसोबतचा करार आणखी एक वर्षासाठी वाढवता येईल आणि हे संपूर्ण जगासाठी फायदेशीर ठरेल. चीनने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्याचे आश्वासन दिले आहे आणि माझी जिनपिंग यांच्यासोबत रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी सहकार्यावरही चर्चा झाली. तैवानचा मुद्यावर यावेळी कोणतीही चर्चा झालेली नाही. ट्रम्प पुढे म्हणाले, की ते एप्रिलमध्ये चीनला भेट देणार आहेत. ◀(वृत्तसंस्था)



### वाटाघाटी करण्यात जिनपिंग यांचा हातखंडा

ट्रम्प म्हणाले, आमची बैठक यशस्वी झाली, जिनपिंग यांचा वाटाघाटी करण्यात हातखंडा आहे. आमचे नेहमीच खूप चांगले संबंध राहिले आहे. दीड तासांच्या चर्चेत आम्ही आधीच अनेक गोष्टींवर सहमत झालो. मला विश्वास आहे की आमचे संबंध दीर्घकाळासाठी राहतील. वेगवेगळ्या राष्ट्रीय परिस्थितीमुळे, आम्ही नेहमीच एकमेकांशी सहमत नसतो आणि जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये वेळोवेळी मतभेद असणे सामान्य आहे. ■

### मैत्री विकासासाठी गरजेची : जिनपिंग

संयुक्त पत्रपरिषदेत बोलताना जिनपिंग म्हणाले, चीनचा विकास अमेरिकेला पुन्हा महान बनवण्याच्या तुमच्या दृष्टिकोनाशी जुळवून घेत आहे. दोन्ही देश एकमेकांना यशस्वी आणि समृद्ध करण्यास पूर्णपणे सक्षम आहेत. चीन आणि अमेरिका भागीदार आणि मित्र असले पाहिजेत. चीन-अमेरिका संबंधांसाठी एक मजबूत पाया रचण्यासाठी आणि दोन्ही देशांच्या विकासासाठी वातावरण निर्माण करण्यासाठी मी तुमच्यासोबत काम करण्यास तयार आहे. ■

# सरदार पटेल यांना भारतरत्न देण्यास काँग्रेसमुळेच उशीर

### गृहमंत्री अमित शाह यांचा आरोप

◆ **पाटणा, ३० ऑक्टोबर**

सरदार पटेलांमुळेच आज भारत एकसंध झाला. आजच्या भारताच्या निर्मितीत त्यांनी मोठे योगदान दिले, मात्र काँग्रेसने त्यांना भारतरत्न देण्यास ४१ वर्षे लावली. देशाच्या उभारणीत त्यांच्या योगदानाचा काँग्रेसला विसर पडल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी केली.

भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त गृहमंत्री शाह यांनी पाटणा येथे गुरुवारी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, ३१ ऑक्टोबर हा भारताचे लोहपुरुष सरदार पटेल यांची १५० वी जयंती आहे. २०१४ पासून, पंतप्रधान मोदी दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त केवरिया कॉलनीला भेट देतात. सरदार पटेल यांच्या पुतळ्यासमोर भव्य परेड आयोजित केली जाते. गृह मंत्रालयाने दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी भव्य परेड आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही परेड देशाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी आहे. सर्व राज्यांचे पोलिस आणि



केंद्रीय निमलष्करी दल परेडमध्ये सहभागी होणार आहे. ही परेड एकता आणि अखंडतेचा संदेश देईल. पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता नगरमध्ये भारत पर्व आयोजित केले जात आहे. ते १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत चालेल. पटेलांमुळे लक्षद्वीपमध्ये तिरंगा फडकवण्यात आला. दुर्दैवाने, त्यांच्या निधनानंतर काँग्रेस पक्षाने त्यांना विसरण्यात कोणतीही कसर सोडली नाही. पटेलांसारख्या महान व्यक्तिमत्त्वालाही भारतरत्न मिळण्यास ४१ वर्षे उशीर झाला. त्यांच्यासाठी ना समाधीस्थळ बांधण्यात आले ना स्मारक बांधण्यात आले. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी स्टॅच्यू ऑफ युनिटीचे बांधकाम सुरू केले, जे आता जगभरात प्रसिद्ध झाले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### देशासाठी एक विचारसरणी

शाह म्हणाले, सरदार पटेल हे केवळ एक व्यक्ती नाही तर देशासाठी एक विचारसरणी आहेत. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९२८ च्या सत्याग्रहानंतर महात्मा गांधींनी त्यांना सरदार ही पदवी बहाल केली. त्यांनी भारतातील ५६२ संस्थानांना एकत्र करून भारताचे एकीकरण केले. आज भारताचा नकाशा सरदार पटेलांची देणगी आहे. त्यांनी त्या काळात उद्‌भवलेल्या प्रत्येक समस्येचे निराकरण केले. त्यांनी पाकिस्तान कॉरिडॉर प्रकल्पही हाणून पाडला. यावर्षीच्या परेडमध्ये सीआरपीएफचे पाच शौर्य चक्र विजेते आणि बीएसएफचे १६ शौर्य पदक विजेते देखील सहभागी होतील. ■

# इस्रायलच्या हल्ल्यात गाझा बेचिराख

## २४ तासात १४५ नागरिकांचा मृत्यू, दोनशेपेक्षा अधिक जखमी

◆ **रफाह, ३० ऑक्टोबर**

हमास आणि इस्रायलमध्ये झालेल्या युद्धबंदीनंतर गाझात शांतता निर्माण होईल, अशी आशा तेथील नागरिकांना होती, मात्र १७ दिवसांनंतरच इस्रायलने हमासवर युद्धबंदी करार मोडल्याचा आरोप करीत बुधवारपासून जोरदार हल्ले सुरू केले. गेल्या २४ तासात इस्रायली वायुदलाने गाझाच्या पाच शहरात केलेल्या हवाई हल्ल्यात १४५ नागरिकांचा मृत्यू झाला असून, दोनशेपेक्षा अधिक नागरिक जखमी झाले, तर त्याचवेळी चार रुग्णालयांसह अनेक निवासी इमारती जमीनदोस्त झाल्या.

हमासच्या हल्ल्यात इस्रायली सैनिकाचा मृत्यू झाल्यानंतर हमासकडून युद्धबंदी उल्लंघनाचा आरोप करीत इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गाझा पट्टीवर तत्काळ आणि शक्तिशाली हल्ला करण्याचे आदेश दिले. त्यानंतर गेल्या २४ तासांत इस्रायलने गाझाच्या अनेक भागांवर जोरदार हवाई हल्ले केले, ज्यामध्ये १४५ लोकांचा मृत्यू झाला. गाझा आरोग्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मृतांमध्ये महिला, मुले आणि मदत कामगारांचा समावेश आहे. गाझामधील महिला बालरोगतज्ज्ञ डॉ. अला अल-नज्जर यांच्या नऊ मुली हवाई हल्ल्यात ठार झाल्या. या मुली मदत छावणीत होत्या, जिथे त्या अन्न आणि निवारा शोधण्यासाठी गेल्या होत्या, तेव्हा इस्रायली ड्रोन त्यांच्या घरावर आदळले. मी मुलांना जग वाचवण्याची शपथ दिली होती, पण जगाने त्यांना मारले अशी पोस्ट त्यांनी एक्सवर केली. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलची बाजू घेत धमकी दिली की, जर हमास सुधारला नाही तर ते पृथ्वीवरून पुसून टाकले जाईल. विशेष असे की, ट्रम्प यांच्या टिप्पणीनंतर इस्रायलने आपले हल्ले तीव्र केले आहे. ◀(वृत्तसंस्था)



# ड्रग्ज तस्करांसोबत चकमक १२२ जणांचा मृत्यू

### कारवाईविरोधात नागरिकांची निदर्शने

◆ **रिओ दि जानेरो, ३० ऑक्टोबर**

दक्षिण अमेरिकन देश असलेल्या ब्राझीलमध्ये ड्रग्ज तस्करी करणाऱ्या टोळीविरोधात कारवाई करताना पोलिस आणि सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत मृतकांची संख्या १२२ वर पोहोचली आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, गुरुवारी विविध भागात सरकारविरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आली.

आंदोलकानी आरोप केला की, पोलिसांच्या छाप्यादरम्यान रिओ दि जानेरोमध्ये हे मृत्यू झाले. पोलिसांना कारवाई करताना विशिष्ट समूहाला लक्ष्य केले. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी रस्त्यावर मृतदेह ठेवून निषेध करणयात आला.




याप्रकरणाची दखल घेत ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने गव्हर्नर कॅस्ट्रो यांना या कारवाईची सविस्तर माहिती देण्यास सांगितले. सरकारच्या वतीने न्यायालयाला सांगितले की, पेन्हा आणि कॉम्प्लेक्सो दे अलेमाओ येथे सुमारे २,५०० पोलिस आणि सैनिकांनी छापे टाकले.

पोलिसांनी आणि सुरक्षा दलाने हेलिकॉप्टर, चिलखती वाहने आणि पायी चालत ही कारवाई केली. सध्या या घटनेमुळे ब्राझीलमध्ये तणावपूर्ण परिस्थिती आहे आणि शांतता राखण्यासाठी मोठ्या संख्येने पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. पोलिस कारवाईत इतके लोक कसे मृत्युमुखी पडले याबद्दल सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षाने आश्चर्य व्यक्त केले. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मिथुनच्या सुनेसोबत घडले कास्टिंग काऊच



**मुंबई** : मिथुन चक्रवर्ती यांची सून मदालसा शर्मा हिने वयाच्या १६व्या वर्षी दक्षिण भारतीय इंडस्ट्रीमध्ये तिच्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. तथापि, ती लवकरच बॉलिवूडमध्ये दाखल झाली. अलिकडेच एका मुलाखतीत मदालसाने खुलासा केला की दक्षिण भारतीय इंडस्ट्रीमध्ये एका अस्वस्थ अनुभवामुळे तिला हा इंडस्ट्री सोडून बॉलिवूडमध्ये जावे लागले. वयाच्या १७ व्या वर्षी तिला कास्टिंग काउच चा कटू अनुभव वाट्याला आला. यामुळे ती अत्यंत निराश झाली आणि तिने दाक्षिणात्य सिनेसृष्टी सोडण्याचा निर्णय घेतला. मदालसा शर्माने २००९ च्या तेलुगू चित्रपट फिटिंग मास्टर द्वारे तिच्या करिअरची सुरुवात केली. तिने कन्नड आणि तमिळ चित्रपटांमध्येही काम केले आहे. तिने सम्राट अँड कंपनी, दिल साला संकी, कार्तूट आणि द बंगाल फाइल्स सारख्या हिंदी चित्रपटांमध्येही काम केले आहे. तथापि, मदालसाला चित्रपटांपेक्षा अनुपमा या टीव्ही शोमुळे जास्त ओळख मिळाली. ■

### 'बॅटल ऑफ गलवान'मध्ये दिसणार अमिताभ?



**मुंबई** : सलमान खानच्या बहुप्रतिक्षित चित्रपटात अमिताभ बच्चन दिसणार असल्याच्या बातम्या येत आहेत. अलिकडेच एक फोटो समोर आला आहे ज्यामध्ये अमिताभ बच्चन 'बॅटल ऑफ गलवान' चित्रपटाच्या सेटवर चित्रपटाचे दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांच्यासोबत दिसत आहेत. दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांनी अलीकडेच त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर अमिताभ बच्चन यांच्यासोबतचा एक फोटो शेअर केला आणि लिहिले, अंदाज लावा ते मला काय म्हणत आहे. हा फोटो समोर आल्यानंतर, अमिताभ बच्चन या चित्रपटात सामील झाल्याची चर्चा होऊ लागली. तथापि, अद्याप कोणतेही अधिकृत विधान करण्यात आलेले नाही. जर असे झाले तर हा अमिताभ बच्चन आणि सलमान यांचा एकत्रित चौथा चित्रपट असेल. दोघांनी बाबुल, बागबान आणि गॉड तुस्सी ग्रेट होसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. शिवाय, हॅलो ब्रदर चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी आवाजाची भूमिका देखील बजावली होती. ■

### शुभमनसोबत नाव जोडल्याने रिद्धिमा अस्वस्थ



**मुंबई** : क्रिकेटपटू शुभमन गिलसोबत आजवर अनेकजणींचे नाव जोडले गेले. त्यातील अभिनेत्री रिद्धिमा पंडित हिने यावर मौन सोडले आहे. रिद्धिमा म्हणाली, कोणीतरी एक क्रिकेटपटू आहे. त्याच्यासोबत मी समोरासमोर कधी बोलली नाही, आमची ओळखही नाही. तरीदेखील माझे नाव त्याच्यासोबत जोडले गेले. ही बाब अतिशय अस्वस्थ करणारी आहे. विशेष म्हणजे, हे सगळे मीच घडवून आणल्याचे भासवले जात आहे. जेव्हा कलाकार आणि क्रिकेटपटूंचे नाव जोडले जाते तेव्हा लोकांना कलाकारच दोषी वाटतात. क्रिकेटपटूंकडे त्यांची सहानुभूती असते. हा सगळा प्रकार अतिशय व्यथित करणारा आहे. ■

# २०४७ पर्यंत उभारणार ४०० विमानतळे : नायडू

◆ **नवी दिल्ली, ३० ऑक्टोबर**

भारताने २०४७ पर्यंत देशात ४०० विमानतळ उभे करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी दिली. विकास आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्यासोबतच उच्चतम हवाई सुरक्षा वाढविण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.



विज्ञान भवन येथे पहिल्या आशिया पॅसिफिक रिजन अपघात तपास गटाच्या बैठकीत नायडू म्हणाले, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील सदस्य राष्ट्रांच्या सहकार्यामुळे सुरक्षा देखरेख आणि अपघात प्रतिबंधाच्या बाबतीत उत्तम मानके निश्चित झाली आहेत. भारताने आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटनेची मानके आणि शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय प्रगती केली. २०१७ मध्ये ७० टक्के असलेल्या भारताच्या अनुपालन गुणांमध्ये आता ८५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, ज्यामुळे जागतिक क्रमवारीत ११२ वरून ५५ व्या स्थानावर मोठी सुधारणा झाली . ◀(वृत्तसंस्था)

# ३३ वर्षानंतर अण्वस्त्रांची चाचणी करणार अमेरिका

## ट्रम्प म्हणाले : चाचणी रशिया आणि चीनच्या बरोबरीची असावी

◆ **वॉशिंग्टन डीसी, ३० ऑक्टोबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संरक्षण विभागाला (पेंटॅगॉन) तत्काळ अण्वस्त्र चाचणी पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी म्हटले आहे की ही चाचणी चीन आणि रशियाच्या तुलनेत योग्य पातळीवर असावी. अमेरिकेने शेवटची अण्वस्त्र चाचणी १९९२ मध्ये केली होती.

ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत म्हटले की, इतर देशांच्या चाचण्यांच्या पृष्ठभूमीवर त्यांनी युद्ध विभागाला समानतेच्या आधारावर त्वरित अण्वस्त्रांची चाचणी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.



ट्रम्प यांनी विशेषतः रशिया आणि चीनचे नाव घेत म्हटले की रशिया दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि चीन तिसऱ्या क्रमांकावर आहे, परंतु पुढील पाच वर्षांत ते बरोबरी करू शकतात. दक्षिण कोरियामध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या भेटीच्या एक तासापेक्षा कमी वेळ आधी ट्रम्प यांची पोस्ट आली.

१९९६ मध्ये झालेल्या व्यापक अणुचाचणी बंदी करार अंतर्गत भूमिगत अणुचाचण्यांवर बंदी घालण्यात आली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. चीन आणि अमेरिका या दोघांनीही या करारावर स्वाक्षरी केली आहे, परंतु अद्याप त्याला औपचारिक मान्यता दिलेली नाही. ◀(वृत्तसंस्था)

### अणुचाचण्यांची स्पर्धा लागण्याची शक्यता

संपूर्ण अण्वस्त्र चाचणीमध्ये त्याची विध्वंसक शक्ती, किरणोत्सर्गाचे परिणाम आणि तांत्रिक कार्यक्षमता मोजण्यासाठी जिवंत अणुबॉम्बचा स्फोट केला जातो. या चाचणीमध्ये अणुप्रतिक्रिया समाविष्ट असते. अशा चाचण्या सहसा जमिनीखाली किंवा हवेत केल्या जात असत. रेडिएशनच्या जोखमीमुळे यामुळे एक मोठा पर्यावरणीय आणि राजकीय प्रश्न निर्माण झाला. अमेरिकेने शेवटची २३ सप्टेंबर १९९२ रोजी नेवाडा येथे अणुचाचणी केली होती. त्याच वर्षी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश यांनी भूमिगत अणुचाचण्यांवर बंदी घालण्याची घोषणा केली. १९९० नंतर रशिया आणि चीननेही अशा चाचण्या थांबवल्या. आता ट्रम्प या चाचण्या पुन्हा सुरू करण्याचे आवाहन करत आहेत. ■

# चाबहार बंदर प्रकल्पासाठी अमेरिकेने सवलत वाढवली

## भारताला दिलासा, एप्रिलपर्यंत लागणार नाही निर्बंध

◆ **वॉशिंग्टन, ३० ऑक्टोबर**

अमेरिकेने इराणमधील चाबहार बंदर प्रकल्पासाठी लावलेले निर्बंध एप्रिल २०२६ पर्यंत पुढे ढकलले असून, भारतासाठी सवलत कायम ठेवण्याचा निर्णय राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी गुरुवारी घेतला. यामुळे भारताला मध्य आशिया आणि अफगाणिस्तानशी कनेक्टिव्हिटी योजना राबविण्यात महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे.

नवीनतम मुदतवाढीमुळे, भारत कोणत्याही तत्काळ अमेरिकन निर्बंधांच्या भीतीशिवाय बंदर चालवणे सुरू ठेवू शकेल. चाबहार बंदर इराणच्या आग्नेय किनाऱ्यावर ओमानच्या आखातावर आहे आणि इराणचे एकमेव महासागराशी जोडलेले बंदर आहे. भारत, इराण आणि अफगाणिस्तानमधील हा एक धोरणात्मक कॉरिडॉर असून, भारताला अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी जोडते. भारताने आतापर्यंत चाबहार मार्गे अफगाणिस्तानला गहू आणि युरियाचे अनेक खेप पाठवल्या आहेत.

भारत आणि इराणने मे २०२४ मध्ये १० वर्षांच्या करारावर स्वाक्षरी केली, ज्या अंतर्गत भारताने चाबहारच्या शाहिद बेहेश्ती टर्मिनलच्या विकासात १२० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीत आधुनिक उपकरणांचा पुरवठा, टर्मिनल अपग्रेड आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरला जोडणे यासारख्या प्रकल्पांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आशियाई देशांना हिंदी महासागराशी जोडणारा हा प्रकल्प प्रवेशद्वार आहे. ◀(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# स्वतःची(च) काळजी वाहणारी नोकरशाही

भारतात सर्वांत सुरक्षित, सर्वाधिक लाभ मिळविणारा आणि सर्वांत कमी जबाबदारी पाळणारा कोणता वर्ग असेल, तर तो आहे सरकारी कर्मचारी! याला अगदी थोडे लोक अपवाद. एरवी भरपूर सुट्या, उत्तम वेतन, कामाचे निश्चित तास, आरोग्यासह विविध प्रकारच्या सोयीसुविधा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नियत वेळी वेतनवाढ मिळणारा हा एकमेव वर्ग. देशभरात केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. केंद्र सरकारचे कर्मचारी ३५ लाखांवर, तर सर्व राज्य सरकारांचे कर्मचारी पावणे दोन कोटींच्या वर. महाराष्ट्रात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या आहे पावणे पाच लाखांच्या आसपास. सरकार आणि प्रशासन सुरू आहे, याचा अर्थ सरकारी कर्मचारी काम करीत आहेत, असा घेतला जाऊ शकतो. वास्तवात, उच्चपदस्थ कर्मचारी सोडले, तर बहुतांशी कर्मचाऱ्यांना कशासाठीही जबाबदार धरले जात नाही. त्यांच्या कामाचा हिशेब घेण्याची पद्धत नाही. त्यांच्या सुट्या ठरलेल्या, वेतन ठरलेले आणि सन्माननीय अपवाद वगळता बहुतेकांची उदासिनताही ठरलेली. अशा वर्गाकडे सरकारी कमाईचा अर्थात करदात्यांच्या खिशातून येणाऱ्या पैशाचा मोठा वाटा वेतनवाढीच्या स्वरुपात दिला जातो. सरकारी भाषेत याला 'कमिटेड एक्सपेंडिचर' अर्थात् अपरिहार्य असे खर्च म्हणतात. वेतन, पेन्शन आणि कर्जावरील व्याज हा अपरिहार्य खर्च एवढा मोठा असतो, की विकास प्रक्रियेसाठी फारसा पैसा ऊरत नाही. केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाचे सूतोवाच केले आहे. हा आयोग आधी केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना व नंतर राज्याच्या कर्मचाऱ्यांना लागू होणार आहे. आतापर्यंतच्या सर्व आयोगांचे कामकाज पाहिले, तर त्यात एक साम्य दिसते आणि ते म्हणजे पगारवाढ हा कर्मचाऱ्यांचा अधिकार असल्याचे तत्त्व मान्य करणे. वाढत्या महागाईसोबत पगारवाढ व्हायलाच हवी, यात वाद नाही. पण, ती किती, कशी व कोणत्या मुद्यावर करायची, हे आता तरी ठरले पाहिजे. वर्तमानात खाजगी क्षेत्रात वरिष्ठ व्यवस्थापकीय पदांवर काम करणाऱ्यांचे वेतन देखील केंद्र सरकारातील चपराशांच्या वेतनापेक्षा कमी आहे, हे विसंगतीचे एक साधे उदाहरण. १२ महिने राबणाऱ्या शेतकऱ्याला सरकारमधील बाबूपेक्षा कमी उत्पन्न मिळते, हे दुसरे उदाहरण. अशी उदाहरणे असंख्य देता येतील. आठव्या वेतन आयोगानंतर केंद्र सरकारचा वेतन व पेन्शन खर्च दीड पटीहून अधिक वाढणार आहे. स्वाभाविकच राज्य सरकारांना हा खर्च काही ना काही करून करावाच लागेल. महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल यासारख्या राज्यांमध्ये ७५ टक्के महसूल हा पगार, पेन्शन व व्याजावर खर्च होतो. विकासासाठी उरतात फक्त १५ ते २० टक्के. त्यातून सिंचन प्रकल्प करायचे, शाळा दुरुस्त करायच्या, मास्तर नेमायचे की दवाखाने अपग्रेड करायचे की पाणीपुरवठ्याच्या योजना करायच्या?

एका सर्वेक्षणानुसार, खाजगी क्षेत्रातील सरासरी मासिक उत्पन्न २७,००० ते ३५,००० रुपये आहे, तर केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचा सरासरी पगार ८५,००० रुपये आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा पगार २ ते २.५ लाख रुपये मासिक आहे. अगदी चपराशापासून सुरुवात केली तरी त्याला महिन्याकाठी ३० ते ४० हजार रुपये सहज मिळतात. हा साराच अनुत्पादक खर्च आहे, असे सरसकट म्हणणे योग्य नाही. परंतु, सरकारी कर्मचारी खरोखर किती काम करतात, हा प्रश्न विचारणे गैर नाही. उत्पादनक्षमता, जबाबदारी, कार्यप्रदर्शन यांच्या कसोट्यांवर त्यांचे योगदान किती, या प्रश्नाचे साधे उत्तर 'अत्यल्प' असे आहे. खाजगी क्षेत्रात एखादी चूक झाल्यास थेट नोकरी जाते. सरकारी क्षेत्रात मात्र काम येत नाही किंवा काम करीत नाही, या मुद्यावर कुणाचीच नोकरी जात नाही. सरकारी कार्यालयातली फाईल वजन ठेवल्याखेरीज हलत नाही, तरीही सरकारी कर्मचाऱ्यांना लाडावले जाते. कारण हे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय मिळून एक प्रचंड मतदारसंख्या तयार होते. त्यामुळे कोणतेही सरकार त्यांना नाराज करायचे धाडस करीत नाही. व्यवस्थित वेतन सरकारी कर्मचाऱ्यांना, महागाई भत्ता सरकारी कर्मचाऱ्यांना, पेन्शन सरकारी कर्मचाऱ्यांना. जणू, इतरांना महागाईची झळ बसत नाही आणि इतर कुणाला पेन्शनची गरजच नसते. महागाई भत्ता हे तर 'स्वयंचलित वेतनवाढ यंत्र' आहे. कार्यक्षमता आणि उत्पादन वाढो अथवा घटो, करसंकलन कमी पडो, तरी तो आपोआप वाढत असतो. सरकारी कर्मचाऱ्यांचा वर्ग आता केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही स्वतंत्र 'क्लास' बनला आहे. त्यांना शासकीय क्वार्टर्स, आरोग्य विमा, प्रवास भत्ता, निवृत्तीनंतर पेन्शन असे सर्व काही मिळते. करदाते हा खर्च सोसत राहतात. काही वेळा असेही म्हटले जाते की, नागरिकांना चांगली सेवा मिळावी, लाचखोरी कमी व्हावी आणि कार्यक्षमता वाढावी म्हणून वेतनवाढ दिली जाते. यातले काहीही आतापर्यंतच्या वेतनवाढीतून साध्य झालेले नाही. लाचखोरी सतत वाढते आहे आणि कार्यक्षमतेत वाढ होताना दिसत नाही. यामुळे देशात नवी विषमता तयार झाली आहे. ती अशी की, एक वर्ग सतत कर देतो आणि दुसरा त्या करावर सतत जगत असतो. ही विषमता नैतिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक आहे. ती परिश्रमाचे मूल्य कमी करणारी आहे. ही व्यवस्था एकप्रकारे जनतेच्या परिश्रमाचा उपभोग घेण्याचा अधिकार सरकारी कर्मचाऱ्यांना देणारी आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन यामुळे सरकारची आर्थिक शिस्त बिघडत असल्याचा इशारा अनेक अर्थतज्ज्ञांनी यापूर्वी दिला आहे. काही अर्थतज्ज्ञ असे म्हणतात की, वेतनवाढीचे हे चक्र असेच सुरू राहिले, तर केंद्र व राज्यांचा एकत्रित वेतन खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १२ टक्क्यांहून अधिक होईल. म्हणजे शिक्षण, आरोग्यासारख्या मूलभूत व्यवस्था राहिल्या बाजूला. असेच होत राहिले तर सरकार किंवा प्रशासन म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांनी, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारी व्यवस्थेच्या माध्यमातून चालविलेली लाभ उकळणारी राजवट असे चित्र निर्माण होईल. जगातील बहुतांश प्रगत देशांनी सरकारी क्षेत्रात कामगिरी-आधारित (परफॉर्मन्स बेस्ड) वेतनपद्धती लागू केली आहे. ब्रिटनमध्ये पीआरपी अर्थात् परफॉर्मन्स रिलेटेड पे पद्धत आहे. तेथे कर्मचाऱ्याला उद्दिष्ट दिले जाते व त्यानुसार त्याचा पगार ठरतो. सिंगापूरमध्ये प्रत्येकाला 'की रिझल्ट एरियाज' दिले जातात, म्हणजे नेमके कोणते काम किती प्रभावीपणे करायचे आहे, हे सांगितले जाते. ऑस्ट्रेलियात दरवर्षी कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करून बढती-वेतनवाढ ठरविली जाते. भारतात मात्र असा विचार राजकीयदृष्ट्या 'धोकादायक' मानला जातो. कारण, तो नोकरशाहीची मक्तेदारी संपविणारा अर्थात् मतदारांना नाराज करणारा ठरू शकतो. पण, देशाला खरोखर उत्पादकता वाढवायची असेल, तर असा बदल करणे अपरिहार्य आहे. भारतात सुमारे ७ कोटी लोक नियमितपणे आयकर भरतात. १४० कोटींच्या देशात फक्त ५ टक्के जनता सरकारला थेट आर्थिक योगदान देते आणि त्या ५ टक्के लोकांच्या पैशातून नोकरशाहीचा पगार दिला जातो. करदात्याला ना निर्णय प्रक्रियेत स्थान आहे, ना त्याच्या पैशाच्या वापरावर त्याचे नियंत्रण आहे. अशा स्थितीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा विषय नव्या नजरेतून पाहिला जाण्याची गरज आहे. वेतन आयोगाची संकल्पना निकालात काढण्याची गरज नाही. पण, प्रत्येक कर्मचाऱ्याला कामानुसार पगार, भत्ते, बोनस मिळेल, अशी व्यवस्था निर्माण केली गेली पाहिजे. लोकशाहीतील महत्त्वाचा स्तंभ असलेल्या नोकरशाहीकडून उत्तरदायित्व अपेक्षित आहे. पण, त्याचा लवलेशही नोकरशाहीत आढळत नाही. सदैव स्वतःची काळजी वाहणारा वर्ग असेच नोकरशाहीचे स्वरूप आहे. प्रश्न आठव्या वेतन आयोगाचा नाही. पगारवाढीला विरोध करण्याचा किंवा पगारवाढीचे महत्त्व नाकारण्याचाही नाही. प्रश्न आहे तो सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांच्या तुलनेत अत्यंत असमाधानकारक असलेल्या त्यांच्या कामगिरीचा आणि तरीही सरकारकडून होत असलेल्या त्यांच्या लाड-कौतुकाचा. हे लाड-कौतुक कामगिरीच्या नजरेने पाहण्याचा विवेक शासकांमध्ये येईल तोच सुदिन!

## प्रासंगिक

**विनोद देशमुख**

# सरदार पटेल नसते तर... आम्ही पाकिस्तानी असतो!

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव उच्चारताच निझामग्रस्त राजुरा तालुका, वऱ्हाडचा काही भाग आणि मराठवाडा येथील जनतेची मान आजही कृतज्ञतेच्या भावनेने झुकते, इतके त्यांचे आमच्यावर उपकार आहेत. कारण, सरदारांनी निझाम स्टेट बरखास्त करून स्वतंत्र भारतात विलीन करण्यासाठी पोलिस ॲक्शन (ऑपरेशन पोलो) केली नसती तर, वरील भागातील आम्ही लोक आज (दक्षिण) पाकिस्तानचे नागरिक राहिलो असतो आणि हिंदू अल्पसंख्यक म्हणून आमची दैनाच झाली असती, यात संशय नाही. यातून आम्ही वाचलो, हे निव्वळ पटेलांचे उपकार. ते आमच्या पुढच्या पिढ्यांनाही कधीही न विसरता येण्यासारखेच आहेत. त्यासाठी आम्ही सारे माजी निझाम स्टेटवाले सरदार पटेलांच्या कायम ऋणात राहू इच्छितो आणि आज त्यांच्या १५० व्या जन्मदिनी त्यांच्या स्मरणार्थ नतमस्तक होत आहोत.

शेवटचा निझाम मिर उस्मान अली खान अतिशय धूर्त होता. अखंड भारताच्या फाळणीच्या वेळी त्याला भारतात विलीन व्हायचे नव्हते. परंतु, आपले राज्य भारताच्या मध्यस्थानी असल्याने ही गोष्ट सहजशक्य नाही, याचीही त्याला कल्पना होती. म्हणून त्याने आधीच मुस्लिम युवकांचे निमलष्करी दल (रझाकार) उभारण्यास प्रोत्साहन देऊन हिंदू जनतेवर अत्याचार सुरू केले. याच्या विरोधात काँग्रेस नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात जनतेने गावोगावी लढा दिला, सशस्त्र संघर्ष करून रझाकारांचा कडवा प्रतिकार केला. त्यामुळे निझामाला शरणागती पत्करणे शेवटी भाग पडले.

या यशाचा अंतिम अंक मात्र सरदार पटेलांनी लिहिला, हे आता ऐतिहासिक सत्य आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतात सामील व्हायला निझाम तयार नव्हता आणि रझाकारांना मदत करीत निझाम स्टेटमध्ये अत्याचारांचा नंगानाच घालत होता. परंतु, भारतीय नेते काहीही करू शकत नव्हते. कारण, ब्रिटिश



गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन, पंडित नेहरू आणि बॅ. जिना यांचे एकमत होत नव्हते. शेवटी निझाम स्टेट, काश्मीर आणि जुनागढ या तीन संस्थानांचा प्रश्न अधांतरी ठेवून १४-१५ ऑगस्टला भारत-पाकिस्तान वेगळे करण्यात आले.

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्रिपद सरदार पटेल यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी वरील तीनही संस्थानांचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला. काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांनी भारतात येण्याचे मान्य केले. परंतु, जुनागढच्या नवाबाने पाकिस्तानमध्ये जाणे पसंत केले होते. त्यावर पटेलांनी जुनागढ ताब्यात घेऊन तेथे जनमताचा कौल भारताच्या बाजूने मिळवून घेतला. प्रश्न राहिला निझामाचा. कासीम रिझवीच्या पाठिंब्यावर निझाम नकारघंटा वाजवत होता. यावर तोडगा काढण्यासाठी निझामाशी चर्चा करण्यावर नेहरूंचा भर होता, तर पटेल मात्र लष्करी कारवाईच्या मूडमध्ये होते. तशी संधी त्यांना एक वर्ष उलटल्यानंतर मिळाली आणि त्याच्या परिणामी आम्ही उशिरा का होईना, स्वतंत्र होऊन भारताचे नागरिक बनू शकलो.

सप्टेंबर १९४८ मध्ये नेहरू परदेश दौऱ्यावर गेले आणि ही संधी साधून पटेलांनी पोलिस ॲक्शन करीत चार दिवसांत (१३ ते १७ सप्टेंबर) निझाम स्टेटवर ताबा मिळविला अन् ते भारतात विलीनही करून घेतले. बहुतांश भारताचा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्टला साजरा होत असताना माजी निझाम स्टेटमध्ये (महाराष्ट्राचे वरील तीन भाग, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकचा काही भाग) मात्र स्वातंत्र्यदिन १७ सप्टेंबरला होतो, तो यामुळेच. याला हैदराबाद मुक्ती दिन, मराठवाडा मुक्ती दिन, राजुरा मुक्ती दिन असे संबोधले जाते, तर या स्वातंत्र्यासाठी झालेल्या जनतेच्या लढ्याला त्या-त्या भागातील मुक्ती संग्राम म्हणतात.

हे शक्य झाले सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या कणखर, प्रसंगावधानी अन् दूरदृष्टीच्या नेत्यामुळेच. भारत आधी स्वतंत्र झाल्यामुळे निझाम स्टेटमध्ये लष्करी कारवाई करणे नव-भारताला शक्य नव्हते. कारण, आंतरराष्ट्रीय नियमानुसार, तो निझाम स्टेटवर हल्ला ठरला असता आणि प्रश्न चिघळून हाताबाहेर गेला असता. तसे होऊ नये म्हणून पटेलांनी पूर्ण काळजी घेतली. या कारवाईला त्यांनी पोलिस ॲक्शन असे नाव दिले आणि जनतेलाही सोबत घेत प्रत्यक्षात लष्कराचाच वापर केला! या डावपेचामुळे निझामाची गोची होऊन त्याला शेवटी पटेलांपुढे नाक घासावे लागले!!

एकूण, सरदार पटेलांच्या दृढ निश्चयामुळेच आज आम्ही भारतात आहोत आणि मानाने जगत आहोत. अन्यथा, बांगलादेशासारखे तिसरे पाकिस्तान आमच्या नशिबी आले असते आणि कायमचे हाल झाले असते. त्यातून आम्हाला वाचविणाऱ्या या लोहपुरुषाला आज दीडशेव्या जयंतिदिनी कोटी कोटी प्रणाम.

९८५०५८७६२२

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# आता ट्रेंड स्नॅक्स टूरिझमचा!

'नित्य नूतन हिंडावे, उदंड देशाटन करावे' समर्थ रामदास स्वामींची ही उक्ती आजचे मिलेनियल्स आणि जेन झी खऱ्या अर्थाने सार्थ ठरवित आहेत. देश-विदेशात फिरून मनुष्याला येणारा विवेक त्याला सुजाण बनवितो, ही मान्यता! पर्यटन कशासाठी तर शिक्षणासाठी, निसर्गसौंदर्यासाठी, प्राचीन वास्तूंच्या अभ्यासासाठी, आरामासाठी आणि क्वचित वैद्यकीय उपचारांसाठी सुद्धा! पण, आता ठिकठिकाणचे स्नॅक्स खाण्यासाठी पर्यटनाचा ट्रेंड आला आहे. 'फिरायला जाणे' यामागची संकल्पनाच बदलून गेली आहे. प्रत्येक १० मैलांवर भाषा बदलते, तशी खाद्य संस्कृतीही बदलते. फिरायला गेल्यानंतर एखाद-दुसरा स्थानिक पदार्थ चाखायचा, ही रूढी मोडित काढून, कुठे आणि काय चांगले खायला मिळते? तिथे फिरायला जायचा ट्रेंड आहे. सोशल मीडियावर व्हायरल रिल्स, स्नॅक्स बनवितानाचे किंवा त्यांचे अन बॉक्सिंग करतानाचे व्हिडीओज् कल्पनेपलीकडे लोकप्रिय आहेत. एका ताज्या आकडेवारीनुसार, परदेशात पर्यटनाला जाण्यापूर्वी ४७ टक्के पर्यटक, स्थानिक पेय-पदार्थ आणि स्नॅक्सच्या पर्यायांचा प्राधान्याने विचार करतात. त्यात स्वित्झर्लंडचे चॉकलेट बुटीक, जपानचे किटकॅट, कोरियाई हनी बटर चिप्स, इटालियन ट्रफल क्रिस्प्स, थायलॅण्डचे प्रिंगल्स, तायवानचा बबल टी, टोकियोतील विविध चवींचे सकुरा, सेऊलच्या पेस्ट्री, दुबईचे कुनाफा चॉकलेट, फ्रूट आईस्क्रीम अशी ही यादी न संपणारी आहे.

एखाद्या ठिकाणी फिरायला गेल्यावर काय बघायचं? तिथली वनराई, जंगल सफारी, संग्रहालय, ऐतिहासिक वास्तू, प्राणी संग्रहालय, गगनचुंबी इमारती आणि तारांकीत हॉटेल्स? नाही! एखाद्या लहानशा गल्लीत मिचमिच्या डोळ्यांच्या आजीबाईने बनवलेली पेस्ट्री, रस्त्याच्या कडेला उभ्या हातगाडीवर बनविलेला पास्ता, एखाद्या सुपर मार्केटमध्ये मिळणारी स्थानिक फळांपासून बनविलेला खमंग चवीचा एखादा पदार्थ हे नव्या काळातील 'ट्रॅव्हल गोल' आहे.

एखाद्या चॉकलेट किंवा विशिष्ट सॅण्डविचसाठी परदेश प्रवास करण्यासाठी तयार असलेली आताची पिढी, खाण्याच्या अनुभवातून त्या ठिकाणच्या संस्कृतीशी जोडली जाण्यास उत्सुक आहे. ही खऱ्या अर्थाने 'वसुधैव कुटूंबकम्'ची सुरुवात आहे. देशोदेशीच्या प्रस्थापित पर्यटनस्थळांऐवजी स्थानिक खाद्यपदार्थ आता टुरिस्ट डेस्टिनेशन 'ठरवत' आहेत. यात जेन झीसोबतच मिलेनियल्स म्हणजे गेल्या शतकातील ८०च्या दशकात जन्मलेली मंडळीसुद्धा पुढे आहेत. दहापैकी ६ पर्यटक स्थानिक व्यंजनांच्या माहितीवर त्या पर्यटन स्थळी जायचं किंवा नाही, हे ठरवितात. जवळपास ७० टक्के पर्यटक असे खास पदार्थ विकत घेण्यासाठी वेगळं बजेटसुद्धा प्लॅन करतात. जास्त शेल्फ लाईफ असलेले पदार्थ विकत घेऊन, मायदेशी भेट म्हणून देण्याकडेही पर्यटकांचा कल वाढला आहे.

रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या हातगाड्यांप्रमाणेच स्थानिक सुपरमार्केट किंवा लहान खाणावळींनाही पर्यटक आवर्जून भेट देत आहेत. 'बिल्डींग बघण्यापेक्षा बर्गर महत्त्वाचा' असा ट्रॅव्हल फंडा आहे. पॅरीसमध्ये जाऊन आयफेल टॉवर बघितला नाही तर काय बघितलं? हे मानणारी पिढी आता संपतेय्. एकूण जेन झी पर्यटकांपैकी ३८ टक्के, आयफेल टॉवर बघण्यापेक्षा, खास आणि अस्सल चवीचे फ्रेंच पदार्थ खायला प्राधान्य देतात. व्हायरल व्हिडीओज बघून त्या ठिकाणी पोहचलेले हे पर्यटक त्या स्नॅक्ससाठी अगदी रांगा लावून उभे राहतात.

महागडी हॉटेल्स आणि तिथलं जेवण पर्यटकांच्या पसंतीक्रमातून हद्दपार झालं आहे. दक्षिण आशियातील गल्लीबोळात '७ इलेव्हन' नावाची स्थानिक खाणावळ शोधत भटकणाऱ्या आणि दुबईच्या कुनाफाची चव सांगताना न थकणाऱ्या 'हिस्टेरिक' पर्यटकांचे व्हिडीओज एका क्लिकवर आहेत. पर्यटनाचे निमित्त आता निसर्गसौंदर्याची विहंगम दृश्ये नसून, देशी चवीचे पदार्थ झाले आहेत. सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडीओजमुळे ही क्रेझ निर्माण झाल्याचं तज्ज्ञांचे मत असले, तरी पर्यटकांच्या मनापर्यंतचा मार्गही आता त्यांच्या पोटातून जातो, ही नवी संकल्पना मूळ धरत आहे. येणाऱ्या दशकात 'स्नॅक टुरिझम' हा ट्रॅव्हल इंडस्ट्रीचा ट्रेंड सेटर ठरणार आहे.


९८५०३३९२४०

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा अर्थ

देशाचे गृहमंत्री अमित शाह यांना 'चाणक्य' म्हणून देश ओळखतो. त्यांनी भाजपाचे काम देशभर वाढवले. शतप्रतिशत, पंचायत ते पार्लमेंट हा विषय त्यांनीच मांडला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी घेतलेल्या परिश्रमातूनच भाजपा आज दिसतो त्या स्वरूपात उभा आहे. अमित शाह नुकतेच मुंबईत येऊन गेले. तेथे त्यांनी केलेल्या एक वक्तव्याची चर्चा आहे. 'चाणक्य'चे बोलणे-वागणे हलक्यात घ्यायचे नसते. तो बोलतो त्याच्या प्रत्येक शब्दाकडे गंभीरपणे बघायचे असते. पण समोरचा माणूस काहीही बोलला तरी त्याचा विपर्यास करून सांगणं ही अनेकांची हौस फिटत नसते. 'शिल्लक शिवसेने'चे अध्यक्ष उद्धव ठाकरे, त्यांचे हनुमान खासदार संजय राऊत हे त्यातलेच. प्रदेश भाजपाच्या मुंबईतल्या नव्या कार्यालय इमारतीच्या भूमिपूजनाला शाह आले होते. त्यावेळी केलेल्या भाषणात 'महाराष्ट्रात भाजपाला आता कोणत्याही कुबड्यांची गरज उरलेली नाही' असे वक्तव्य शाह यांनी केले. त्यांच्या या वक्तव्याचा काहींनी विपर्यास केला. उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उद्देशून त्यांचे वक्तव्य होते का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यामुळे हा संभ्रम प्रथम दूर करणे आवश्यक आहे. 'कुबड्यांची गरज नाही' याचा अर्थ एकनाथ शिंदे किंवा अजितदादा यांची गरज उरली नाही, असा अजिबात नाही. शिंदे किंवा दादा हे कुबड्या नाहीत. तसे पाहिले तर भाजपाचे आज १३३ आमदार आहेत. आणखी १०-१२ जमवले तर सरकार चालवण्यासाठी पुरेसे आहेत. भाजपाला ते करायचे नाही. अजितदादांना सोबत घेणे भाजपामधल्या अनेकांना आवडले नाही. पण शरद पवारांची 'कुबडी' काढून घेण्यासाठी ते आवश्यक होते, हे 'चाणक्य'च ओळखू शकतो. उद्धव ठाकरे यांची मस्ती जिरवण्यासाठी एकनाथ शिंदेंचे राजकीय महत्त्व शाहच ओळखू शकतात. पण कुबड्या नकोत म्हणजे 'शिंदे-दादा आऊट' असा अर्थ सांगितला जात आहे. तसे वास्तव नाही, हे स्पष्ट केले पाहिजे. 'शिवसेनेची कुबडी घेऊन भाजपा उभा राहिला. शिवसेनेचं बोट पकडलं म्हणून भाजपा उभा होऊ शकला' असे उद्धव ठाकरे नित्यनियमाने सांगत असतात. ते वास्तव नाही. भाजपा आज जो दिसतो त्यामागे २०-२५ वर्षांची हजारो कार्यकर्ते-नेते यांची तपश्चर्या आहे. उद्धव ठाकरेंनी काय केले? पिताश्रींची स्वयंभू संघटना उद्धव यांनी पार पंगू करून टाकली. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापोटी त्यांनी वडिलांच्या पक्षाचे मातेरे केले. काय मिळवले? अडीच वर्षांतच घरी बसावे लागले. राष्ट्रवादी आणि काँग्रेसची कुबडी घेतल्याशिवाय त्यांना आज चालता येत नाही. राज ठाकरे या २० वर्षांपूर्वी वेगळ्या झालेल्या आपल्या चुलत भावाला उद्धव जवळ करत आहेत. हीच ती मनसे आहे, जिच्यावर बोलताना, 'संपलेल्या पक्षाबद्दल आपण बोलत नाही' असे आदित्य ठाकरे म्हणाले होते. तरीही टेन्शन आहेच. भाऊ अजून तोंड उघडायला तयार नाही. युतीचं बोलत नाही. दुसरे म्हणजे राज यांना जवळ घेतले तर काँग्रेसची हुकमी मतं हातची जातील, मुस्लिम मतंही दूर जातील, हे उद्धव यांना मोठे टेन्शन आहे. १९८५ मध्ये स्वबळावर मुंबई महापालिका स्वबळावर जिंकणारी ठाकरेंची शिवसेना आज कुबड्यांच्या शोधात आहे. आपण लंगडे झालो आहोत, आपण का लंगडे झालो, आपल्याला कोणी लंगडे केले हे समजून घ्यायचे सोडून अमित शाह यांच्या वक्तव्याचा विपर्यास करायचा हट्ट उद्धव यांच्याकडून सोडवत नसेल तर हेच होणार.





उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांना 'ॲनाकोंडा' म्हटले. या नावाचा महाभयंकर साप आहे. तो समोरच्याला गिळून टाकतो. त्या हिशोबाने ठाकरेंनी शाहांना 'ॲनाकोंडा' म्हटले. पण भाजपाने किंवा अमित शाह यांनी कोणत्या पक्षाला गिळले, याचे एकही उदाहरण ठाकरे देऊ शकले नाहीत. कसे देतील? असेल तर देतील ना. १९८० मध्ये भाजपाने गुजरातमध्ये उठायला सुरुवात केली. गुजरातमध्ये कित्येक वर्षे भाजपाची सत्ता आहे. तिथे भाजपाने कोणाला गिळले? ११ वर्षांपासून भाजपाची देशावर सत्ता आहे. नरेंद्र मोदींनी कोणाला गिळले? भाजपाने गिळले असा एक पक्ष सांगा. जून २०२२ मध्ये हे होऊ शकलं असतं. एकनाथ शिंदे ४० आमदार घेऊन फुटले होते, त्यांना सहज खिशात टाकता आलं असतं, पण भाजपा त्या मोहात गेली नाही. गुजरातमध्ये नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड भाजपाला सहजपणे गिळता आला असता. पण भाजपा त्या भानगडीत पडला नाही. याउलट, काँग्रेसचा काय रेकॉर्ड आहे? काँग्रेसने अर्धा डझन पक्ष गिळले आहेत. हे सांगताना हरयाणाचे उदाहरण प्रामुख्याने दिले जाते. तेथे भजनलाल यांचा संपूर्ण पक्ष काँग्रेसने गिळंकृत केला होता. उद्धव ठाकरेंची अडचण वेगळी आहे, त्यांना जिंकायचं कसं? ते अजून कळलेले नाही. वडिलोपार्जित पक्ष होता. त्या पुण्याईवर तब्बल २५ वर्षे मुंबई ठाकरे कुटुंबाकडे राहिली. ती पुण्याई आता सरत आली आहे. उद्धव ठाकरे यांना तर मुळात राजकारण किती कळतं? हाच प्रश्न आहे. त्यांना जिंकायचं कळत नाही. मात्र पक्ष कसा संपवायचा? हे छान कळते. त्यासाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा चंग उद्धव यांनी बांधला आहे, असे अलिकडच्या त्यांच्या वर्तनावरून ध्यानात येते.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. कुठल्याही परिस्थितीत त्या येत्या ३१ जानेवारीपूर्वी उरकून घ्या, असा दम सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्या हिशोबाने निवडणूक आयोग कामाला लागला आहे. सारे राजकीय पक्षही तयारीला भिडले आहेत. त्यामुळेच सध्या राजकारण तापलेले दिसते. खरी हाणामारी महापालिका निवडणुकांमध्ये होईल. २७ महापालिकांच्या निवडणुका सर्वात शेवटी घेण्याचे ठरले आहे. त्या हिशोबाने महापालिकांच्या निवडणुकीला नववर्ष उजाडेल. महापालिकांमध्ये मुंबईची निवडणूक सर्वाधिक चुरशीची होईल. एकदम 'करो वा मरो.' ठाकरेसेनेचे प्राण मुंबईमध्ये आहेत. राज्यातली ही सर्वात श्रीमंत महापालिका गेली २५ वर्षे त्यांच्या ताब्यात होती. पुढेही ती राहावी यासाठी उद्धव यांनी कंबर कसली आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेना अखंड होती. सरकारमध्ये हे दोघे युतीत असतानाही शिवसेना आणि भाजपा आमनेसामने लढले. शिवसेनेला ८४ ते भाजपाला ८२ जागा मिळाल्या. महापालिका ठाकरेंकडे गेली. यावेळी कुठल्याही परिस्थितीत मुंबई जिंकायचीच ह्या जिद्दीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भिडले आहेत. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना अपेक्षित आहे. यावेळी राज ठाकरे यांना सोबत घेण्याची रणनीती उद्धव यांनी आखली आहे. पण काँग्रेसला राज ठाकरे चालतील का? त्यावर सारा खेळ आहे. १४ नोव्हेंबरला बिहारच्या निवडणुकीचा निकाल आहे. त्यानंतर काँग्रेस आपले पत्ते खुले करील. मुंबईच्या निवडणुकीत विरोधकांचे नेतृत्व मनसे सुप्रीमो राज ठाकरे यांनी हायजॅक केले आहे. 'मतदार याद्यांमधल्या त्रुटी दूर केल्याशिवाय निवडणूक होऊ देणार नाही' अशी घोषणा राज ठाकरेंनी मागेच केली आहे. मात्र किती विरोध पक्ष या मुद्यावर त्यांच्या पाठीशी राहतात हा प्रश्नच आहे. निवडणुकाच लढायच्या नाहीत हा मुद्दा विरोधी पक्षांच्या किती पचनी पडेल ते पाहायचे. निवडणूक न लढवणे राज ठाकरेंना परवडू शकते. इतरांना ही चैन मानवेल काय? विरोधी पक्ष राज यांच्या मागे फरफटत जातात काय? मुंबईच्या निवडणुकीत बरेच काही घडणार आणि बिघडणार आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## विद्यामंदिर की भ्रष्टाचाराचा अड्डा?

नागपूर जिल्ह्यातील बारा शाळांनी तीन कोटींचे अनुदान घेऊन सरकारची फसवणूक केली. बालक मंदिर, शाळा, महाविद्यालये हे पवित्र विद्यामंदिर आहे. पूर्वी वर्गात प्रवेश करण्यापूर्वी पायातील चप्पल, बूट काढून नंतर वर्गात प्रवेश व्हायचा. या मंदिरातच खोटे बोलू नका, चोरी करू नका, वडील माणसाला मान द्या, हे जीवनाचे प्राथमिक शिक्षण मिळे.



परंतु आता शिकवणारेच भ्रष्टाचारी झाले आहेत. बहुतेक ठिकाणी लाच घेऊन प्रवेश देतात. त्यामुळे गरीब मुलांचे नुकसान होते. हे शिक्षणाच्या बाबतीत उदासीन असतात. नीट, यूजीसीच्या परीक्षेत एक कोटी रुपयांपर्यंत पैसे घेऊन गुण वाढविल्याचे ऐकले होते. बुद्धीपेक्षा पैसा श्रेष्ठ झाला आहे. नीतिमत्ता शिकविणारे अनीतीने वागतात. मग मुलांना योग्य शिक्षण, संस्कार कुठे मिळणार? विद्या क्षेत्रात तरी भ्रष्टाचाराला स्थान नको. ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांचे नाव जाहीर करावे, त्यांची संपत्ती सरकारजमा करावी, त्यांना तुरुंगात टाकावे. तेथे श्रीमंत, प्रतिष्ठित वगैरे बघू नये.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

## वाचक पत्रे

### आवळा नवमीचे महत्त्व

आपली भारतीय संस्कृती ही निसर्गाशी घट्ट जोडलेली आहे. हिंदू धर्मात निसर्गाला देवत्व दिलं गेलं आहे. झाडं, नद्या, पर्वत, प्राणी, सूर्य, चंद्र या सगळ्यात देवाचं दर्शन घडतं. अशाच निसर्गाशी निगडित सणांपैकी एक म्हणजे आवळा नवमी, जी ऑक्टोबर महिन्यातील कार्तिक शुक्ल नवमी या दिवशी साजरी केली जाते. या दिवसाला कुष्मांड नवमी असेही म्हणतात. 'आवळा म्हणजे पृथ्वीवरील अमृत!' असे आयुर्वेदात म्हटले जाते. तो शारीरिक, मानसिक त्रास दूर करणारा आहे; म्हणूनच त्याला 'औषधांचा राजा' म्हणतात. थंडीच्या दिवसांत आवळ्याचे सेवन केल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढते. आयुर्वेदाच्या तत्त्वानुसार आवळा पित्त, बद्धकोष्ठता, त्वचारोग, केस गळणे, अकाली केस पिकणे आणि जीवनसत्त्व 'सी'ची कमतरता या सर्वांवर रामबाण उपाय आहे. आमला एकादशीच्या दिवशी भगवान श्रीविष्णूला आवळा अर्पण करतात आणि तुळशी विवाहातही आवळ्याचा वापर करतात. कारण आवळ्यात विष्णुतत्त्व मुबलक प्रमाणात असते. आवळा पूजनाची पौराणिक कथा आहे. एकदा देवी लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करत असताना त्यांनी भगवान विष्णू आणि भगवान शिव या दोघांची एकत्र पूजा करण्याची इच्छा व्यक्त केली. ते कसे शक्य आहे, असा विचार करताना त्यांना लक्षात आले की तुळशी (विष्णूला प्रिय) आणि बेलपत्र (शिवाला प्रिय) या दोन्हींचे गुणधर्म आवळ्याच्या झाडात एकत्र आढळतात. म्हणून देवी लक्ष्मीने आवळ्याच्या झाडाची पूजा केली. या पूजेमुळे भगवान विष्णू आणि भगवान शिव दोघेही प्रसन्न होऊन प्रकट झाले. देवी लक्ष्मीने आवळ्याच्या झाडाखाली त्यांना अन्न अर्पण केले. त्या दिवसापासून म्हणजेच कार्तिक शुक्ल नवमीपासून आवळ्याची पूजा करण्याची परंपरा सुरू झाली. आवळा नवमी पूजेचा विधी असा आहे. या दिवशी सकाळी स्नान करून व्रताचा संकल्प करावा. त्यानंतर आवळ्याच्या झाडाखाली पूर्वाभिमुख बसून 'ॐ धात्र्यै नमः' हा मंत्र म्हणावा. झाडाच्या मुळाशी दूध, पाणी, फुले, अक्षता अर्पण करून कापूर आणि तुपाचा दिवा लावावा. आरती करून झाडाला पिवळा धागा बांधत प्रदक्षिणा घालावी. गोड पदार्थाचा नैवेद्य दाखवतात, काही ठिकाणी झाडाच्या सावलीत ब्राह्मण भोजन दिले जाते. आवळा नवमी हा केवळ एक धार्मिक सण नाही, तर तो निसर्ग, आरोग्य आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम आहे.



**रमा देशमुख**/नागपूर

## आजचे संघगीत-२८

शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५

### मी युग नव निर्मीन

मी युग नव निर्मीन मी युग नव निर्मीन ॥धृ.॥

रुखल्या सुखल्या भूमीवरती सद्भावाने करुनी वसती
संस्कारांचे जल सिंचुनिया सोनमळे पिकवीन ॥१॥

शांत सागरा जवळी जाउन वडवाग्नीची ओळख सांगुन
सत्कार्याच्या प्रचंड लाटा उसळत मी ठेवीन ॥२॥

येता कल्पांताची चाहुल, जन होती भयकंपित व्याकुळ
जनशक्तीला जागृत करुनी गोवर्धन उचलीन ॥३॥

कोटि कोटि मम बाहू उभवुन नभ कोसळते अलगद झेलुन
विश्वासाचे उषः किरण दिग् दिगंतरी उधळीन ॥४॥

ज्या एका स्वप्नाचा औरस भारतीय मी म्हणुनी
वारस पुनः जगाच्या जीवनात साक्षात्कार बघेन ॥५॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## HEALTH DEPARTMENT
## GOVERNMENT OF MAHARASHTRA
## TENDER NOTICE 2025-26
## CIVIL SURGEON SOLAPUR

Rate Contract of Supply & Refilling of Medical Oxygen in Cylinder, Tank & PESO Certificate Renewal

**Tender Reference No. CSS/Med.Store/Medical Oxygen/ E Tender-04/25-26**

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers, Authorized supplier to participate in the competitive bidding process to Rate Contract of Supply & Refilling of Medical Oxygen in Cylinder, Tank & PESO Certificate Renewal..

For the detailed tender documents, interested bidders should visit **http://www.maharashtra.gov.in/tenders.**

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 07/11/2025 (05.00 PM)

Sd/-
Civil Surgeon, Solapur

Aryan Creation

## जाहीर नोटीस

दि. ३०/१०/२०२५

तांदुळवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. तांदुळवाडी, ता. बार्शी जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये सर्वसाधारण या मतदार संघातील रिक्त झालेल्या एक जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून सौ. एस. के. मुंढे सहकारी अधिकारी श्रेणी-२, अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक :- ०६/११/२०२५ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

**सही/-**
**( सौ.एस.के. मुंढे)**
**अध्यासी अधिकारी तथा सहकारी श्रेणी-२ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी**

**सही/-**
**सचिव**
**तांदुळवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. तांदुळवाडी, ता. बार्शी जि. सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

सि. कि. अर्ज नं. २६२/२०२५
नि. ७

### सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सारे यांचे कोर्टात

१. शिरीन आसिफ सय्यद इनामदार
वय - ३७ वर्ष, धंदा-घरकाम
२. सरिना आसिफ सय्यद इनामदार
वय-१४ वर्षे, धंदा-शिक्षण
तर्फे अज्ञानपालनकर्ता अर्जदार नं. १
दोघे रा. ब्लॉक नं. १८. साई होम्स, आदित्य नगर शेजारी, विजापूर रोड, सोलापूर -- **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र सरकार**
(समन्सची बजावणी मा. जिल्हा सरकारी वकील कार्यालय यांचेवर करण्यात यावी) -- **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदाराने खालील नमूद वर्णनाची अर्जदार व अज्ञानाचे संयुक्त नावे असलेली मिळकत विक्री करणेसाठीची परवानगी मिळणेकामी अर्ज हा मे. न्यायालयात सदर मिळकत विक्रीसंबंधी कोणाची काही हरकत असल्यास ही नोटीस दाखल केला आहे. प्रसिध्द झालेपासून तीस दिवसाचे आत अथवा नेमली तारीख ०३/१२/२०२५ रोजी स्वतः अथवा योग्य माहीतगार ईसमामार्फत अथवा वकिलांमार्फत हजर होवून लेखी म्हणने सादर करावे. वरील मुदतीत कोणाची काही तक्रार वा हरकत न आलेस मे. न्यायालय पुढील योग्य ते हुकूम करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. मिळकतीचे वर्णन - डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी उत्तर सोलापूर, पैकी शहर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमधील, नेहरूनगर येथील सर्व्हे नं. २८/१/१/३, यापैकी प्लॉट नं. १८, यांसी ०.९२.९६ आर चौ मी. व त्यावरील आरसीसी बांधकाम यासी चतुःसीमा पूर्वेस प्लॉट नं. १९, दक्षिणेस - ६ मी. रोड, पश्चिम - प्लॉट नं. १७ उत्तर-ओपन स्पेस. ता. २८/१०/२०२५

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय सोलापूर**

## CHANGE IN NAME

I Hereby Declare that My Old Name **SAHERA BANO MUSTAQ ALI SIDDIQUI** has been changed to **SAHERA MUSTAQ ALI SIDDIQUI**

Resi. - 108 A, Sahara Nagar,Hotgi Road,Solapur - 413003

**Kindly Note the same**

**(Affi. 47977 Dtd. 07.10.2025)**

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएन: L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालयः फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडीः jammill1907@gmail com

### सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे संध्याकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाही आणि अर्ध वर्षा च्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

तारीख : ३०.१०.२०२५
ठिकाण : सोलापूर

**जामश्री रिअलटी लिमिटेड करिता**
**सही/-**
**राजेश दमाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**

**केटरिंग स्टॉल्सच्या कामकाजासाठी कराराचे वाटप**

**निविदा सूचना क्रमांक.**SUR-CATG-25-24 आणि SUR-WVM-25-13 तारीखः 28.10.2025

क्रमांक १. लिलाव कॅटलॉग क्रमांकः SUR-CATG-25-24 लिलाव सुरू होण्याची तारीख आणि वेळः सकाळी १०.०० वा. १३.११.२०२५ बंद होण्याची तारीख आणि वेळः सकाळी ११.४० वा. १३.११.२०२५ स्थानकांचे नावः १. मोहोळ येथील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव २. दुधनी ३. माढा ४ आराग ५. मोडनिंब ६. लातूर ७. भिगवन ८. कुर्डुवाडी क्रमांक २. लिलाव कॅटलॉग क्रमांकः SUR-WVM-25-13 लिलाव सुरू होण्याची तारीख आणि वेळ : सकाळी १०.०० वा. १४.११.२०२५ बंद - सकाळी १०.४० वा. १४.११.२०२५ स्थानकांचे नावः पाणी विक्री यंत्रे - क्लस्टर आधारावर १. वाडी २. कुर्डुवाडी पद्धतः ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) निविदा कालावधीः ५ वर्षे वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी १०% वाढीसह. वेबसाइट पत्ताः - सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टलवर उपलब्ध आहेत http://www.ireps.gov.in सहभागींना अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट देण्याची विनंती आहे.

71

**अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है**

## जाहीर नोटीस

सर्वत्रास विशेषतः शहर व तालुका बार्शी येथील लोकांस, जाहीर नोटीस देणेस सांगितलेवरून, जाहीर नोटीस देणेत येते की,

डी. सोलापूर, सब डी व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील अकृषीक प्लॉटस गट नं. १३४०/१/२/५० क्षेत्रफळ १०२.४२ चौ.मी व गट नं. १३४०/१/२/५१ क्षेत्रफळ ९९.१९ चौ. मी. याची एकत्रित चतुः सीमा पूर्वेसः ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेसः गट नं. १३४०/१ पैकी प्लॉट नं. ५७, पश्चिमेसः प्लॉट नं. ४८ व ४९, उत्तरेसः प्लॉट नं. ५२ येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक खुले प्लॉटस् तदंगभूत वस्तू वहीवाटीचे हक्कासह.

वरील प्लॉटसचे मालकाने ते विक्रीस काढले. आमचे अशील व त्यांचेमध्ये प्लॉटचे खरेदीविषयी बोलणी होऊन तसा ठराव, करार झालेला आहे. त्याप्रमाणे आमचे अशील पुढील दोन दिवसांत प्लॉटची रजि, खरेदी करणार आहेत.

तरी वर नमूद दोन्ही प्लॉटचे मालकी, कब्जे, वहिवाट, बँक व खाजगी कर्जबोजा, दान, गहाण, टाच, लीन, लीज, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र इ. किंवा तत्सम स्वरुपात कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क, अधिकार असतील त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत त्यांचे कायदेशीर हक्क, अधिकाराची कागदपत्र पुराव्यानिशी खातरजमा करून द्यावी नसता सदर दोन्ही प्लॉट हे निर्वेध, निजोखमी, बिनबोजाचे आहेत, त्याबद्दल कोणाचेही कसलेही हक्क अधिकार नाहीत, असलेस त्यांनी ते स्वतःहून कायमस्वरूपी सोडून दिले आहेत, असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील मग नमूद मुदतीनंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार चालणार नाही, विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस दिली. ता. ३१/१०/२०२५

**सही/-**
**ॲड. श्री. कोकाटे एस. एस** (ॲडव्होकेट व नोटरी),
**ॲड. श्री. घेवारे केदार एन्.**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११/२०२५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

१. सौ. ज्योती जगदिश तंबाके (लग्नानंतरचे नाव)
ज्योती अशोक मंदा (लग्नापूर्वीचे नाव)
२. सौ. योगिता सुरेश जलदे (लग्नानंतरचे नाव)
योगिता अशोक मंथा (लग्नापूर्वीचे नाव) -- **अर्जदार**
३. सौ. सुजाता सचिन मेंथे (लग्नानंतरचे नाव)
सुजाता अशोक मंधा (लग्नापूर्वीचे नाव)
४. गोल्लप्पा अशोक मंथा

**विरुध्द**

**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टीफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. यातील अर्जदार नं.१ ते ४ अशोक गुरुशांतप्पा मंथा हे दि. ०८/०३/२०२५ रोजी H. No. 8-11-182/ Panchmukhi Colony Raichur (D) Karnatak येथे अपघातामध्ये मयत अशोक गुरुशांतप्पा मंथा यांची पत्नी नागूबाई अशोक मंधा ही दि. १६/०६/२०२४ रोजी दुधनी, ता. अक्कलकोट येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार नं.१ ते ४ हे नात्याने मुले व मुली म्हणून त्यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार नं.१ ते ४ यांची आई कै. नागूबाई अशोक मंथा यांचे नावे विकास ग्रामीण बँक शाखा मुधोळ कर्नाटक या बँकेमध्ये खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे दोन फिक्सड डिपॉझिटच्या रक्कमा आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | खाते नंबर | रक्कम |
|---|---|---|
| १. | ००००००८९१५७०२४९१९ | ११४७६/- |
| २. | ००००००८९१५०४८९६२१ | १,८५,७६९/- |

येणेप्रमाणे एकूण रक्कम रुपये १९७२४५/- वर नमुद बँकात अर्जदार यांची आई कै. नागूबाई अशोक मंथा यांचे नावे जमा आहेत. अर्जदार हे मयताचे मृत्यूपश्चात वारसा दाखला (हेअरसर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थ तमाम लोकांना जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देणेबाबत कोणाचेही कसलीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत अथवा उक्त नेमलेल्या तारखेस दिनांक ३१/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस जाहीर करुन देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले. दिनांक ३०/१०/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

## सांगोले नगरपरिषद सांगोले
## जि. सोलापूर

जा. क्र./सानप/०१/५०५८

दि. ३० ऑक्टो. २०२५

## अंतिम आरक्षण जाहीर सूचना

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ सदस्य पदासाठी दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी सोडत काढण्यात आली होती. सदर आरक्षणावर विहित मुदतीत एकही हरकत अथवा सूचना प्राप्त न झालेने सदर आरक्षणास मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत अंतिम मंजुरी करीता मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना पाठविले असता त्यास दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. त्यास अनुसरुन सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ सदस्य पदाचे आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| २ | २ | अ | अनुसूचित जाती |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| ३ | ३ | अ | अनुसूचित जाती महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ४ | ४ | अ | सर्वसाधारण महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ५ | ५ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| ६ | ६ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ७ | ७ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| ८ | ८ | अ | अनुसूचित जाती महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ९ | ९ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| १० | १० | अ | सर्वसाधारण महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ११ | ११ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| | | क | सर्वसाधारण |

**सही/-**
**(डॉ. सुधीर गवळी)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद सांगोला**

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक २८ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**''बी-१ निविदा''**
**(सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त)**

**संदर्भः- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि.१४/०२/२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या **(सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त)** यांचेकडून खालीली कामा करिता **''बी-१''** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | तुळजापूर इटकळ हन्नूर चपळगाव अक्कलकोट अक्कलकोट स्टे. नागनसूर गाणगापूर राज्य मार्ग क्र. रा. मा. २०८ किमी ३९/00 ते ४२/५०० ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | १०.८० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २ | हन्नूर-किणी-बोरगांव-वागदरी राज्यसिमा (आळंद) राज्यमार्ग क्र २३० सा. क्र. ६/००० ते २५/००० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर. | बी-१ निविदा | २७.१४ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| ३ | रा.म.क्रं ९ ते मुळेगांव दर्गनहळ्ळी धोत्री बोरगांव हन्नूर ते सुलतानपूर ते किणी काजी काणबस ते नळदुर्ग (जिल्हाहद्द) प्रजिमा के ४३ सा.क्र. १९/८०० ते ४६/००० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३०.६ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| ४ | कणबस करजगी घुंगरेगांव ते शावळ प्रजिमा ४६ सा. क्र/९००० ते १४/५०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ११.४८ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ५ | सुलेरजवळगे केगाव (बु) मुंढेवाडी अंकलगी रस्ता प्रजिमा क्रमांक ४९ सा. क्र. १४/००० ते २९/२०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर, | बी-१ निविदा | १२.३८ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ६ | सुलेरजवळगे मंगरुळ ते देवीकवठे प्रजिमा ५१ सा. क्र. ०/००० ते १३/४०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर. | बी-१ निविदा | १३.८२ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ७ | रा.मा.-२०४ ते रुध्देवाडी तळेवाड सातनदुधनी उटगी-कडबगांव अक्कलकोट स्टेशन जेऊर हंजगी कर्जाळ हाळहळ्ळी ते चप्पळगाववाडी चप्पळगांव मोटयाळ साफळे ला मिळणारा प्रजिमा ५२. किमी.सा.क्र. ०/००० ते २३/४०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | १३.१४ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ८ | किणी बादोले बुद्रुक शिरवळ सदलापूर सलगर तोरणी ते मैंदर्गी सातनदुधनी बोरोटी (खु) बारोटी (ब) बबलाद दुधनी ते दुधनी ग्रामिण ते अर्जूनगी प्रजिमा क्रं ५४ किमी. ०/००० ते १४/००० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ९.९० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ९ | अक्कलकोट निमगांव हत्तीकणबस चिक्केहळ्ळी सलगर भोसगी ते हिप्परगा राज्यहद्दीपर्यंत प्रजिमा क्र.१५६ सा. क्र. ०/००० ते २०/००० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | १८.०० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १० | सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट कंटेहळ्ळी गळोरगी उडगी कल्लप्पावाडी रस्ता प्रजिमा-१५७ सा. क्र. ००/०० ते १८/०० मध्य सुधारणा करणे. | बी-१ निविदा | १२.१५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ११ | लांबोटी रानमसले वडाळा रस्ता प्रजिमा ३५ कि. मी. १८/८०० ते २७/९०० मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ता उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | २४.३० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १२ | बाळे देगाव बेलाटी रस्ता प्रजिमा- १८६ कि. मी ०/०० ते ७/०० मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | १५.३० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १३ | कौठाळी ते मुंगशी रस्ता (प्र.जि.मा. २५) किमी ०/०० ते ३/००, खुनेश्वर ते रानमसले रस्ता (प्र.जि.मा. १४२) किमी १०/०० ते १९/४०० व शेळगाव ते कौठाळी रस्ता (प्र.जि. मा. १०७) किमी ०/० ते ३/००० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १९.८० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १४ | नरखेड ते वडाळा रस्ता (प्र.जि.मा. ३४) किमी १०/०० ते १९/४०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | २१.०६ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १५ | सादेपूर निंबर्गी कदलगांव गावडेवाडी मनगोळी प्रजिमा ४१ कि.मी. ०/० ते २४/० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १४.४० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १६ | बोराळे सिध्दापूर वडापूर-अंत्रोळी-कंदलगांव गुंजेगांव ते प्रजिमा ६ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ६३ कि.मी. ८/५०० ते ३२/५०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | २२.८६ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १७ | शेळगी दहिटणे बक्षीहिप्परगे वडजी ते जिल्हा हद रस्ता प्रजिमा-१४७ कि.मी. ३/०० ते १२/८०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १०.८० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १८ | बोळकवठे-औराद-होनमुर्गी ते रा.मा. १३ ला जोडणारा रस्ता प्रजिमा १५० कि.मी. ०/० ते १४/५०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १८.९० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १९ | भोगांव मार्डी होनसळ रस्ता प्रजिमा- ३९ कि. मी. ०/०० ते १६/९०० मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३४.२ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| २० | होटगी स्टेशन-आहेरवाडी बंकलगी-सुलेरजवळगे मुंढेवाडी-अंकलगी रस्ता प्रजिमा ४९ कि.मी. ०/०० ते १४/०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १९.३५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २१ | मंद्रुप-निंबर्गी भंडारकवठे रस्ता प्रजिमा ६० कि.मी. ०/० ते १६/४०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | २५.२ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २२ | कुंभारी-कर्देहळ्ळी-तोगराळी-यत्नाळ-होटगी मद्रे रस्ता प्रजिमा १४८ कि.मी. ०/० ते २४/०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १३.२३ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २३ | भंडारकवठे माळकवठे औज (मंद्रूप) ते तद्देवाडी रस्ता प्रजिमा १९९ कि.मी. ०/०० ते २२/६०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १५.७५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २४ | औज-हिपळे-वळसंग-तिर्थ रस्ता प्रजिमा १४९ कि.मी. ०/० ते १८/५०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १९.०४ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २५ | टाकळी चिंचपूर बरुर हत्तरसंग कुडल रस्ता प्रजिमा २०२ कि. मी. ०/०० ते ११/०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १०.५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २६ | (प्रजिमा-४६) ते कुडल देवीकवठे म्हैसलगी खानापूर अंकलगे गुडेवाडी आळगे शेगांव ने मुंढेवाडी प्रजिमा क्र ४९ ला मिळणारा प्रजिमा क्र. ५९ सा.क्र. ०/००० ते ३३/००० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ११.२५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २७ | किणी कुरनूर मोटयाल रस्ता प्रजिमा-१५३ किमी. ०/०० ते १२/०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर. | बी-१ निविदा | ११.२५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २८ | लवंगी कारकल औज (मंद्रूप) ते कुरघोट रस्ता प्रजिमा १५२ कि.मी. ०/० ते १४/६०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर. | बी-१ निविदा | १८.०० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २९ | रा.मा. २०५ ते नागोरे इब्राहिमपुर मुगळी ते रा.म. २०५ प्रजिमा क्र.५५ किमी ०/०० ते १३/७०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | २७.९ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| ३० | रा.मा.२०८ ते ब-हाणपूर ते डॉबरजवळगे बोरगांव दर्शनाळ अरळी ते नन्हेगांव हन्नूर चुंगी ते प्रजिमा ५५३ ला मिळणारा प्रजिमा के १५४ सा.क्र.०/००० ते ३०/००० मधी देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३६.९९ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |

| | | |
|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. ३१/१०/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते ०७/११/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | --------------निरंक---------------- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक | :- | दि ०७/११/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर 'बीड लॉक' झाल्यानंतर ७२ तासात 'हार्ड कॉपी' १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. **१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | :- | दि. ०८/११/२०२५ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापुर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

१. निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. कंत्राटदारानी निविदा भरताना लेबर फेडरेशन कडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन ऑनलाईनवर अपलोड करणे अनिवार्य आहे. अन्यथा आर्थिक लखोटा उघडणेत येणार नाही.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/-**
**(मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मिताली राज, करीना कपूरने केले ट्रॉफी वॉकआउट



**मुंबई** : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या दुसऱ्या उपांत्य सामन्याच्या सुरुवातीला भारताची माजी कर्णधार मिताली राज आणि युनिसेफ इंडियाची राष्ट्रीय राजदूत अभिनेत्री करीना कपूर खान यांनी ट्रॉफी वॉकआउटचे नेतृत्व केले. त्यांच्यासोबत लुब्ना शाह, गौरव शर्मा आणि युनिसेफ इंडिया प्रतिनिधी सिंथिया मॅकक्रॅफ्रे ही दोन मुले होती. आयसीसी-युनिसेफ जागतिक भागीदारी शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षित पाणी आणि हिंसाचारापासून संरक्षण या सर्व मुलांच्या हक्कांचे, विशेषतः सर्वात असुरक्षित मुलींसाठी, समर्थन करण्यासाठी जगभरातील क्रिकेटच्या पोहोचाचा फायदा घेते. प्रॉमिस टू चिल्ड्रन डिजिटल मोहीम सप्टेंबर २०२५ मध्ये आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकासाठी सुरू करण्यात आली. भारत आणि कोलंबोमधील सामन्यांच्या ठिकाणी वाढणारी ही मोहीम क्रिकेट चाहते, खेळाडू आणि प्रेक्षकांना सुरक्षित, शिक्षित आणि सक्षम होण्याच्या प्रत्येक मुलाच्या अधिकाराचे समर्थन करण्यासाठी युनिसेफसोबत उभे राहण्याचे आवाहन करते.

### भारत, ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी दिली ऑस्टिनला श्रद्धांजली

**नवी मुंबई** : भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी गुरुवारी महिला विश्वचषक उपांत्य सामन्यादरम्यान किशोरवयीन क्रिकेटपटू बेन ऑस्टिनला श्रद्धांजली म्हणून काळ्या हाताच्या पट्ट्या बांधल्या. सराव दरम्यान चेंडू लागून निधन झालेल्या बेन ऑस्टिनला श्रद्धांजली. मंगळवारी मेलबर्नच्या उपनगरातील फर्न्ट्री गली क्रिकेट क्लबमध्ये फलंदाजी करताना १७ वर्षीय ऑस्टिनच्या मानेला दुखापत झाली. त्याने त्याच्या क्लबसाठी सराव करताना हेल्मेट घातले होते ज्यामध्ये नेक गार्ड नव्हता आणि साइड-आर्मने फेकलेल्या चेंडूमुळे तो जखमी झाला. टी-२० सामन्यापूर्वी ऑस्टिन नेटमध्ये वेगवान गोलंदाजांविरुद्ध फलंदाजी करत असताना त्याच्या सहकाऱ्यांसमोर त्याला प्राणघातक झटका बसला.

### पंजाब एफसीने पटकावले पीएसएलचे विजेतेपद

**मोहाली** : पंजाब एफसीने गुरुवारी पंजाब स्टेट सुपर फुटबॉल लीग २०२५ चे विजेतेपद जिंकले. पंजाब एफसीच्या जवळचा प्रतिस्पर्धी शेर-ए-पंजाब स्पोर्ट्स क्लबने सीमा सुरक्षा दल फुटबॉल क्लब विरुद्धच्या आपल्या शेवटच्या सामन्यात गुण गमावले. १७ सामन्यांनंतर पंजाब एफसीचे ३९ गुण आहेत, तर शेर-ए-पंजाब स्पोर्ट्स क्लबचे तेवढ्याच सामन्यांमध्ये ३४ गुण आहेत, ज्यामुळे इतर कोणत्याही संघाला शेर्सच्या बरोबरी करणे अशक्य झाले आहे. हे क्लबचे दुसरे पंजाब स्टेट लीग जेतेपद आहे. यापूर्वी, त्यांनी २०२२-२३ मध्ये आपले पहिले विजेतेपद पटकावले होते. ते २०२४-२५ हंगामात उपविजेतेपदावर राहिले. त्यांच्या विजेतेपदाच्या मालिकेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे संघाचा भक्कम बचाव, १७ सामन्यांमध्ये १२ क्लीन शीट्स नोंदवल्या गेल्या आहेत.

### सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त बार्शीत आज 'रन फॉर युनिटी' एकता दौड

**बार्शी, दि. ३० ऑक्टोबर-**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बार्शी शहर पोलीस ठाणे आणि सोलापूर ग्रामीण पोलीस यांच्यावतीने 'रन फॉर युनिटी' एकता दौड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम राष्ट्रीय एकता दिनाच्या औचित्यावर राबविण्यात येत असून, समाजात बंधुत्व, राष्ट्रप्रेम व एकात्मतेचा संदेश देण्याचा उद्देश आहे. ही स्पर्धा शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता बार्शी शहर पोलिस ठाणे येथे आयोजित केली असून या उपक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### कासेगावचा पैलवान जयराज चौगुलेला कांस्य

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**



बेळगाव येथे झालेल्या मिसन ऑलिंपिक फेडरेशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत कासेगावच्या जयराज भिमराव चौगुले याने कांस्य पदक संपादिले. त्याचे कासेगाव ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# दक्षिण आफ्रिका अ २ बाद २९९

## जॉर्डन, झुबायर, रुबीनची अर्धशतके

◆ **बंगळुरू, ३० ऑक्टोबर**

येथे गुरुवारपासून भारत अ संघाविरुद्ध सुरु झालेल्या पहिल्या अनाधिकृत कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी सलामीवीर जॉर्डन हर्मन (७१), झुबायर हामझा (६६) व रुबीन हर्मन (५४) यांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिका संघाने पहिल्या डावांत ८५.२ षटकांत ९ बाद २९९ धावा उभारल्या.

भारत अ संघाचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित भारताच्या मध्यम गती वेगवान गोलंदाज अंशुल कम्बोजने डावाच्या प्रारंभी चौथ्या षटकांत दक्षिण आफ्रिकेला पहिला धक्का दिला. तनुषने सलामी जोडीदार लेसेगो सेनोक्वानेला भोपळा न फोडू देताच तंबूत परत पाठविले. सहा धावांतच पहिला गडी गमावल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने जोरदार मुसंडी मारली. सलामीवीर जॉर्डन हर्मन व झुबायर हामझाने आपापले अर्धशतक साजरे करत दुसऱ्या गड्यासाठी १३२ धावांची भागीदारी केली. गुरनूर ब्रारने झुबायरला यष्टिमागे झेल देण्यास भाग पाडले. झुबायरने १०९ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह ६६ धावांची खेळी केली. पुढे जॉर्डनने कर्णधार मार्कीस एकरमन (१८) याच्यासोबत तिसऱ्या गड्यासाठी ३२ धावांची भागीदारी केली. फिरकीपटू तनुष कोटियानने मार्कीसला बाद केल्यानंतर जॉर्डन हर्नमनला पायचित करून त्याची घोडदौड रोखली. जॉर्डनने १४१ चेंडूंचा सामना करत ८ चौकारांसह ७१ धावांचे योगदान दिले. पुढे रूबीन हर्नमन व तियान व्हॅन वुरेनने सहाव्या गड्यासाठी ७२ धावांची भागीदारी केली. कोटियानच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी रूबीनने ८७ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ५४ धावांची अर्धशतकी खेळी केली.



जॉर्डन हर्मन
झुबायर हामझा

पुढे तियान व्हॅन मानव सुतारच्या गोलंदाजीला बळी पडला, त्याचे चार धावांनी अर्धशतक हुकले. तियानने ७५ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ४६ धावांची भर घातली. तनुषने प्रेनेलन सुब्रायेनच्या (१) रुपात आपला चौथा बळी मिळविला. खलील अहमदने लुथो सिपमलाचा पायचित केल्यानंतर खेळ थांबला तेव्हा दक्षिण आफ्रिकेने ८५.२ षटकांत ९ बाद २९९ धावा केल्या. त्शेपो मोरेकी चार धावांवर नाबाद राहिला. भारत अ संघाकडून तनुष कोटियानने ४ बळी, मानव सुतारने २ ब ळी, तर खलील अहमद, अंशुल कम्बोज व गुरनूर ब्रारने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# मी तंदुरुस्त होण्याच्या मार्गावर : श्रेयस

◆ **सिडनी, ३० ऑक्टोबर**

मी तंदुरुस्त होण्याच्या मार्गावर असून दिवसेंदिवस बरा होत आहे, असे भारताचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यरने गुरुवारी सांगितले.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हर्षित राणाच्या गोलंदाजीवर ॲलेक्स कॅरीचा कठीण झेल घेण्याचा प्रयत्न करताना ३० वर्षीय श्रेयस याच्या डाव्या बरगडीच्या खालच्या भागात दुखापत झाली होती.



मी सध्या बरे होण्याच्या प्रक्रियेत आहे आणि दररोज बरा होत आहे, असे अय्यरने दुखापतीनंतर पहिल्यांदाच आपल्या एक्स आणि इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केले.

मला मिळालेल्या सर्व शुभेच्छा व पाठिंबा पाहून मी मनापासून आभारी आहे, असे तो म्हणाला.

भारताचा एकदिवसीय उपकर्णधार अय्यर सुरुवातीला फिजिओच्या मदतीने मैदानाबाहेर गेला होता, परंतु नंतर त्याची प्रकृती खालावली कारण त्याचे महत्त्वाचे पॅरामीटर्स घसरले आणि तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यानंतरच्या चाचण्यांमध्ये प्लीहामध्ये जखम झाल्यामुळे अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याचे दिसून आले, त्यानंतर त्यांना जवळून निरीक्षणासाठी आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले.

अय्यरची प्रकृती स्थिर झाली आहे आणि त्यांना अतिदक्षता विभागात (आयसीयू) हलवण्यात आले आहे, अशी पुष्टी बीसीसीआयने मंगळवारी केली होती. (वृत्तसंस्था)

# राज्य धनुर्विद्या स्पर्धेत साखरे बंधूची कामगिरी

**नमला ३ सुवर्ण, १ ब्राँझ; नयनला सांघिक सुवर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**





राज्य शालेय धनुर्विद्या स्पर्धेत धनुर्धर अकॅडमीच्या नमन व नयन साखरे बंधूनी ५ पदकांची कमाई केली. नमनने रिकर्वमध्ये ओव्हर ऑल, मिक्स व एलिमेशमध्ये ३ सुवर्ण व १ ब्रॉंझ अशी ४ पटकाविली. नयनने सांघिक कपाउंड गटात सुवर्ण पटकाविले. नमनची या कामगिरीवर महाराष्ट्र संघात निवड झाली. शालेय राष्ट्रीय स्पर्धा वाराणसी येथे होणार आहेत. हे दोघे इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसईचे विद्यार्थी आहे. त्यांना प्रशिक्षक दिपक चिकणे, स्कूलचे क्रीडा शिक्षक राजकुमार माने, सचिन धवन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अकादमीचे मार्गदर्शक प्रा संतोष गवळी, सचिन गायकवाड यांनी अभिनंदन केले.

# भारत विजय मिळविण्यास उत्सुक

◆ **मेलबर्न, ३० ऑक्टोबर**

भारत आणि ऑस्ट्रेलियातदरम्यानच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील कॅनबरा येथील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आल्यानंतर दोन्ही संघ शुक्रवारी दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी सज्ज झाले आहे. दोन्ही संघ विजय नोंदवण्यास उत्सुक झाले असतील.

कॅनबेरामधील सामना पूर्णत्वास गेला नसला तरीही कर्णधार सूर्यकुमार यादवला फलंदाजीचा सूर गवसल्याचा संघ व्यवस्थापनाला आनंद वाटतो. सूर्यकुमारने २४ चेंडूत ३९ धावा ठोकून फॉर्ममध्ये पुनरागमन केले आणि जोश हेझलवुडला मारलेला १२५ मीटरचा षटकार दीर्घकाळ स्मरणात राहील. अभिषेक शर्मा, तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांसारखे युवा खेळाडूही फटकेबाजी करण्यास उत्सुक असतील.



मिचेल मार्श



सूर्यकुमार यादव

तथापि, कॅनबेरामध्ये पावसाचा निर्णय अंतिम होता व सामना रद्द करण्यात आला होता, तेव्हा भारताची ९.४ षटकांनंतर १ बाद ९७ अशी स्थिती होती. सूर्यकुमार व शुभमन गिल दोघेही ऑस्ट्रेलियन आक्रमणाची धार बोथट करण्याच्या मनस्थितीत होते.

मेलबर्नमध्ये शुक्रवारीही पावसाचा अंदाज आहे, परंतु त्याची तमा न बाळगता भारतीय संघाला मालिकेतील पहिल्या सामन्यात जिथे थांबले होते, तिथून पुन्हा सुरुवात करण्याचा प्रयत्न करावा लागेल. या दुसऱ्या सामन्यासाठी सूर्यकुमारला फॉर्म गवसल्याचे बघून संघ व्यवस्थापनाला आनंद झाला असेल. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने राबवलेल्या उच्च-जोखीमपूर्ण पद्धतीसह विश्वचषकाच्या मार्गावर सुरू आहे.

गंभीरला भारतीय संघाने नियमितपणे २५०, २६० पेक्षा जास्त धावा कराव्यात अशी इच्छा आहे. गत काही महिन्यांत भारतीय खेळाडूंनी केलेली तडाखेबंद फलंदाजी ही स्पष्टपणे दर्शवते की भारत व श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या काही महिन्यांपूर्वी फलंदाजांनी गंभीरच्या तत्वज्ञानाचा स्वीकार केला आहे. या सामन्यात भारतीय संघ गत उन्हाळ्यात अमेरिकेत जिंकलेल्या विजेतेपदाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करेल. भारताला कॅनबेरा येथे गोलंदाजी करण्याची संधी मिळाली नाही परंतु त्या विभागाचा विचार केला तर, भारताकडे जसप्रीत बुमराहचा दर्जा आणि वरुण चक्रवर्तीची युक्ती आहे. कुलदीप यादव आणि अक्षर पटेलसारखे गोलंदाज एक शक्तिशाली आक्रमण तयार करतात. तरीही भारतीय गोलंदाजांना मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेडविरुद्ध प्रभावी कामगिरी करावी लागेल.

ऑस्ट्रेलियाचा टी-२० संघ आक्रमक क्रिकेट खेळण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करतो. हेड, मार्श, मार्कस स्टोइनिस, टिम डेव्हिड व जोश इंग्लिस सारख्या खेळाडूंमध्ये मोठी धावसंख्या उभारण्याची क्षमता आहे, तेव्हा भारतीय संघालाही आक्रमक पवित्रा घ्यावा लागेल.

वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क टी-२० मधून निवृत्त होत आहे आणि पॅट कमिन्स दुखापतीतून सावरत आहे, त्यामुळे गोलंदाजीचा अनुभव थोडा कमी दिसत आहे. झेव्हियर बार्टलेट, मॅथ्यू कुहनेमन व नॅथन एलिसचा समावेश असलेल्या आक्रमणाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी हेझलवूडवर आहे. (वृत्तसंस्था)

**भारत-ऑस्ट्रेलिया दुसरा टी-२० सामना**

**स्थळ** : मेलबर्न क्रिकेट मैदान, मेलबर्न
**वेळ** : दुपारी १.४५ वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



# हरीभाई देवकरण, संगमेश्वर कॉलेज अंतिम फेरीत

**शालेय शहर क्रिकेट स्पर्धा : ह.देच्या आदित्य तमनूरचे शानदार शतक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

शालेय शहर क्रिकेट स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलांच्या गटात ह. दे. व संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने अंतिम फेरीत प्रवेश केला.

हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत शहरातील १५ संघांनी भाग घेतला आहे. गुरुवारी झालेल्या उपांत्य सामन्यात हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाने एच. एन. कनिष्ठ महाविद्यालयाचा पराभव केला. यात ह.दे.च्या आदित्य तमनूर (१०१) याने शानदार शतक झळकाविले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात संगमेश्वर महाविद्यालयाने निर्मलाताई ठोकळ कनिष्ठ महाविद्यालयावर विजय मिळविला.

या प्रसंगी सोलापूर महानगरपालिका सहाय्यक आयुक्त मनीषा मगर यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी महानगरपालिका क्रीडा अधिकारी, श्रीकांत घोलप, ह.दे. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, अप्पासाहेब राऊत, राहुल हजारे, संतोष खेंडे, प्रमोद चुंगे, प्रकाश कंपली व अक्षय गवळी आदी उपस्थित होते.

# क्रिकेटपटूंसाठी अपघात विमा योजना सुरु

**सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा अभिनव उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित आमंत्रित स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा १४ वर्षाखालील संघ पुण्याकडे रवाना झाला असून हे सामने ३० ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या कालावधीत पुणे येथे होणार आहेत. या संघातील खेळाडू व एका पालकांचा दोन लाख रुपयांचा विमा सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेकडून उतरविण्यात आला आहे.

सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेने महाराष्ट्रात प्रथमच खेळाडूंसाठी अशी योजना सुरू केली असून या योजनेत हॉस्पिटलचा संपूर्ण खर्च समाविष्ट आहे. त्याचा चेक ओरियंटल इन्शुरन्सचे एजंट जॉय म्हेत्रस यांना देण्यात आला. हा चेक सुपूर्द करताना सोलापूर शहर भाजपचे माजी अध्यक्ष नरेंद्रजी काळे यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी प्रकाश भुतडा, सचिव चंद्रकांत रेंबर्सू, सुनील मालप, निलेश गायकवाड आदी उपस्थित होते. सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजीतसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष दिलीप माने, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे, सचिव खासदार धैर्यशील मोहिते पाटील, सहसचिव चंद्रकांत रेंबर्सू आणि खजिनदार संतोष बडवे उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख, यांच्या संकल्पनेतून संघटनेतर्फे खेळाडूंच्या हितासाठी विविध नवनवीन योजना राबविण्यात येत आहेत. त्यातील हा एक महत्वाचा उपक्रम आहे.



**४२८ खेळाडूंमधून २२ जणांचा संघ जाहीर**

जिल्हा संघ निवडीसाठी जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर निवड चाचणी झाली. यात शहर व जिल्ह्यातील ४२८ खेळाडू सहभागी झाले होते. यातून अंतिम २२ जणाचा संघ अप्पू गोटे, राजू रंगम व नीलेश गायकवाड या निवड समितीने निवडला. **संभाव्य संघ :** विहान येवणकर, आनंद शेंडे, अभिषेक देशमुख, श्रीराज कबाडे, आर्यन हंगे, यश लोंढे, रुद्र चौगुले, कार्तिक पाटोळे, रणवीरसिंग बोमरा, ऋग्वेद पाटील, अनुज वाल्मिकी, अविर पवार, गौरव गाडेकर, निमिष काळेल, सम्राट बोबडे, कृष्णराज देशमुख, हर्ष जगताप, तन्मय घोडके, विराज सलगर, श्लोक आनंद, ध्रुव शिंदे, संस्कार गवळी. प्रशिक्षक : नीलेश गायकवाड.

# जिल्हा क्रीडा संकुलातील १३ कोटी रुपयांचे काम संथ गतीने

**कामाची पुण्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या टीमची पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या १३ कोटी रुपयांच्या कामास सुरवात झाली असून हे काम संथ गतीने सुरू आहे. चार डिसेंबरला २०२४ला स्पोर्टस् फॅसिलिटीज कंपनी प्रायव्हेट लिमिटेडला हा ठेका दिला असून यातून ४०० मीटरचा सिंथेटिक ट्रॅक, बॅडमिंटन इनडोअर हॉल नुतनीकरण, मुला- मुलींची वसतीगृहाचे नुतनीकरण व अंतर्गत रस्ते ही कामे सुरू आहेत. दोन महिने राहिले तरी ५० टक्केही काम झाले नाही. त्यामुळे ही काम जलद गतीने करावे, असे पत्र जिल्हा क्रीडा कार्यालयाने सार्वजिनक बांधकाम विभागास दिले आहे.

दरम्यान या सर्व कामाची पाहणी दक्षता व गुन्हा नियंत्रण पुणे विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी व त्यांची टीमने ही पाहणी केली. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड आदी उपस्थित होते.



**सोलापूर :** जिल्हा क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्त्याची पाहणी करताना पुणे विभागाच्या दक्षता व गुन्हा नियंत्रण विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी व त्यांची टीम. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड.



# रानवेध, आम्ही मंद्रूपकर टीमतर्फे क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष टेळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट पंच असोसिएशनच्या अध्यक्षपदी नंदकुमार टेळे यांची निवडीबद्दल आम्ही मंद्रूपकर व रानवेध फाउंडेशन तर्फे सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास जगन्नाथ खरात, सचिन साठे, रवी केवटे, रसुल शिकलगार, उदय देशपांडे, नितीन खराडे, मामा खांडेकर, विनोद कामतकर आदी उपस्थित होते. मंद्रूपचे श्री. टेळे हे जिल्हास्तरीय संघटनेचे नेतृत्व करण्यासोबत नवोदित खेळाडू, पंच घडविण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांमुळे मंद्रूपकरांचा गौरव होतोय, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. पंचांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी प्रशिक्षण उपक्रम राबवण्याचा संकल्प असल्याचे अध्यक्ष श्री. टेळे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# निधीच्या अनियमित्तेबद्दल खासदार प्रणिती शिंदेंनी आयुक्तांना विचारला जाब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

शहरातील नॅशनल क्लीन एअर प्रोजेक्टच्या अंमलबजावणीत गंभीर गैरव्यवस्था, पारदर्शकतेचा अभाव आणि प्रशासनातील निष्काळजीपणा असल्याचे निदर्शनास आणून खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर महानगरपालिकेला पत्राद्वारे जाब विचारला आहे.



खासदार शिंदे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, सोलापूर शहरात नॅशनल क्लीन एअर प्रोग्रमच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आणि अनियमितता दिसून येत आहे. विशेषतः या कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या निधीचा वापर, प्रक्रियेतील पारदर्शकता आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या सहभागाच्या अभावाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय प्रमुख म्हणून, या अंमलबजावणीची जबाबदारी ही आपली आहे. तथापि, निधीचा वापर कसा आणि कुठे करण्यात आला याबाबत माहिती अत्यंत अस्पष्ट असून, नागरिकांना वा लोकप्रतिनिर्धीना याची पुरेशी कल्पना दिली गेलेली नाही. यामुळे निधीच्या प्रभावी वापराबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या प्रस्तावांना प्राधान्य देऊन, इतर पक्षांच्या प्रतिनिधींच्या सूचना दर्लक्षित केल्या जात असल्याचे आढळून आले आहे. ही प्रवृत्ती लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात आहे. मी हा विषय लोकलेखा समितीसमोर मांडलेला असून, नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्यामार्फत सोलापूर मधील प्रकल्पांचे कार्यक्षम तेचे लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी औपचारिक मागणी केलेली आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय टाळणे आणि कार्यक्रमाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यत पोहोचवणे ही आपल्या प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. या बाबींकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही, तर संसदेत आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी खा. शिंदे यांनी केली आहे.

# पांढरा कांदा खातोय जास्त भाव

## बाजार समितीत आवकसह कांद्याचे दर घसरललेच; शेतकरी बनला हवालदिल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील चार दिवसांत ६०० ट्रकहून अधिक कांदा विक्रीसाठी आला आहे. गुरुवारी सुमारे १५ हजार ३३१ क्विंटल लाल तर १ हजार २०२ क्विंटल पांढरा कांदा विक्रीसाठी आला होता. गतवर्षीच्या तुलनेत आवक खूप कमी असताना देखील भाव वाढलेले नाहीत. सध्या कांद्याला सोलापूर बाजार समितीत प्रतिक्विंटल नऊशे ते अकराशे रुपयांपर्यंत सरासरी भाव मिळत आहे.

दरम्यान, मागील तीन वर्षांत ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर म हिन्यात सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सुमारे १५ हजार गाड्या कांदा विक्रीसाठी आल्याचे पाहायला मिळाले. पण, यंदाच्या अतिवृष्टी व पुरामुळे सोलापूर बाजार समि तीतील कांद्याची आवक घटली आहे. सरासरी भाव देखील मागील सहा महिन्यांपासून दीड हजारांवर गेलेला नाही. सोलापूर, बीड, धाराशिव, पुणे, नाशिक या जिल्ह्यातील कांद्याचे हजारो हेक्टर क्षेत्र अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झाले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील कांदा अजूनही अपेक्षेप्रमाणे बाजार समितीत आलेला नाही. सांगली, कर्नाटक, बीड येथून कांदा येऊ लागल्याचे बाजार समितीतील अधिकाऱ्यांनी सांगितले. सध्या सोलापूर बाजार समितीत लाल कांद्याला किमान १०० रुपये आणि जास्तीत जास्त २२०० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. सरासरी भाव ९५० ते १०५० रुपयांपर्यंत आहे. दुसरीकडे पांढऱ्या कांद्याला प्रतिक्विंटल २०० रुपये ते ३२०० रुपयांपर्यंत भाव आहे. दोन दिवसांपूर्वी पांढऱ्या कांद्याला सरासरी १७०० रुपये भाव होता, तो आता दोनशे रुपयांनी कमी झाला आहे. तर लाल कांद्याचा सरासरी भाव देखील १०० रुपयांनी उतरला आहे.

बाजार समितीत पांढरा कांद्याची आवक कमी असल्याने मागणी वाढवून दर तेजीत असल्याचे दिसत आहेत. गुरुवारी देखील पांढऱ्या कांद्याला लाल कांद्यापेक्षा जास्त दर मिळाला. २०० ते ३००० सरासरी १४५० प्रतिक्विंटल असा दर पांढऱ्या कांद्याला राहिला. तर लाल कांद्याची गुरुवारी सुमारे १५,३३१ क्विंटल इतकी आवक बाजारपेठेत दाखल झाली होती. त्याला १०० ते २००० सरासरी ९५० प्रति क्विंटल असा दर मिळाला.

### शेतकरी संकटाच्या चक्रव्यूहात

सोयाबीन, उडदास अपेक्षित हमीभाव नाही. कांद्यालाही समाधानकारक भाव मिळत नाही. दुसरीकडे उसाची एफआरपी एकरकमी मिळत नाही. अतिवृष्टी व पुरात पिकांचे मोठे नुकसान झाले, तरी सरकारकडून भरपाई देखील मिळालेली नाही. डोक्यावर बँकांचे कर्ज आहे, ते फेडायचे कसे हा प्रश्न आहे.

### तीन दिवसांतील कांदा अन् सरासरी भाव

| दिवस | आवक (ट्रक) | सरासरी भाव |
|---|---|---|
| सोमवार | २२३ | १२०० |
| मंगळवार | १५३ | ११०० |
| बुधवार | १९७ | १०५० |



# पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी क्रेडाईने एक हजार शैक्षणिक साहित्य संचांचे केले वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

पूरबाधित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने क्रेडाई सोलापूर कडून १००० शैक्षणिक साहित्य संचांचे वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमाचा प्रातिनिधिक स्वरूपात वितरण कार्यक्रम जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते गुरूवारी जिल्हा परिषद शाळा तिऱ्हे येथे संपन्न झाला.

यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी कादर शेख, क्रेडाई सोलापूर अध्यक्ष अभिनव साळुंखे, उपाध्यक्ष आनंद पाटील, सचिव राजीव दीपाली, माजी अध्यक्ष अभय सुराणा तसेच क्रेडाई महाराष्ट्र उपाध्यक्ष शशिकांत जिद्दीमनी, व क्रेडाई नॅशनल चे कार्यकारिणी सदस्य सुनील फुरडे आदी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत पूरग्रस्त परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील पुरबाधित विद्यार्थ्यांना शालेय साहित्य संच दप्तर, १२ वह्या, कंपास बॉक्स, चित्रकला वही, २ पेन व पॅड आदी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. या माध्यमातून पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात नवसंजीवनी मिळावी, हा क्रेडाईचा उद्देश आहे. कार्यक्रमादरम्यान क्रेडाई सोलापूरचे अध्यक्ष अभिनव साळुंखे सांगितले की, "वास्तू विकासाबरोबरच सामाजिक जबाबदारी पार पाडणे हेही आमचे कर्तव्य आहे. शिक्षणाला आधार देणे म्हणजे भविष्याला दिशा देणे.

# डॉ. सुरेश शेळकेंना महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३० ऑक्टोबर-**



आनंद युनिवर्स फाउंडेशन, पुणे यांच्यावतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार बार्शी तालुक्याचे सुपुत्र आशा केंद्राचे कार्यकारी विश्वस्त तसेच एस. एस.ग्रो एजन्सीचे संस्थापक डॉ. सुरेश शेळके यांना नुकताच जाहीर झाला.

आनंदी युनिवर्स फाउंडेशनच्यावतीने प्रत्येक वर्षी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तुत्वान व्यक्तीचा सन्मान सोहळा संस्थेच्यावतीने करण्यात येते असतो. त्यात बार्शी तालुक्याचे सुपुत्र डॉ. सुरेश शेळके यांचाही समावेश आहे. आशा केंद्राच्या माध्यमातून आरोग्य व सामाजिक क्षेत्रात विविध प्रश्नावर काम करुन काम सुरु आहे. तसेच एस. एस.ग्रोच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन व शेतीच्या प्रश्नावर प्रभावी कामगिरी केल्यामुळे याचा फायदा अनेक सामान्य व्यक्ती व शेतकऱ्यांना झाला. त्यामुळे डॉ. सुरेश शेळके यांच्या कार्याची दखल घेत आनंदी युनिवर्स फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश विटेकर यांनी घेतली आणि राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार याची घोषणा केली. हा पुरस्कार प्रदान सोहळा पुणे येथे पंडित जवाहरलाल नेहरु सभागृह, घोले रोड, शिवाजीनगर येथे दि. १० डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. सुरेश शेळके यांना प्रदान करण्यात येणार आहे. असे संस्थेचे अध्यक्ष यांनी सांगितले.

# बार्शीतून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० ऑक्टोबर-**

बार्शी तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. तिच्या ब्युटी पार्लरमध्ये सापडलेल्या चिठ्ठीने कुटुंबीयांमध्ये खळबळ उडाली असून, वडिलांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. अज्ञात व्यक्तीने फसवून पळवल्याचा संशय असून, विहिरीतील शोध मोहिमेतही तिचा ठावठिकाणा लागला नाही.

शेतकरी वडील (वय ४५) यांच्या कुटुंबात पत्नी, मुलगा व तीन मुली असे एकत्र राहतात. वडील शेती करतात, तर आई बार्शी येथे ब्युटी पार्लर चालवतात. लापता मुलगी १२ वीत शिकत असून, तिचे वय १७ वर्षे ८ महिने ८ दिवस आहे.




२७ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.४५ वाजता वडिलांनी तिला सौंदरे येथील बस स्टॉपवरुन बार्शी येथील क्लासेससाठी सोडले. तेथून ती बार्शी बसने जाणार होती. सकाळी १०.३० वाजता आईंना पार्लरसाठी सोडण्यासाठी वडील पुन्हा सौंदरे गेले. मुलगी नेहमी दुपारी ११ वाजता गावातील बस थांब्यावर येत असे, पण १२ वाजेपर्यंत न आल्याने वडिलांनी आईंना फोन केला. आईंनी बसस्टँडवर शोध घेतला, पण ती सापडली नाही. काही वेळाने आईंनी सांगितले की, पार्लरमध्ये मुलीने लिहिलेली चिठ्ठी सापडली. चिठ्ठीत 'पुलाजवळच्या विहिरीत उडी मारुन जीव देणार' असा मजकूर होता. वडील बार्शीला धावले. विहिरीजवळ मुलीची शाळेची बॅग व फोटो सापडला. लगेच बार्शी शहर पोलीस ठाण्यात चिठ्ठी दाखवली. शहर पोलिसांनी तत्परता दाखवत पोलीस, अग्निशमन दल व नगरपालिका कर्मचाऱ्यांनी सांगितलेल्या ठिकाणच्या विहिरीतील पाणी काढून शोध घेतला, तरी मुलगी सापडली नाही.

वडिलांच्या तक्रारीनुसार, सकाळी ६.४५ ते दुपारी १२ या वेळेत हिस संकेश्वर बोल, बेदराई विहिरीजवळील पार्लरमधून अज्ञात व्यक्तीने फसवून पळवले. 'माझ्या संमतीशिवाय फूस लावून नेले', असे म्हटले आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. सीसीटीव्ही, बसस्टँड चौकशी, मोबाइल लोकेशन तपास सुरु आहे. मुलीचा फोन बंद आहे. पोलीस तपास सुरू आहे.



# पालिकेतून भाजपला हद्दपार करण्यासाठी समविचारी पक्षाची आघाडी करा

**आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांना शरद पवार यांच्या सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**

आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत बैठक झाली. यात महापालिकेतून भाजपला हद्दपार करण्यासाठी सम विचारी पक्षाची आघाडी करण्याचे आदेश दिले आहेत. स्थानिक पातळीवर कोणताही निर्णय घ्या. प्रदेश पातळीवरून आपल्यास सहकार्य मिळेल.

सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत समन्वय ठेऊन निर्णय घेण्याचे आदेश दिल्याची माहिती माजी महापौर यु.एन. बेरिया यांनी दिली. शहरातील राजकीय परिस्थितीचा आढावा पवार यांनी घेतला. बेरीया यांनी २०२५ मध्ये आगामी निवडणुकीसाठी कोणत्या उपाय योजना करावी लागणार यांची माहिती दिली. तरमहाविकास आघाडीसमवेत जागा वाटप करताना ज्यांची ज्या भागात ताकत आहे, त्यानुसार जागा वाटप करण्याचे मुद्दे मांडले. त्यावर शरद पवार यांनी सोलापूर महानगरपालिकेत भाजप हद्दपार करण्यासाठी शहरातील इतर सम विचारी पक्षाशी आघाडी करा, असे आदेश दिल्याचे बेरिया यांनी सांगितले. या बैठकीस राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार एकनाथ खडसे, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष रवि पाटील तर सोलापूर माढ्याचे आमदार अभिजित पाटील तसेच सोलापूर शहरातून माजी महापौर यु. एन. बेरिया, माजी शहराध्यक्ष महेश गादेकर, भारत जाधव आदी उपस्थित होते.

# विकासकांना आता कर आकारणीच्या एनओसीची गरज नाही : डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ३० आक्टोबर-**

शहरात आता एका जागेवर विकास करताना त्या विकास प्रकल्पासाठी विकासाकांना प्राथमिक किंवा अंतिम लेआउट मंजुरीसाठी द्यावे लागणारे महापालिका कर आकारणी विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र लागणार नाही. गुरुवारी क्रेडाईच्या बैठकीत हा आदेश पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी दिले. यामुळे आता नगर रचना विभागातील मंजुरी प्रक्रिया अधिक सुलभ व वेगवान होणार असून, विकासकांना आवश्यक असलेली प्रशासनिक स्पष्टताही प्राप्त होईल.

पालिकेतील नगर रचना विभागामार्फत विविध विकास प्रकल्पांसाठी प्राथमिक-अंतिम रेखांकन (लेआउट) मंजुरीची कार्यवाही करताना आतापर्यंत संबंधित मिळकतीसाठी कर आकारणी विभागाकडील एनओसी सादर करण्याची अट लागू होती. परंतु नगर रचना विभागाकडे सादर होणारे बहुतेक रेखांकन प्रस्ताव हे मूळतः शेतजमिनींवरील असतात. प्राथमिक रेखांकन मंजूर झाल्यानंतरच त्या ठिकाणी मूलभूत सोयीसुविधा उभारल्या जातात आणि त्यानंतरच संबंधित जमिनीचे अंतिम रेखांकन मंजूर केले जाते. त्यामुळे, अंतिम रेखांकन मंजूर होईपर्यंत ती जमीन प्रत्यक्ष वापरात नसते व त्यावर कर आकारणी करणे आवश्यक ठरत नाही. यामुळे यापुढे अंतिम रेखांकन मंजूर झाल्यानंतर विकासक स्वतः च्या नावाने संबंधित मालमत्तेची कर आकारणी करून घेतील. तसेच विक्री केलेल्या भूखंडांच्या बाबतीत संबंधित भूखंडधारक महापालिकेच्या कर आकारणी विभागाकडे नोंदणी करून त्यानुसार कर आकारणी करून घेतील. या अनुषंगाने प्राथमिक किंवा अंतिम लेआउट प्रक्रियेसाठी प्रस्ताव सादर करताना विकासकांना कर आकारणी विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक नाही, असे डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# ग्राहकांचा विश्वास हीच लोकमंगलची ताकद

## आ. सुभाष देशमुख; सांगोल्यात लोकमंगल बँक व पतसंस्थेचा दिवाळी फराळ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० ऑक्टोबर-**

लोकमंगल समुहाच्या प्रत्येक संस्थेवर ग्राहकांचा असलेला विश्वास हीच लोकमंगलची खरी ताकद असल्याचे प्रतिपादन माजी सहकार मंत्री लोकमंगल समुहाचे संस्थापक आ. सुभाष देशमुख यांनी केले. ते सांगोला येथील लोकमंगल बँक व पतसंस्थेच्यावतीने आयोजित दिवाळी फराळ व स्नेहसंवाद कार्यकमात बोलत होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे संचालक विजय कुलकर्णी होते.



यावेळी बँकेचे सल्लागार व लोकमंगल पतसंस्थेचे संचालक ॲड. गजानन भाकरे यांनी लोकमंगल समुहाच्यावतीने राबविण्यात येणा-या सामुदायीक विवाह सोहळा, निराधारांना मोफत घरपोच डबे, अन्नपुर्णा योजना, समृद्ध गाव योजना, वृक्ष लागवड आदी विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकमंगल समुह व आ.सुभाष देशमुख यांचेवर विश्वास व्यक्त केला. प्रास्ताविकात बँकेचे सांगोला शाखा व्यवस्थापक ॲड. शिवाजी दरेकर यांनी बँकेच्या प्रगतीचा अहवाल सादर करून विविध कर्ज योजना, पर्यटन सप्ताह याची माहीती दिली. याप्रसंगी मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँक कर्मचारी सुहास वालिकर, पृथ्वीराज पवार, विजय स्वामी, ज्योती गुळमिरे, सागर महामुनी, पतसंस्थेचे विभागीय अधिकारी वैभव लांबोरे, शाखा अधिकारी दत्तात्रय दिवसे, ऐश्वर्या दौंडे, स्नेहल साळुंखे, विकास खुळपे, साहिल काळे, फडके यांनी परिश्रम घेतले.

> लोकमंगल बँक, लोकमंगल पतसंस्था व लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटी या तिन्ही वित्तीय संस्थानी अर्धा महाराष्ट्रभर विस्तार केलेला आहे. राज्य शासन, केंद्र शासन व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या मार्गदर्शक तत्वांचे नियमित व कडक पालक करून आर्थिक शिस्त ठेऊन कामकाज करीत आहोत. त्यामुळे लोकमंगल समुहाने ग्राहकांचा विश्वास संपादीत केलेला आहे.
> **- आ. सुभाष देशमुख,**
> संस्थापक, लोकमंगल समूह



# इर्ले येथे सागवानाची १८ झाडे मोडल्याने अज्ञाता विरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३० ऑक्टोबर-**

कोरफळे येथील द्राक्ष बागेची घटना ताजी असतानाच इर्ले येथील एका शेतकऱ्याची सागवान झाडे अज्ञात इसमाने मोडून टाकल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. एकाच आठवड्यात दोन घटना घडल्यामुळे विकृत वृत्ती वाढू लागल्याचे दिसून येत आहे.

याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वैराग पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, इर्ले येथील गट क्रमांक तीनशे आठ पैकी एक मध्ये उत्कर्ष आनंदकुमार डुरे यांची चार एकर जमीन आहे यामध्ये दीड वर्षांपूर्वी दोन एकर क्षेत्रावर ती सागवान झाडांची लागण करण्यात आली आहे. सुमारे सहाशे झाडे असलेल्या या शेतातील अज्ञात इसमाने अठरा झाडे मोडून टाकून सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान केले आहे. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निधन वृत्त...

## गोदाबाई जाधव



**वेळापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

मळोली (ता. माळशिरस) येथील गोदाबाई एकनाथ जाधव यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, परंतुडे असा परिवार आहे. त्या ज्ञानेश्वर माऊली व श्रीमंत जाधव यांच्या आई तर पत्रकार प्रा. अभिजीत जाधव यांच्या त्या आज्जी होत.

## झेड. ए. शेख



**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

एम ए पानगल उर्दू शाळेतील निवृत इंग्रजी शिक्षिका झेड.ए. शेख उर्फ जुबेदा आपा यांचे २९ ऑक्टोबर रोजी वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. ते अ विवाहित होते. रात्री १० वाजता सिध्देश्वर पेठ येथील त्यांची अंतीम यात्रा निघून मोदी कब्रस्तान येथे नमाजे जनाजा अदा करुन तेथेच दफन करण्यात आले.

# शक्तिपीठ महामार्ग मोजणीस सहकार्य करा

## उपविभागीय अधिकारी बी. आर. माळी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० ऑक्टोबर-**

शक्तिपीठ महामार्ग मोजणीस शेतकऱ्यांनी विरोध करू नये. त्यांच्या म ागण्या आपण शासन दरबारापर्यंत पोहोचवू व मोजणीसाठी प्रत्येकाने शेतामध्ये येऊन हद्दी, बोअर, विहीर, ठिबक, पाईपलाईन, दाखविणे गरजेचे आहे. म्हणजे नुकसान होणार नाही. यासाठी बाधित शेतकऱ्यांनी संमती दिल्यास चार पट मोबदला अधिक मिळेल व यासाठी विरोधाची भूमिका सोडा व महामार्ग मोजणीस सहकार्य करा, असे आवाहन मंगळवेढा उपविभागीय अधिकारी बी. आर. माळी यांनी श्री दत्त मंदिर नाझरे वझरे येथे आयोजित करण्यात आलेल्या महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या बैठकीत केले. सुरुवातीस शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन सांगोला तहसीलदार संतोष कणसे यांनी केले.



शक्तिपीठ मोजणीस शेतकऱ्यांचा विरोध आहे. यासाठी आपण कोर्टात जाऊ व मुख्यमंत्र्याची शिष्टमंडळ घेऊन भेट घेऊ व त्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा सांगू असे शेतकरी संघर्ष समितीचे ॲड. सचिन देशमुख यांनी यावेळी सांगितले. शक्तिपीठ महामार्गात शेतकऱ्यांना शेअर्स देऊन म्हणजे पार्टनरशिप द्या, अशी मागणी शेतकरी राजू पाटील यांनी यावेळी केली. शक्तीपीठ महामार्ग होऊ नये असे सर्व शेतकऱ्यांची मागणी आहेच व झाल्यास श्रीधर स्वामी व संजीव स्वामी महाराज यांचे प्रसिद्ध असलेले येथील श्री दत्त मंदिराचा यात समावेश करा व महामार्गास जोडण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन रविराज शेटे यांनी यावेळी केले. यावेळी प्रा. के. वाय. पाटील, सचिन बनसोडे, तमा पाटील, डॉ. हरिश्चंद्र सोनवणे, मंगेवाडी येथील चंद्रकांत चौगुले, बाळासो शिंदे यांनी शक्तिपीठ विरोधात मत व्यक्त केले.

याप्रसंगी संघर्ष समितीचे प्रकाश सोळशे, सुहास देशपांडे, अमोल खरात, वसंत पाटील, आनंदा कोकरे, मल्हारी चव्हाण, श्रीधर देशपांडे, तानाजी कवठेकर, भारत बनसोडे, सचिन कोकरे, भारत पाटील, विनू बुवा पाटील, पांडुरंग बनसोडे, गंगाधर जोंधळे, बाबुराव जोंधळे, आप्पासो पाटील, पोपट जोंधळे, दीपक शिरदाळे, संजय बनसोडे, लक्ष्मण आलदर, बाबासो सरगर, भारत शेळके, पोपट गुरव, हनुमंत गोसावी, अतुल फसाले, लक्ष्मण जाधव, विजय गुरव, सुरेश शिंदे, सुभाष गुरव, देना पाटील तसेच मंडल अधिकारी हरीश जाधव, हरिभाऊ चांडोले, तलाठी, पोलीस पाटील, भूसंपादन अधिकारी, म हामार्ग अधिकारी, नाझरे, वझरे, बलवडी, चिनके, कोळे, यलमार मंगेवाडी उपस्थित होते. आभार उत्तम सरगर यांनी मानले.

> कोणत्याही शेतकऱ्याची मागणी नसताना शक्तीपीठ महामार्ग करणे म्हणजे राजकीय स्वार्थापोटी हा महामार्ग करणे व शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणे हे बरोबर नाही. येथून चार किलोमीटर अंतरावर नागपूर-रत्नागिरी महामार्ग मोकळा पडला आहे. या महामार्गास शक्तिपीठ महामार्ग जोडा म्हणजे येथील जमिनी वाचतील व सरकारची बचत होईल. परंतु असे न करता शासन शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा असेल तर मृत्यूला सामोरी जाऊ परंतु जमिनी देणार नाही असा परखड इशारा संघर्ष समितीचे दादासो वाघमोडे यांनी यावेळी दिला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# खड्ड्यांमुळे मृत्यू; नुकसान भरपाईबाबत समिती गठित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.३० आक्टोबर-**
शहरातील खड्ड्यांमुळे तसेच उघड्या मॅनहोलमुळे लोकांचे मृत्यू होतात. यासंदर्भात नुकसानभरपाई देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सोलापूर महापालिकेत समिती गठित करण्यात आली आहे.

महापालिकेच्या बेपरवाईमुळे अशा घटना घडतात असा नागरिक, लोकप्रतिनिधीचा आरोप असतो. अशा घटना घडल्यास मृत पावलेल्या व्यक्तीचे नातेवाईक, कुटुंबीय यांना महापालिकेकडून न्याय मिळावा अशी अपेक्षा असते. पण प्रशासनाकडून संबंधितांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात टाळाटाळ वा दिरंगाई होत असते. म्हणूनच संबंधित लोक यासंदर्भात न्यायालयात जातात. मुंबई उच्च न्यायालय यासंदर्भात एक लोकहित याचिका दाखल आहे. या याचिकेची सुनावणी दि. १३ ऑक्टोबर रोजी झाली. या सुनावणी दरम्यान न्यायालयाने रस्त्यावरील खड्ड्यांबाबत आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने व रस्त्यावरील खड्ड्यांमुळे किंवा उघड्या मॅनहोलमुळे झालेल्या मृत्यूबाबत मृतांच्या कायदेशीर वारसांना तसेच दुखापत झाल्यास दुखापतीचे स्वरुप आणि गंभीरता इत्यादी विचारात घेऊन नुकसान भरपाई देणेबाबत आदेश पारित केले आहेत. याशिवाय इतर विविध निर्देश दिले आहेत.

उच्च न्यायालयाने नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करावी, असे निर्देश सोलापूर महापालिकेला दिले आहेत. त्याअनुषंगाने महापालिका प्रशासनाने समिती गठीत केली आहे. त्यामध्ये महापालिका आयुक्त हे समितीचे अध्यक्ष व सदस्य आहेत. सदस्य म्हणून सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व इतर सदस्य यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

# कार्तिकी वारीसाठी शहरातून दोन दिंड्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**
कार्तिकी वारीसाठी सोलापूर शहरातून देगाव नाका येथील लक्ष्मी नगरातून एक व शेळगीच्या मनिषनगरमधून एक अशा दोन पायी दिंड्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. देगाव नाका येथील लक्ष्मी नगरातून रामकृष्णहरी सांप्रदायिक भजनी मंडळाच्या दिंडीचे प्रस्थान अनंतमहाराज ढेरे यांच्या हस्ते वीणापूजनाने झाले. यावेळी हभप मनोज महाराज खलाटे, रामकृष्ण सुरवसे, संकेत सुरवसे, आदित्य ढेरे, बाळू शिंदे, प्रकाश सावंत, श्रेयस सुरवसे, चंदुलाल गोडसे, विणेकरी दादा खरात, दत्तात्रय गुंड, नवगीरे आदींसह वारकरी उपस्थित होते.

हि दिंडी तिर्हेमार्गे पंढरपूरकडे जात आहे. यामध्ये वडजी, हगलूर, देवकुरळी, पाटील वस्ती, जुनी पोलीस लाईन येथील सुमारे शंभर वारकरी सहभागी झाले आहेत. शेळगीच्या मनिषनगरमधून विठ्ठल-रूक्मीणी भजनी मंडळाच्या दिंडीचे विश्व वारकरी संघाचे शहराध्यक्ष हभप महेश महाराज जाधव यांच्या हस्ते वीणा पूजन होऊन प्रस्थान झाले. यावेळी अध्यक्ष हभप शिवाजी महाराज पोतदार, हभप अविनाश शिंदे, गणपत मानकुसकर, लक्ष्मिकांत वेदपाठक, नंदकुमार वेदपाठक, महेश महामुनी, मंगेश कळमणकर आदींसह वारकरी उपस्थित होते. हि पायी दिंडी मोहोळ मार्गे पंढरपूरकडे जाणार आहे.

### उळेतून श्रीगुरू देहूकर सांप्रदायिक मंडळाच्या दिंडीचे प्रस्थान

उळे (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्रीगुरू देहुकर सांप्रदायिक मंडळाच्या दिंडीचे बुधवारी सकाळी दहा वाजता पंढरपूरकडे प्रस्थान झाले.जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज श्रीगुरू बापुसाहेब महाराज देहूकर व श्रीगुरू कान्होबा महाराज देहुकर यांच्या कृपाशीर्वादाने ग्राम स्थांच्या सहकार्याने हि दिंडी परंपरा सुरू आहे. येथील हनुमान मंदीरातून हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांच्या हस्ते वीणा पूजनाने दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी हभप धनंजय महाराज गुंड, हभप. प्रभु लिंग महाराज क्षिरसागर , हभप दत्तात्रय महाराज घायाळ, विणेकरी गणपत खंडागळे, गुरुलिंग कुंभार, राहूल शिंदे, हरी खंडागळे, भैरु शिंदे, विष्णू शिंदे, चांगदेव घोरपडे, मृदंगाचार्य राम खंडागळे, आदिनाथ खंडागळे, सोमनाथ खंडागळे, श्रीकांत आरगे, मच्छिंद्र डांगे, दत्तात्रय खंडागळे आदींसह वारकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. हि दिंडी मोहोळ मार्गे पंढरपूरकडे जात आहे. दींडीत सुमारे शंभर वारकरी सहभागी झाले आहेत.






# बल्करच्या चाकाखाली सापडून महिला जागीच ठार

### शांती चौकात गुरुवारी दुपारी घडलेला अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**
बल्करच्या चाकाखाली सापडून दुचाकीवरील महिलेचा जागीच अंत झाला. हा अपघात गुरुवारी सायंकाळी अक्कलकोट रोडवरील शांती चौकात झाला.

जयश्री अरूण जाधव (वय ४०, रा. तेलगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी जयश्री जाधव या पतीसोबत एमएच १३ डीजे ९१७८ क्रमांकाच्या दुचाकीवर पाठीमागे बसून बोरामणी येथून तेलगावकडे जात होत्या. अक्कलकोट रोडवरील शांती चौकात पाठीमागून येणाऱ्या बल्कर ट्रकने दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील जयश्री जाधव व त्यांचे पती अरूण जाधव हे दुचाकीवरून पडून गंभीर जखमी होऊन बेशुध्द झाल्याने त्यांना चौकातील वाहतूक पोलिसांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉ. राजदिपसिंग भिसे यांनी जयश्री जाधव यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



**श्री शंकर महाराज प्रकट दिन**
**सोलापूर : मोदीखाना परिसरातील दत्त मंदिरामध्ये गुरुवारी शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त सामुदायिक पारायण करण्यात आले.**

# उजनीच्या डाव्या कालव्यात हातपाय बांधलेल्या युवकाचा मृतदेह सापडला

**टेंभुर्णी, दि. ३० ऑक्टोबर-**
टेंभुर्णीपासून काही अंतरावर असलेल्या भिमनगर-रांजणी हद्दीतील उजनी धरणालगतच्या उजनी डाव्या कालव्यात हातपाय बांधलेल्या अवस्थेत एका अज्ञात युवकाचा मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

टेंभुर्णी पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, २५ ते ३० वयोगटातील एका तरुणाचा हातपाय बांधून त्याला कालव्यात दगड बांधून टाकण्यात आले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सदर मृतदेहावर काळा शर्ट आणि काळी जीन्स पॅन्ट असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच या तरुणाला गळा वळून हातपाय बांधून टाकून दिल्याची आज पहाटे घटना घडल्याचे अंदाज वर्तवला जात आहे. घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली असून तपास सुरु आहे. प्राथमिक पाहणीवरून प्रकार संशयास्पद असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. मृत व्यक्तीबाबत माहिती असल्यास ९७६३५२३८४९ या क्रमांकावर संपर्क करावा,



**सोलापूर : पूर्व भागातील दाजी पेठेतील श्री व्यंकटेश्वर देवस्थान मंदिरात ५३ वे ब्रह्मोत्सवात ध्वजारोहण करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात शेष वाहन सेवा करण्यात आली.**

# एमडी ड्रग्स प्रकरणातील तरुणास पाच दिवस पोलिस कोठडी

### गुन्हे शाखेचे पथक तपासासाठी जाणार मुंबईला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**
शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ३२ ग्रॅम एमडी ड्रग्ज सहित अटक केलेल्या तरूणास न्यायालयाने पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. या तरूणाने ड्रग्ज कोठून आणले याच्या तपासासाठी शहर गुन्हे शाखेचे पथक मुंबईला जाणार आहे.

मोहमद अझहर हैदरसाहेब कुरेशी (वय ३७, रा. मिमपुरा लेन, सेंटर स्ट्रीट कॅम्प, पुणे) असे पोलिस कोठडी मिळालेल्याचे आहे. २८ ऑक्टोबर रोजी शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना एक व्यक्ती सोलापूर एस.टी. स्टैंड परिसरामध्ये मेफेड्रोन (एम.डी.) अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी पुण्यावरून आलेल्या बसमधून एक संशयास्पद व्यक्ती उतरला, त्यावेळी पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅटचे खिशामध्ये एका प्लास्टिक पाऊचमध्ये पांढऱ्या रंगाची मेफेड्रोन (एम.डी.) सदृश्य पावडर मिळून आली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी मोहमद कुरेशीस अटक करण्यात येऊन न्यायालयात हजर करण्यात आले.

त्यावेळी त्यास न्यायालयाने ५ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. पोलिस निरीक्षक अरविंद माने पुढील तपास करीत आहेत.

# श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयातील शासकीय योजनांचे आज उद्घाटन

### आ. देवेंद्र कोठे, डॉ. शिवरत्न शेटे यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**
श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुणालय आणि संशोधन केंद्रातील एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले योजनेचे उद्घाटन आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते आज (शुक्रवारी) सकाळी ११ वाजता रुणालयात होणार असल्याची माहिती रुणालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांनी दिली. या कार्यक्रमास आमदार देवेंद्र कोठे आणि हिंदवी परिवाराचे प्रमुख ख्यातनाम शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

विशेषतः पूर्व भाग आणि एकूणच शहरात आर्थिक दुर्बल रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. उत्कृष्ट वैद्यकीय सेवेमुळे रुग्णांचा विश्वास संपादन केलेल्या श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले योजना नसल्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ घेता येत नव्हता. त्यामुळे श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात या शासकीय योजना सुरू व्हाव्यात याकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. यानंतर शासनाने श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनांचे उद्घाटन आज (शुक्रवारी) सकाळी होणार असून या कार्यक्रमास सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेन यांनी केले आहे.




# जैन समाजातील एकजुटीचा विजय : प्रा.मनीष शहा

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
प.पू.आचार्य श्री १०८ गुप्तिनंदीजी महाराज यांच्या मार्गदर्शनात बोर्डिंग बचाव समितीने केलेल्या आंदोलनास सर्व आजी-माजी विद्यार्थी, संपूर्ण भारतातील सकल जैन समाज तसेच अनेक शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक संस्था सहभागी होऊन एकत्रितपणे लढा दिल्यामुळे पुण्यातील जैन बोर्डिंगचा बिल्डर व ट्रस्टीचा करार रदद्द झाला.

त्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाला असल्याचे मत येथील जैन समाजाचे कार्यकर्ते मनीष शहा यांनी व्यक्त केले. काही ट्रस्टी व बिल्डरने केलेला हा भूखंड घोटाळा वेळेवर उघडकीस आणून त्याची माहिती सर्व समाजाला देऊन हे आंदोलन छेडले आणि यशस्वी केले त्यासाठी येथील बचाव समितीच्या सर्व प्रतिनिधींचे प्रा. शहा यांनी आभार मानले आहेत

# जिल्हा परिषदेच्या ई-निविदा प्रक्रियेत प्रचंड गैरव्यवहार

- विविध संघटनांचा आंदोलनाचा इशारा
- पाच नोव्हेंबरला ठरणार आंदोलनाची दिशा






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
सोलापूर जिल्हा परिषदेतील ई-ऑनलाईन निविदा प्रक्रियेत बेकायदेशीर होत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, राज्य मजूर सहकारी संस्था, राज्य पाणी पुरवठा कंत्राटदार संघटना यांनी केला आहे. निविदामध्ये ठरवून नियमबाहय अटी घालून आर्थिक लाभ उठवून शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, ग्रामसचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या संदर्भात वारंवार निवेदन दिले आहेत. या संदर्भात सविस्तर चौकशी न झाल्याने संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत बेकायदेशीर ई-निविदा प्रक्रिया थांबवून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई न झाल्यास या गंभीर प्रकरणावर ठोस निर्णय घेण्यासाठी व आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी बुधवार दिनांक नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा समाज कल्याण केंद्र, रंगभवन येथे कंत्राटदारांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर महत्वाच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणी पुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले, विल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष संतोष कलगुडगी, माजी राज्याध्यक्ष दत्तात्रय मुळे, लेबर फेडरेशन सोलापूर जिल्हाध्यक्ष शंकरराव चौगुले, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे उपाध्यक्ष कांतीलाल दुबल, सचिव कैलास लांडे, राज्यसंघटक नरेंद्र भोसले, जिल्हा पाणी पुरवठा कंत्राटदार संघटना जिल्हाध्यक्ष आनंद तोडकरी, विवेक राठोड, सुर्यकांत बिराजदार, सोलापूर महानगरपालिका कॉन्टॅंक्टरचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ दुधाळ यांनी केले आहे.

# दासरी हटाव, शिवसेना बचाव! शिवसैनिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
शिवसेनेचे विभागीय नेते माजी मंत्री चंद्रकांत खैरे आणि शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकिळ यांच्या उपस्थित महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने आयोजित बैठकीत शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख अजय दासरी यांनी कार्याचा अहवाल सादर करताना आपल्याच पदाधिकाऱ्यांवर आणि शिवसैनिकांवर केलेले आरोप दुर्दैवी आहेत.



पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख जबाबदारी देऊन जवळपास दोन वर्षांचा कालावधी लोटला आहे. यावेळी दक्षिण सोलापूर दक्षिणमध्ये अमर पाटील यांना उमेदवारी मिळाली. परंतु त्यांच्या प्रचाराची यंत्रणादेखील जिल्हाप्रमुख या नात्याने केली नाही. शिंदेची बंडाळी टाळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत. सोलापूर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी बनावट बूथ यंत्रणा राबवून मोठा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. घरामध्येच बसून फक्त सोशल मीडियावर फोटो टाकून किंवा गप्पा मारतानाचे फोटो पोस्ट करत महानगरपालिका निवडणुकीची तयारी सुरू आहे, असे भासवून वरिष्ठांची दिशाभूल केली आहे. काँग्रेस पक्ष सोडून शिवसेनेत येऊन येथील निष्ठावंत शिवसैनिकांवर दंडेलशाही केली आहे. तसेच सर्व शिवसैनिकांना मी अखंड सोलापूर जिल्ह्याचा जिल्हाप्रमुख आहे, अशा अविर्भावात वावरत आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी यांच्या त्रासाला कंटाळून शिवसेनेचे माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी नगरसेवक भारत बडूरवाले, गुरूशांत धूत्तगावकर, ज्येष्ठ कामगार नेते विष्णू कारमपुरी यांनी शिवसेना सोडली. तसेच युवासेनेमध्ये देखील त्यांनी हस्तक्षेप केल्याने युवासेना पदाधिकारी त्यांच्या त्रासाला कंटाळून शिवसेना शिंदे गटात गेले. तसेच अनेक युवासेना पदाधिकारी अलिप्त आहेत. तसेच महिला आघाडीमध्ये हस्तक्षेप केल्याने अनेक महिला शिवसेनेपासून अलिप्त झाल्या आहेत. अशा गैरकारभार करणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी यांस तात्काळ पक्षातून हकालपट्टी करून सामान्य शिवसैनिकाची नियुक्ती करण्याची मागणी जिल्हा उपप्रमुख दत्ता वानकर, शहर संघटक लहु गायकवाड व सुरेश जगताप यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी केली आहे.

### भाजपाचे षडयंत्र

शिवसेना पक्ष वाढत असल्यामुळे भाजपाच्या नेत्यांना पक्षविस्तार बघवत नाही. म्हणून त्यांनी सेनेच्या नेत्यांमार्फत षडयंत्र सुरू केले आहे. माझ्याविरूध्द तक्रार करणाऱ्यांना मी उत्तर देण्यास तयार आहे. विरोधकांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करावे. सेनाभवनात सोक्षमोक्ष होईल.

**- अजय दासरी,**
**जिल्हाप्रमुख, उबाठा शिवसेना**



# मनपा प्रभाग २२ येथे रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**
सोलापूर महापालिका प्रभाग क्रमांक २२ येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून ११ लाख २८,५८८ खर्चित सोनीनगर, मोदी हुडको, येथील रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले.

दरम्यान, प्रभाग क्रमांक २२ च्या सर्वांगीण विकासासाठी आगामी काळात प्रयत्न करण्याची ग्वाही किसन जाधव यांनी दिली.यावेळी हरीश तेलगू ,सिद्राम वाडेकर, आमिर तांबोळी, फैयाज शेख, धनंजय नगरकर, जनार्दन कांबळे, गणेश दुगाने, मधुकर कश्यप, वसंत गोरे, नीलम गोरे, अनिता भंडारे आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## बोरामणी सरपंच व ६ सदस्यांचे सदस्यत्व रद्द

### बोरामणी ग्रामपंचायत निवडणूक खर्च प्रकरण : जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा आदेश

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

ग्रामपंचायतीला निवडून आल्यानंतर निवडणूक जमा-खर्च भरले नाहीत व निवडणूक खर्चाचे प्रतिज्ञापत्र दिले नाहीत म्हणून माजी सरपंच पुष्पवती आवटे यांनी सोलापूर येथील जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. त्यावर निकाल देताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सरपंच व ०६ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले असल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

जिल्हाधिकारी यांच्याकडे माजी सरपंच पुष्पावती आवटे यांनी बोरामणी ग्रामपंचायतच्या सरपंच अरुणा सोमनाथ साळुंखे सह स्वप्नाली शशिकांत पाटणे, ज्योती महेश देशमुख, वैभव राजकुमार हलसगे, आकाश नितीन माशाले, स्वाती रवींद्र रोकडे, सुभाष भगवान भोसले यांनी वेळेत निवडणुकीचा जमा-खर्च भरला नाही व त्यासोबत प्रतिज्ञापत्र व बँक खाते मार्फत निवडणूक खर्च केला नाही; असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे व त्याबाबत कुठलेही पुरावे दिले नाहीत म्हणून तक्रार दाखल केली होती.तक्रारीतील नमूद सदस्यांनी निवडणूक जमा खर्च वेळेत भरणे आणि सदरचा खर्च हे बँक खात्यामधून करण्याचे बंधनकारक असताना, भरले नाहीत आणि वेळेत खर्च सादर केला नाही हे प्रथम दर्शनी दिसून येते असा युक्तिवाद केले असता जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरून नवनिर्वाचित सरपंच व इतर ०६ सदस्यांचे सदस्यत्व रद्द करीत पुढील ०५ वर्षासाठी निवडणूक लढवण्यास अपात्र केले आहे. या प्रकरणी सर्व तक्रारदारांकडून ॲड. मंजुनाथ कक्कलमेली यांनी काम पाहिले.

दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम 20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०

# वाढलेले अडीच लाख मतदारही ठरवणार नगरसेवक कोण!

- आरक्षण सोडतीची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे राबविणार
- महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या महापालिका निवडणुकीत सुमारे २ लाख ५० हजार मतदार वाढले आहेत. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आरक्षण सोडत आणि मतदार याद्या पडताळणी व छाननीचे काम सुरू आहे, अशी माहिती महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आवश्यक ती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महापालिका निवडणुकीसाठी आरक्षण सोडत प्रक्रियेचे नियोजनही आदेशानुसार करण्यात येत आहे. ११ नोव्हेंबर रोजी प्रभाग आरक्षण सोडत कार्यक्रम आहे. त्यानुसार रंगीत तालीमही करण्यात येणार आहे. दरम्यान सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण ६ लाख ७३ हजार मतदार होते. यंदाच्या २०२५ च्या निवडणुकी करिता मतदार मतदार संख्येत नैसर्गिक वाढ झाली आहे. २ लाख ५० हजार ते पावणेतीन लाख मतदारांची वाढ यंदा झाली आहे. एकूण ९ लाख ५० हजार मतदार यंदा असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम सुरू आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या अंतिम प्रभाग रचनेनुसार एकूण २६ प्रभागांकरिता प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम सुरु करण्यात आले आहे. या कामकाजाच्या अनुषंगाने प्रत्येक प्रभागाकरिता स्वतंत्र टीम नियुक्त करण्यात आली आहे.

या कामासाठी नियुक्त टीमकडून प्रभागनिहाय घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून, प्रभागाच्या निश्चित हद्दीनुसार मतदारांची माहिती पडताळून पाहणी करण्यात येत आहे. या प्रक्रियेद्वारे अंतिम मतदार यादीत समाविष्ट होणाऱ्या मतदारांची नोंद तपासून, प्रभाग निहाय मतदार याद्या करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मतदान केंद्र निश्चितीकरण ही केले जाणार आहे. महापालिका झोन अधिकारी आणि अभियंता यांच्याकडून त्यासाठी पाहणी केली जात आहे. आयोगाच्या निर्देशानुसार साधारणतः ८५० ते ९०० मतदारांसाठी एक मतदान केंद्र उपलब्ध केले जाणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी खाजगी ठिकाणीही मतदान केंद्र केले जाणार आहे. केंद्रावर अधिक गर्दी होणार नाही याची दक्षता ही घेतली जाणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस उपायुक्त आशिष लोकरे, अंतर्गत लेखापरीक्षा राहुल कुलकर्णी, आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, नियंत्रण अधिकारी तपन डंके उपस्थित होते.

### रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याचे आदेश

दरम्यान, दिवाळी सण संपला आहे. सोलापूर शहरात रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याचे आदेशही यावेळी महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

### तीन मक्तेदारांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकले

शहरात रस्ते केल्यानंतर नियमानुसार तीन वर्षाचा दोष दायित्व कालावधी (डीएलपी) असतो. या काळात रस्ते दुरुस्त न केल्याने तीन मक्तेदारांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यात आले आहे. दोष दायित्व कालावधी (डीएलपी) असलेले एकूण ११ रस्ते आहेत, असे नगर अभियंता सारिका अकुलवार यांनी सांगितले. दरम्यान, महापालिका हेड आणि झोन निहाय रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची कामे हाती घेण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### ८९२ कोटीच्या योजनेसाठी शासनाकडे पाठपुरावा

अंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठीच्या ८९२ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेच्या निधी करिता शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपलासाठी शासकीय जागा संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

## ▶▶ महत्वाचे...

### रिक्षाच्या धडकेत वृध्द जखमी

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

सोलापूर - स्वागत नगर येथे रिक्षाच्या धडकेत वृध्द जखमी झाला. ही घटना १४ ऑक्टोबर रोजी घडली असून याबाबत रिक्षाचालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंबादास मुकुंद राजखडे (वय ४०, रा. स्वागत नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन एमएच १२ एनडब्ल्यू २८७६ क्रमांकाच्या रिक्षाचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास अंबादास राजखडे यांचे वडभल मुकुंद राजखडे (वय ७३) हे नाष्टा करून घरी पायी येत होते. त्यावेळी स्वागत नगर येथील सार्वजनिक रोडवर एमएच १२ एनडब्ल्यू २८७६ क्रमांकाच्या रिक्षाच्या चालकाने राजखडे यांना जोरदार धडक दिली. यामध्ये राजखडे यांच्या डोक्यास, पायाला दुखापत झाली असून याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

### रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्मवर तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

रेल्वे स्टेशनवरील १ नंबर प्लॅटफॉर्मवर तरूणास मारहाण करून जखमी केले. अजय अनिल जाधव (वय २६, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ६, रामवाडी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी रेल्वे स्टेशन येथील १ नंबर प्लॅटफॉर्मवर अजय जाधव हा कुल्फी विकत असताना साईड द्या असे म्हणाल्यानंतर विनोद पाटील, निलेश व इतर दोन जणांनी मारहाण केली. त्यामध्ये अजय जाधव याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली.

### दारूच्या नशेत तरूणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

दारूच्या नशेत तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी रात्री शहरातील भारत नगर कुमठा नाका परिसरात घडली. सुखदेव दत्ता जाधव (वय ३०, रा. भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे.२९ ऑक्टोबर रोजी रात्री सुखदेव जाधव याने राहत्या घरातील पत्र्याच्या वाशाला दारूच्या नशेत साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सुखदेव जाधव यांस गळफासातून सोडवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. पूजा लवटे यांनी सुखदेव यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## म्हशीच्या खरेदी-विक्रिच्या पैशावरून तरूणास मारहाण

### पाचजणांविरुध्द पोलिसांत गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

म्हशीच्या खरेदी-विक्रि पैशावरून तरूणास मारहाण केल्याप्रकरणी पाचजणांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विकास बसू हेगडे (वय ३२, रा. गणेश नगर, देगाव, ता. उत्तर सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन लक्ष्मण मेकाले, विशाल मेकाले, मयुर पवार व त्यांच्या दोन साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२९ ऑक्टोबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास म्हशीच्या खरेदी-विक्रिच्या पैशाच्या कारणावरून विकास हेगडे याच्या शेतात लक्ष्मण मेकाले व त्यांच्या साथीदारांनी येऊन शिवीगाळ करून



मारहाण केली. आम्ही म्हशीचे पैसे देत नाही असे म्हणून मेकाले याने हेगडे याच्या घरातील लोकांना प्लास्टीक पाईपने मारहाण केली. या भांडणात हेगडे याच्या खिशातील १० हजार रुपये पडून गहाळ झाले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.



**भर चौकात धोकादायक झाकण :** शहरातील जोडबसवन्ना चौकात ड्रेनेजचे झाकण धोकादायक झाले असल्याने नागरिकांनी लाल कापड बांधून जागृती दाखवली पण बेजबाबदार महापालिका प्रशासन याकडे कधी लक्ष देणार? हे कोडेच आहे.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या उमेदवारांची चाचपणी

### उपमुख्यमंत्री अजितदादा सोलापुरात स्वतः घेणार आढावा : शहराध्यक्ष पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल लवकरच वाजणार आहे. महापालिका पंचवार्षिक निवडणुकांचे आरक्षण सोडत लवकरच जाहीर होणार आहे. अशी माहिती महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनी गुरुवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिल्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. आगामी महापालिका निवडणुकीचे महत्व लक्षात घेता, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे लवकरच सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा अहवाल तसेच इच्छुक उमेदवारांचा स्वतःचा कामाचा लेखाजोखा सज्ज ठेवण्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची एकच धावपळ सुरू असल्याचे चित्र राष्ट्रवादी पक्षामध्ये दिसून येत आहे.



दरम्यान, काही दिवसापूर्वी सोलापूर दौऱ्यावर आलेले सोलापूरचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना अनेक कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आदेश दिले होते. स्वबळाचा नारा देत, सोलापूर महापालिकेच्या सर्वच्या सर्व जागा लढण्यासाठी तयार व्हा, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच इच्छुक आणि आजी-माजी नगरसेवकांनी देखील कंबर कसलेली दिसत आहे. पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आजी-माजी नगरसेवक तसेच इच्छुक उमेदवारांच्या गाठीभेटी घेत आहेत.

बैठका आणि चर्चामधून महापालिकेच्या कोणत्या जागेसाठी कोणता उमेदवार असावा याची चाचपणी करत आहेत. तर दुसरीकडे महापालिकेची निवडणूक ही महायुतीतून किंवा स्वबळावर लढण्याची तयारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने सुरू आहे. आपल्याच महायुतीतील मोठ्या भावाने पक्ष फोडून आपल्या पक्षातील नेत्यांचे घाऊक इनकमिंग केल्यामुळे नाराज झालेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना अजित पवारांच्या दौऱ्यानंतर संजीवनी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

### नोव्हेंबर महिन्यात अजित पवार यांचा दौरा


"महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, पक्षाची तसेच पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांची मोट बांधण्यासाठी अजित पवार सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. पक्षाचा आढावा तसेच उमेदवारांच्या निश्चितीसाठी चर्चा बैठका होणार आहेत. तशा बैठका दररोज सुरू आहेत. या बैठकांचा अहवाल अजित पवार यांना देण्यात येईल. त्यानंतर निवडणुकीच्या अनुषंगाने कामकाज केले जाईल.

**- संतोष पवार,**
शहराध्यक्ष राष्ट्रवादी अजित पवार गट

# आज दिवसभरात शासनाकडून ४४० कोटी रुपये वर्ग होणार शेतकऱ्यांच्या खात्यावर : जिल्हाधिकारी

- उर्वरित शेतकऱ्यांनाही सोमवारपर्यंत मिळणार पैसे
- ॲग्रीस्टॅक नसलेल्या शेतकऱ्यांना नाही मिळणार पैसे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**



जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून बाधित शेतकऱ्यांच्या याद्या तत्काळ अपलोड करण्याच्या सूचना दिल्या असल्याने सर्वच तालुक्यातील आमची महसूल यंत्रणा याद्या अपलोड करण्याच्या कामाला लागली होती; या कर्मचाऱ्यांची ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या आणि या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आहे. यातील सर्वच रक्कम मंजूर झाली असून, यातील गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर रात्री आणि शुक्रवारी दिवसभर ४४० कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत. तर उर्वरित रक्कमही सोमवारपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

शासनाने महापुराच्या संकटात नुकसान भरपाई देण्याचा शब्द दिला होता. इतकेच नाहीतर घरांच्या बाधित कुटुंबांना दिवाळीपूर्वी पैसे मिळाले तर सर्वच पूरग्रस्तांना दिवाळीसाठी कीट वाटप केले आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या या मदतीमुळे शेतकऱ्यांचे संपूर्णतः पुनर्वसन होणार नाही पण सरकारने दाखविलेली तत्परता कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळू लागल्याने महापुराच्या संकटातून खचलेल्या शेतकऱ्यांना यातून नक्कीच बळ मिळणार आहे. ज्या पिकांच्या भरोश्यावर दिवाळी होणार होती तेच पीक महापूर अन् अतिवृष्टीत मातीमोल झाले. यंदाची दिवाळी कशी होणार? याचीच चिंता शेतकरी व त्याच्या कुटुंबाला लागली होती.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुराने बाधित शेतकरी एकूण संख्या ७ लाख ६४ हजार १७३ इतके आहेत. यांचे बाधित क्षेत्र ६ लाख ०४ हजार ६४१.४३ हेक्टर इतके असून, या सर्वांचा एकूण अपेक्षित निधी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ इतका असून, याचा फायनल अहवाल शासनाकडे नुकताच पाठविला आहे. त्यानुसार पूर्ण रक्कम मंजुरीचा जीआरही आला आहे. यानुसार आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होवू लागली असून, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही. यामुळे शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकमध्ये आपले नाव नोंदवून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी आज केले आहे. जिल्ह्यात ६ लाख ९० हजार ७३६ इतके पीएम किसान सन्मान योजनेत शेतकरी समाविष्ट आहेत; यातील ६ लाख ५३ हजार १०७ शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक केलेला आहे. यामुळे



याद्या जसजशा अपलोड होत आहेत; त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही पडत राहणार आहेत. हे पैसे दिल्लीतून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करूनच ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे. असाही निर्वाळा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांनी कसलाही गैरसमज करून घेवू नये, सर्वच शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

शासनाकडे पाठविलेल्या पंचनाम्यामध्ये फळपिके सोडून जिरायत पिकांखालील बाधीत क्षेत्राचे बाधीत शेतकरी २ लाख ५६ हजार २४९ इतके आहेत. तर यांचे बाधीत क्षेत्र २ लाख ५७ हजार ५९२.६२ हेक्टर इतके आहे. तर यांच्यासाठी अपेक्षित निधी २१८ कोटी ९५ लाख ३७ हजार २७० इतका आहे. फळपिके सोडून बागायत पिकांखालील बाधित क्षेत्रातील बाधीत शेतकरी ३ लाख ७० हजार १८९ इतके आहेत. यांचे बाधीत क्षेत्र २ लाख ४० हजार ७९४.८६ हे. इतके असून, यांचा अपेक्षित निधी ४०९ कोटी ३५ लाख १२ हजार ६२० इतका आहे. फळपिकांखालील बाधीत क्षेत्राची शेतकरी संख्या १ लाख ३७ हजार ७३५ इतकी आहे. बाधीत क्षेत्र १ लाख ०६ हजार २५३.९५ हेक्टर असून, अपेक्षित निधी २३९ कोटी ०७ लाख १३ हजार ९६५ इतका आहे.

तर जिल्ह्यातील बाधित शेतकरी एकूण संख्या ७ लाख ६४ हजार १७३ इतकी आहे. यांचे बाधित क्षेत्र ६ लाख ०४ हजार ६४१.४३ हेक्टर इतके असून, या सर्वांचा एकूण अपेक्षित निधी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ इतका आहे. जिल्ह्यात आलेल्या महापुरामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेकांची शेती खरडून गेल्याने आणि काही शेतकऱ्यांच्या शेतात पाणी थांबल्याने पंचनामे पूर्ण होण्यास विलंब लागला होता. २१ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील करमाळा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ, बार्शी, अक्कलकोट या इतर तालुक्यात महापुरामुळे शेती, शेतकरी आणि अनेक ग्रामस्थ बाधित झाले होते.

### ॲग्रीस्टॅकसाठी गावोगाव शिबिरे घेणार

जिल्ह्यातील अजून १० ते १२ टक्के लोकांचे ॲग्रीस्टॅक झाले नसल्याने त्यांच्या खात्यावर ही नुकसान भरपाईची रक्कम मिळणार नाही. त्याही शेतकऱ्यांना लवकर पैसे मिळावे यासाठी गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक करून घेतले जाणार आहेत. तर आमचे अधिकारी, कर्मचारी मोठमोठ्या गावात जावून प्रत्येक गावातील २० ते २५ माणसांशी चर्चा करून शासनाकडून येणारी मदत मिळते की नाही? याचीही चौकशी करून त्यांच्या अडचणी सोडविणार आहेत.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर**

### मोठ्या नुकसानीचे पैसे ८-१० दिवसात मिळतील

२१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांचा ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या ८ ते १० दिवसात पैसे मिळणार आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १२५२

**तुका म्हणे जैसी लाचा साठीं ग्वाही ।**
**देतील हे ठावी नाहीं वस्तु ।।**

आपल्याकडील अनुभवाचा फायदा इतरांना व्हावा, म्हणून इतरांना मार्गदर्शन करणे अपेक्षित असले तरीही अनुभव नसतांना किंवा ज्ञान नसतांना मार्गदर्शन करणे अपेक्षित नाही. अनुभव शून्य मार्गदर्शन समोरच्याच्या नुकसानीला कारणीभूत होऊ शकते. हे सत्य असले तरीही समाजात असे भरपूर लोक आहेत की, जे स्वत: आचरणशून्य व अनुभव शून्य असूनही इतरांना मार्गदर्शनाच्या मोठ-मोठया गप्पा करतात. शास्त्र वाचून इतरांना शास्त्राचे ज्ञान सांगतात. पण स्वत: मात्र, शास्त्राप्रमाणे वागत नाहीत. कीर्तन, प्रवचन, व्याख्यानातून संतांचा संदेश लोकांना देतात आणि स्वत:च्या जीवनात मात्र संत संदेशाला किंचितही स्थान देत नाहीत. एखादी गोष्ट माहिती नसतांना किंवा तिचा अनुभव न घेता इतरांना सांगने योग्य नसते. पोपटपंची ज्ञान सांगून समाजाची दिशाभूल करणारे व स्वार्थ साधणारे अनुभवशून्य लोक समाजात आहेत. म्हणून संत महात्म्यांना अशा लोकांबद्दल बोलावे लागते. स्वत:ला कांहीही माहिती नसतांना केवळ पैशासाठी खोटे बोलणे किंवा खोटी साक्ष देणे जसे चुकीचे आहे. त्याप्रमाणे अनुभव नसतांना बोलणे चुकीचे आहे. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे जैसी लाचा साठीं ग्वाही । देतील हे ठावी नाहीं वस्तु ।। तुकाराम महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे पैसा खाऊन म्हणजे लाच घेऊन साक्ष फिरविणारे किंवा खोटे बोलणारे लोक समाजात आहेत. म्हणून बऱ्याचवेळा सत्याच्या बाजूंच्यानाही शिक्षा भोगण्याची किंवा नुकसानीला सामोरे जाण्याची वेळ येते.



सून कितीही चांगली वागत असली किंवा खरे सांगत असली तरीही काही संसारात सासूंकडून तिच्यावर खोटे आरोप केले जातात. दूर्देवाने अशा खोटया आरोपांना घरातील अनेकांकडून खरे असल्याची साक्ष दिली जाते. आपली खोटी साक्ष किंवा आपणाला माहिती नसतांना सुनेच्या विरुध्द बोलल्याने तिचे आयुष्य उध्वस्त होत आहे, याचा विचार कोणी करीत नाही. आपण कोणासाठी करतो, त्यापेक्षा काय करतो याचा विचार जर प्रत्येकांनी केला व त्याप्रमाणे माणूस वागला तर समाजातील बऱ्याच अनिष्ट गोष्टी आपोआप संपुष्टात येतील. दूर्दैवाने नमूद करावे लागते की, खऱ्याची बाजू धरणाऱ्यांपेक्षा खोटयाची बाजू धरणाऱ्यांची संख्या समाजात जास्त आहे. आपणाला माहिती नसतांनाही आपणाला सर्वच माहिती असल्याचे किंवा आपण अनुभवातूनच बोलत असल्याचे लोक इतरांना भासवतात. त्यांचे असे भासविणे त्यांना थोडाफार पैसा किंवा आनंद देऊन जात असला तरी त्यांचा हा खोटारडा खेळ इतरांच्या जीवनाचा, भावनांचा खेळ करुन जातो. लोकांच्या भावनेशी, जीवनाशी खेळणारे लोक केवळ राजकारण किंवा अर्थकारणातच आहेत असे नव्हे तर अध्यात्मिक क्षेत्रातही आहेत. स्वत:कडे कसलाही अनुभव नसतांनाही कांही लोक व्यवहारासाठी किर्तन, प्रवचन, व्याख्यानातून भाविकांना भावनिक स्वरुपात फसवित असल्याने लोकांचा चांगल्या संत, महात्म्यांवरील विश्वास कमी होत चालला आहे. लोक नि:स्वार्थी प्रवचन, कीर्तनकारांकडेही कळत न कळत शंकात्मक वृत्तीने बघत आहेत. असो, अनुभवातून बोलल्यानंतर शब्दाला जे वजन येते ते अनुभवरहित बोलण्याणे येत नाही. माहिती नसतांना केवळ समोरच्याला बरे वाटावे म्हणून त्याच्या विचाराला, वर्तनाला सहमती देणेही चुकीचे असते, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - श्री विठ्ठल |
| दि. ३१ ऑक्टोबर २०२५ | नवरात्रारंभ |
| विक्रम संवत् २०८२ | इंदिरा गांधी स्मृतिदिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (१०.०३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- धनिष्ठा (१८.५०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वृध्दि (२८.३१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२१.४३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# दिवसा घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील चार गुन्हेगारांना अटक

## १ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त; शहर गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

दिवसा घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीच्या ४ सराईत गुन्हेगारांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून १ लाख २० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

शेरअली मोती सय्यद (वय २५, रा. भोसा रोड, इंदीरा नगर, मशिदजवळ, जि. यवतमाळ), प्रसन्न प्रमोद मेश्राम (वय २४, रा. डी.एड कॉलेज, भोसा रोड, जि.यवतमाळ), चंदु हिरा भतकल (वय ३९, रा. बोरगांव, मेघे टेकडी, जि. वर्धा), रोशन पुरुषोत्तम प्रधान (वय २७, रा. सुराना ले-आउट, अंबिका नगर, जि. यवतमाळ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

२५ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी अडीच ते सायंकाळी सहाच्या दरम्यान जुळे सोलापुरातील गोंविदश्री मंगल कार्यालय येथे बंद घरात कोणीही नसल्याचा फायदा घेऊन चोरट्यांनी घराचे कुलूप तोडुन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली होती. तसेच कोणार्क नगर येथील बंद घर फोडून ४० हजारांचा ऐवज चोरून नेण्यात आला होता. याबाबत गौतम मारुती गायकवाड आणि सिध्दप्पा विठ्ठल बिडवे यांनी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विजापुर नाका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

दिवसाढवळ्या घरफोड्या झाल्याने या गुन्ह्यांचा तपास करताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळ तसेच सोलापूर शहरातील वेगवेगळया ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी करुन व तांत्रीक विश्लेषणाचे आधारे यातील चार आरोपीची ओळख पटवली.

या आरोपींच्या मागावर असताना २९ ऑक्टोबर रोजी रात्री शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना वरील संशयित हे जुना पुना नाका परिसरात संशयीतरित्या फिरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी जुना पुना नाक्याजवळील आकांक्षा टुर्स ट्रॅव्हल्स जवळील जागेतून वरील चौघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. त्यावेळी त्यांनी त्यांची नावे शेरअली मोती सय्यद, प्रसन्न प्रमोद मेश्राम, चंदु हिरा भतकल, रोशन पुरुषोत्तम प्रधान अशी सांगितली. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांचे ताब्यातून दोन गुन्हयातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे व १५ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १ लाख १९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आली असून, आरोपींना न्यायालयाने आरोपींना पोलीस कोठडी सुनावली आहे.

### अटक करण्यात आलेल्या आरोपींवर गंभीर गुन्हे दाखल

अटक आरोपींबाबत अधिक तपास केला असता, सदरचे चारही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द यापुर्वी यवतमाळ, चंद्रपुर या जिल्ह्यांमध्ये खुन, चोरी, घरफोडी व दरोड्याचे गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी शेरअली मोती सय्यद याचे विरुध्द यवतमाळ शहर पोलीस ठाणे, यवतमाळ येथे खुनाचा व मोक्का कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल आहे.

### यांनी केली कामगिरी

सदरची कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय पाटील, पोलीस अंमलदार जावीद जमादार, महेश शिंदे, अनिल जाधव, धिरज सातपुते, आबाजी सावळे, विठ्ठल यलमार, राजु मुदगल तसेच सायबर पोलीस ठाणेकडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली.

## सासरच्या छळास कंटाळून विवाहितेची आत्महत्या; पती व नणंदेवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

चारित्र्याच्या संशयावरून होणाऱ्या छळास कंटाळून विवाहितेने आत्महत्या केली असून याप्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती व नणंदेवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गायत्री उर्फ पूनम संतोष विटकर (वय २५, रा. गवळी वस्ती, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत सत्यम्मा कानिफनाथ गोखले (रा. सिध्दरामेश्वर नगर, एमआयडीसी, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन संतोष शिवलाल विटकर व अंबिका गोटे यांच्याविरुध्द हा गुन्हा दाखल आहे. गायत्री व संतोष हे पती-पत्नी असून अंबिका ही संतोषची बहिण आहे. गायत्री ही सन २०१६ पासून लग्न झाल्यापासून पती संतोष याच्यासोबत सासरी नांदण्यास होती. पती संतोष व नणंद अंबिका या दोघांनी गायत्री हिने माहेरून पैसे आणण्याच्या कारणावरून तसेच तिच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिला सतत शिवीगाळ करून मारहाण केला. पती व नणंदेपासून होणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून गायत्री हिने २८ ऑक्टोबर रोजी दुपारी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. गायत्रीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याप्रकरणी पती संतोष व अंबिका या दोघांवर हा गुन्हा दाखल झाला आहे. सहायक पोलिस निरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

## ॲमेझॉनने भारतातून ई-कॉमर्स निर्यातीचा २० अब्ज डॉलर्सचा टप्पा ओलांडला

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग प्रोग्रामद्वारे २०१५ ते २०२५ दरम्यान लाखो भारतीय विक्रेत्यांना भारतातून २० अब्ज डॉलर्सची एकत्रित ई-कॉमर्स निर्यात करण्यास सक्षम केल्याची घोषणा ॲमेझॉनने आज केली.२०२५ पर्यंत भारतातून १० अब्ज डॉलर्सची एकत्रित ई-कॉमर्स निर्यात सक्षम करण्याचे लक्ष्य ॲमेझॉनने २०२० मध्ये ठेवले होते. मात्र, नंतर त्याच काळात हे लक्ष्य २० अब्ज डॉलर्स एवढे ठरवले गेले.हे वाढीव लक्ष्य देखील आता ॲमेझॉनने निर्धारित वेळेपूर्वीच पूर्ण केले आहे.ॲमेझॉनचा प्रमुख ई-कॉमर्स निर्यात कार्यक्रम,ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग, २०१५ मध्ये सुरू करण्यात आला. ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग इंडियाच्या प्रमुख श्रीनिधी कलवापुडी म्हणाल्या,आरोग्य आणि वैयक्तिक काळजी, सौंदर्य,खेळणी,घरगुती कपडे आणि फर्निचर यासारख्या भारताच्या पारंपरिक निर्यातीच्या सामर्थ्य क्षेत्रांमध्ये आम्ही लक्षणीय वाढ पाहिली आहे.२०१५ पासून, ॲमेझॉनने भारतातून २० अब्ज डॉलर्सची एकत्रित ई-कॉमर्स निर्यात केली आहे.



## नीलम श्रमजीवी नगर जि.प. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

एमआयडीसी परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नीलम श्रमजीवी नगर येथे इ.स. १९९७ सालच्या इयत्ता ७ वी तुकडीतील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला. शाळाच जणू पुन्हा भरली होती! असा अनुभव उपस्थित माजी विद्यार्थ्यांना आला.

या स्नेहमेळाव्याचा शुभारंभ त्या काळातील गुरुवर्य वनीता आवटे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रारंभी माजी विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका तसेच उपस्थित गुरुजनांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी माजी विद्यार्थी राजश्री आरळीकट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. स्नेहमेळावा यशस्वी पार पाडण्यासाठी आळगुंडगी, नागमल गायकवाड, जेटगी, विटकर, सुनील आरळीकट्टी, श्रीनिवास चिम्मन, चौगुले आदींनी परिश्रम घेतले. शेवटी गुरुजन आणि माजी विद्यार्थ्यांनी एकत्र स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

# महाराष्ट्र स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र तज्ञ संघटनेची क्षेत्रीय परिषद शनिवारपासून

### गुरुवर्य आणि ज्ञानदीप पुरस्काराचे होणार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

स्त्री रोग व प्रसूती शास्त्र तज्ञ संघटना, अकलूज आणि स्त्री रोग तज्ञ संघटना, सोलापूर यांच्या वतीने १ व २ नोव्हेंबर रोजी बालाजी सरोवर येथे इव्हॉल्व या महाराष्ट्र राज्य स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र तज्ञ संघटनेच्या, राज्य पातळीवरील क्षेत्रीय परिषदेचे आयोजन केल्याची माहिती अकलूज स्त्री रोगतज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. रेवती राणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यामध्ये राज्य व राष्ट्र पातळीवरील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ सहभागी होणार आहेत. नवीन औषधे, शस्त्रक्रियेतील नवीन तंत्र, रोबोटिक सर्जरी, पी.आर.पी. स्टेम सेल अशासारख्या अनेक नवीन यंत्रणांबद्दल यात विशेष माहिती सत्र होणार आहेत. यावेळी ज्या स्त्री रोग व प्रसूती शास्त्र तज्ञांनी रुग्ण सेवेचे व नवोदित डॉक्टरांना घडविण्याचे व्रत घेतले आहे अशा मान्यवरांना गुरुवर्य पुरस्कार तसेच ज्ञानदीप पुरस्कार या पुरस्कारांनी सन्मानित केले जाणार आहे. पदवीदान समारंभ होणार आहे. या परिषदेपूर्वी ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत पहिल्यांदाच एकावेळी तीन जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या त्रिसूत्री उपक्रमामध्ये पहिला कार्यक्रम आय. एम.ए हॉल येथे आशा सेविकांसाठी, ''सुरक्षित मातृत्व अभियानावर'' आयोजित केला आहे.

याप्रसंगी आयएमएच्या अध्यक्षा डॉ. मंजुषा शाह, खाजगी रुग्णालय संघटना अध्यक्ष डॉ संजय मंथाळे, डॉ गौरी कहाते यांचा प्रमुख सहभाग असेल. सिद्धेश्वर प्रशालेत सहावी ते दहावीच्या मुलांसाठी शारीरिक, मानसिक व लैंगिक शिक्षण देणारा ''ज्ञान प्रयास'' कार्यक्रम होणार आहे. अश्विनी ग्रामीण रुग्णालय कुंभारी येथील वैद्यकीय व नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी ''मी मनस्वी'' या कार्यक्रमांतर्गत आजकालची घटती प्रजनन क्षमता, त्यासाठी उपलब्ध चाचण्या, एग फ्रीझिंग याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. या पत्रकार परिषदेस डॉ. सुजाता कुलकर्णी, डॉ. मोनिका उंबरदंड, डॉ. केतकी जोशी, डॉ. रोहिणी देशपांडे, डॉ कविता कांबळे आदी उपस्थित होते.

## खड्डेमुक्त सोलापूर : स्मार्ट सिटीतील स्वप्नरंजन !

### कोट्यवधींचा खर्च, तरीही खड्ड्यांचे साम्राज्य




रस्ते हा विकासाचा आरसा असतो. दर्जेदार, टिकाऊ आणि जबाबदारीनिशी तयार होणारे रस्तेच सोलापूरच्या प्रगतीचा पाया ठरतील. मात्र सोलापूर शहराची ओळख 'खड्डेमय सोलापूर' अशी होत चालली आहे, हे दुर्दैवी वास्तव आहे. शहरातील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, कॉलनीतील गल्लीबोळ आणि सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांचा सहनशक्तीचा अंत होत असून, प्रत्येक प्रवास म्हणजे एखाद्या अडथळा शर्यतीसारखा अनुभव बनला आहे. गेल्या तीन वर्षांत तब्बल २५० कोटी रुपये खर्चून १९८ नवीन रस्ते करण्यात आले. पण त्यातील अनेक रस्त्यांवर पुन्हा खड्डे पडले आहेत. एवढ्या कोट्यवधींच्या निधीतून केलेले हे रस्ते जर तीन वर्षेही टिकत नसतील, तर गुणवत्ता नियंत्रणाची आणि ठेकेदारांवरील कारवाईची अवस्था काय आहे, हा प्रश्न स्वाभाविकच उपस्थित होतो. महापालिकेच्या फाइलवर ''दोष दायित्व कालावधी (डीएलपी)'' ची नोंद असली तरी प्रत्यक्षात ती केवळ कागदापुरती मर्यादित राहिली आहे. तर दुसरीकडे याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार ? की नुसत्या नोटिसांचा खेळ खेळला जाणार, असाही प्रश्न आता उपस्थित होत आहे.

अतिवृष्टी आणि मोठ्या पावसाचे कारण पुढे केले जाते, पण प्रश्न असा आहे की प्रत्येक वर्षी पाऊस होतोच मग त्या दृष्टीने दर्जेदार रस्ते का तयार होत नाहीत? सिमेंट काँक्रीटचे रस्ते बनवले जातात, पण तेथील पाया मजबूत नसल्याने काही महिन्यांतच ते उखडतात. ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करण्याऐवजी महापालिका 'नोटिस' या नाट्यमय खेळात वेळ घालवते. त्याचा परिणाम म्हणजे नागरिकांच्या पैशांचा आणि संयमाचा दोन्हींचा गैरवापर होतो. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांची हाडे खिळखिळी होत आहेत, मणक्यांचे आजार वाढले आहेत. शाळकरी मुले, रुग्णवाहिका आणि वृद्ध नागरिक या सगळ्यांना या दयनीय रस्त्यांवरून प्रवास करताना त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खड्डे मोजण्यासाठी महापालिका वेगवेगळ्या आयडिया राबवते. काही ठिकाणी मुरूम टाकला जातो तर काही ठिकाणी खड्डे बुजवण्यासाठी आजोरा भरला जातो. तर काही ठिकाणी दगड, फरशी तुकडे, विटा आणि दगड टाकून खड्डे बुजवले जातात. आधीच खड्डे आणि त्यात दगड, विटा आणि आजोरा यामुळे वाहन चालवणे अधिक कठीण होते. खड्डे बुजवण्याची ही महापालिकेची अभिनव तऱ्हा वेगळीच असते. त्यामुळे

प्रत्येक नागरिक आज मनोमन विचारतोय, ''आपलं शहर खड्डेमुक्त होणार कधी ?'' दरम्यान, नागरिकांमधून संताप व्यक्त होत असल्याने खड्डे बुजवण्यासाठी एमआयएमने स्वखर्चातून ''एक कॉल - खड्ड्याचा प्रॉब्लेम सॉल्व'' हा अनोखा उपक्रम बुधवारी राबवला. मौलाली चौक परिसरातील रस्त्यावरील खड्डे खाजगी यंत्रणा राबवून बुजविले. गांधीगिरी करत एमआयएमने खड्ड्याची समस्या आणि निष्क्रियतेकडे महापालिकेचे लक्ष वेधले. महापालिकेने आता फक्त डांबरी लेपाऐवजी गुणवत्तेला प्राधान्य, पारदर्शक ठेके पद्धत आणि जबाबदारी निश्चित करणारी कार्यसंस्कृती निर्माण करण्याची वेळ आली आहे. रस्त्यांवर खड्डे नसलेले सोलापूर हे फक्त स्वप्नरंजन न राहता वास्तव व्हावे, हीच नागरिकांची खरी अपेक्षा आहे.

सोलापूरच्या रस्त्यांनी गाडी नाही, तर नागरिकांचा विश्वासच डळमळीत केला आहे. प्रत्येक खड्डा सांगतो ते म्हणजे दुर्लक्ष, भ्रष्टाचार आणि जबाबदारीशून्यता ! पाऊस प्रत्येक वर्षी येतो, पण नियोजन कुठे हरवते ? खड्डेमुक्त सोलापूर हा फक्त आश्वासनांचा विषय राहिला; कृती मात्र शून्य आहे, अशी ओरड लोकांमधून होत आहे. म्हणूनच नागरिकांनी आता प्रश्न विचारलाच पाहिजे, ''आपल्या पैशाचा रस्ता कुठे जातो ?'' स्मार्ट सिटी म्हणून ओळख होऊ पाहणाऱ्या शहरातील प्रत्येक चौकात एकच प्रश्न, खड्डेमुक्त सोलापूर केव्हा? महापालिकेच्या कागदावर नियम आहेत, पण जमिनीवर फक्त खड्डेच आहेत. प्रत्येक प्रवास आता परीक्षा झाला आहे. वाहनचालकांच्या हाडांमध्ये वेदना, रुग्णवाहिकांना अडथळे आणि नागरिकांचा संयम संपला आहे. खड्डे केवळ रस्त्यावर नाहीत, ते जबाबदारीत आहेत, नियोजनात आहेत आणि नागरिकांच्या विश्वासात आहेत. खड्डेमुक्त सोलापूर हे फक्त स्वप्नरंजन नको, ते वास्तव व्हायलाच हवे कारण रस्ते जर मजबूत असतील, तरच सोलापूरचा पाया खऱ्या विकासावर उभा राहील....!

# शहरातील केवळ ७३१ मिळकतदारांनी दिवाळीदरम्यान भरला एक कोटीचा कर

## महापालिकेच्या अभय योजनेनंतर थकबाकीदारांचा थंडा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

दिवाळी सणादरम्यान शहरातील केवळ ७३१ मिळकतदारांनी १ कोटी २ लाख ३० हजार ६३४ रुपयांचा कर भरणा केला आहे. महापालिकेच्या अभय योजनेनंतर थकबाकीदारांचा थंडा प्रतिसाद मिळाला आहे.

दरवर्षी दिवाळीचा हा सण मोठ्या आनंदात साजरा करतानाच शहरातील मिळकतदारांकडून दिवाळी कालावधीत मोठ्या प्रमाणात मिळकत कर भरला जातो. मात्र यंदाच्या दिवाळी कालावधीत केवळ ७३१ मिळकतदारांनी १ कोटी २ लाख ३० हजार ६३४ रुपयांचा थकीत कर जमा झाला आहे. दिवाळीपूर्वीच महापालिका प्रशासनाने थकबाकी मिळकतदारांसाठी दंड आणि शास्तीमध्ये १०० टक्के सूट देणारी अभय योजना जाहीर केली होती. यामुळे यंदाच्या दिवाळी कालावधीत थकबाकी मिळकतदारांचा कर भरणासाठी अल्प प्रतिसाद मिळाला.

### बड्या थकबाकीदारांच्या याद्या तयार; आठवडाभरात कारवाई मोहीम सुरू होणार

महापालिका प्रशासनाने दंड आणि शास्तीमध्ये शंभर टक्के सूट देणारी अभय योजना थकबाकी मिळकतदारांसाठी जाहीर करून त्यांना मोठी संधी दिली होती. यानंतरही अद्यापही मोठ्या प्रमाणात थकबाकी मिळकतदार राहिले आहेत. सध्या महापालिका प्रशासनाकडून मोठ्या थकबाकीदारांना नोटिसा बजावून त्यांच्या मिळकतीवर महापालिकेचा बोजा चढविण्याची कार्यवाही सुरू आहे. शिवाय या मिळकतीच्या लिलावाची प्रक्रिया देखील राबविण्यात येत आहे. याबरोबरच आता आणखी मोठ्या थकबाकीदारांची यादी विभागाकडून तयार करण्यात आली असून त्यांच्यावर आठवडाभरात कारवाई मोहीम सुरू होणार असल्याचे सांगितले.



चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर विभागास ३१८ कोटी ४२ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. यानुसार १ एप्रिल ते २५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान २ लाख ६५ हजार मिळकतदारांपैकी १ लाख ६ हजार ३०४ मिळकतदारांनी सूट वगळता एकूण १४१ कोटी ८३ हजार ५१४ रुपयांचा कर जमा केला आहे. महापालिका मालमत्ता कर विभागाला प्रशासनाने दरमहा १६. ७५ कोटी वसुलीचे उद्दिष्ट दिले आहे. त्यानुसार मालमत्ता कर विभागाने दि. १ एप्रिल ते २५ ऑक्टोंबरपर्यंतच्या कालावधीमध्ये दिलेल्या ४१ कोटी ४२ लाख रुपयांच्या सवलतीसह १६० कोटी १९ लाख रुपयांची विक्रमी वसुली आहे.

दरम्यान, महापालिकेच्या अभय योजनेअंतर्गत दि. २१ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर या कालावधीत मिळकत कराची ७२.९९ कोटींची वसुली झाली. या योजनेचा ३४ हजार ७५० मिळकतदारांनी लाभ घेतला. यामुळे दिवाळी सण कालावधीत थकबाकी मिळकत कर भरण्यासाठी दरवर्षीप्रमाणे म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. अद्यापही दीड लाखावर थकबाकीदार मिळकतदार असून लाखावरील थकबाकी मिळकतदारांवर आठवडाभरात वसुलीसह कारवाई मोहीम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती विभागाचे अधिक्षक युवराज गाडेकर यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल येथे नवचेतना शिबिराचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर, सोलापूर व आर्ट ऑफ लिविंग यांच्या संयुक्त विद्यमाने नवचेतना शिबीराचे उद्घाटन माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परमपूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीपप्रज्वलन करण्यात आले. योगशिक्षक सुहास मंता, नरेश अण्णम, अंबिका गाजूल यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी योगशिक्षक सागर गाजुल यांनी योगासनाचे महत्त्व, फायदे व शिबिराविषयी माहिती सांगितली. तसेच माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांनी योगासनामुळे शारीरिक,मानसिक व भावनिक विकास होतो, शरीर लवचिक होते. सर्व नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा व आनंदी जीवन जगावे असे सांगत शुभेच्छा दिल्या. शिबिरास ज्येष्ठ शिक्षक भारत राऊत, परमेश्वर चांदोडे, नरेंद्र कामशेट्टी, संतोष हिरेमठ, अमरनाथ कदारे, संतोष स्वामी उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिलकुमार गावडे यांनी केले तर आभार रमेश आगवणे यांनी मानले.



## 'सिद्धरामेश्वर माझा विसावा' पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

नवोदित लेखक निलेश महामुनी लिखित सिद्धरामेश्वर माझा विसावा पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शुक्रवार पेठेतील कालिका मंदिरात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतीले तर प्रमुख अतिथी म्हणून गिरीश देवरम नी,चंद्रकांत वानकर, विनायक महिंद्रकर,चंद्रकांत वेदपाठक,वसंतराव महामुनी, शिवसेना जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाण,महेश धाराशिवकर, निलेश धाराशिवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. निलेश महामुनी यांनी ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यात्रेतील मानाच्या चौथ्या नंदीध्वजावर विसावा पूर्ण केला होता त्याप्रसंगाचे क्षण पुस्तकात शब्दबद्ध केले असून हे पुस्तक प्रत्येकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतीले यांनी मांडले. नवोदित लेखक निलेश महामुनी यांनी पुस्तक लिहिण्या मागचे उद्देश स्पष्ट करताना सांगितले की नंदीध्वज विसावा पुर्ण करताना आलेले अनुभव नंदीध्वज मास्तरांचे मार्गदर्शन कसे लाभले याबाबत सांगितले. विशेष म्हणजे कारागृहात राहुन त्यांनी हे पुस्तक लिहिलेलं आहे. याप्रसंगी मानाच्या पाचव्या नंदीध्वजाचे मुख्य मास्तर शिवयोगी बनशेट्टी, सोमनाथ मेंडके, प्रसाद कुमठेकर, कुमार शिरसी उपस्थित होते.



## रमाबाई आंबेडकर नगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ


**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून प्रभाग क्र. १ ब येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत रमाबाई आंबेडकर नगर परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ आमदार देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या कामासाठी एकूण रु. १ कोटी ४४ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे परिसरातील सांडपाणी समस्येचे निराकरण होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याप्रसंगी सभागृहनेते संजय कोळी, नगरसेविका राजश्री कणके, संजय कणके, पिंटू ढावरे, अजित गादेकर, सुजित अवघडे, सुहास सावंत, विजयानंद काळे, शोभाताई सोनवणे, अमोल वामणे, शरणू हजारे, अक्षय थोरात, रवी कांबळे उपस्थित होते.

## सोलापुरात ३ ते ५ नोव्हेंबर रोजी गझल महोत्सवाचे आयोजन

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्याकडून दि. ३, ४ आणि ५ नोव्हेंबर या तीन दिवसीय हुतात्मा स्मृती मंदिरमध्ये सायंकाळी ६.३० वाजता गझल महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समन्वयक अमोल धाबळे यांनी दिली. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच



सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांच्या प्रयत्नाने गझल महोत्सव ३, ४, ५ नोव्हेंबर रोजी आयोजित केलेला आहे. या गझल महोत्सवामध्ये कवन प्रस्तुत अक्षर अक्षर तुझेच आहे (गझल विशेष मैफल), गझलनवाज भीमराव पांचाळ यांचे शब्द सुरांची भावयात्रा, तसेच वैभव जोशी आणि दत्तप्रसाद रानडे यांचा सोबतीचा करार (गझल मैफल) या कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. गझल महोत्सवातील हे तीनही कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिर येथे सायंकाळी ६:३० वा. आयोजित होणार आहेत. या कार्यक्रमाला मोफत प्रवेश असला तरी प्रवेशिका घेणे अनिवार्य आहे. या प्रवेशिका हुतात्मा स्मृती मंदिर येथील बुकिंग ऑफिसमध्ये उपलब्ध आहेत. या तीन दिवसीय गझल महोत्सवाला सोलापूरकर रसिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

# 'कॉल फॉरवर्डिंग'चा फंडा; नागरिकांना ऑनलाईन गंडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**

सायबर गुन्हेगारांनी नागरिकांची फसवणूक करण्यासाठी नवे तंत्र वापरण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांना ऑनलाइन गंडा घालण्यासाठी सायबर गुन्हेगारांनी आता 'कॉल फॉरवर्डिंग'चे तंत्र अवलंबले असून, त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर नागरिकांना गंडवले जात आहे. याबाबत सोलापूर शहर पोलिसांच्या सायबर पोलिस ठाण्याने नागरिकांना इशारा देऊन सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

'कॉल फॉरवर्डिंग स्कॅम' यात सायबर गुन्हेगार नागरिकांना विविध कारणांनी मोबाइलवरील कॉल्स फॉरवर्ड करण्यास सांगतात. नागरिकांनी तसे केल्यास, त्यांच्या मोबाइलवर येणारे ओटीपी, बँक व्यवहार किंवा यूपीआय व्यवहारांशी संबंधित कॉल्स थेट फसवणूक करणाऱ्यांकडे वळिवले



> कॉल फॉरवर्डिंगद्वारे फसवणूक झाल्यास तातडीने www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर अथवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क करावा. सतर्क राहून अशा कॉल्स व संदेशांपासून स्वतःचा बचाव करावा.
> **- श्रशैल गजा, पोलिस निरीक्षक,**
> सोलापूर सायबर पोलिस ठाणे.

(डायव्हर्ट) होतात. त्याद्वारे गुन्हेगार बँक खात्यांतील रक्कम चोरतात किंवा वैयक्तिक माहिती मिळवतात. काही गुन्हेगार नागरिकांना 'केवायसी अपडेट', सिम कार्ड समस्या किंवा बँक पडताळणीसाठी एका विशिष्ट कोडवर डायल करण्यास सांगतात. हा कोड सामान्यत ' ✻२१' किंवा '✻४०१' ने सुरू होतो आणि शेवटी मोबाइल नंबर दिला जातो. उदाहरणार्थ, ४०१ (मोबाइल नंबर) # किंवा ✻२१ (मोबाइल नंबर) असे कोड टाकल्यास तुमचे कॉल्स आपोआप दुसऱ्या व्यक्तीकडे फॉरवर्ड होतात.

**गुन्हेगारांकडून नागरिकांच्या फसवणुकीची नवी पद्धत**

### फसवणूक टाळण्यासाठी काय करावे ?

- अनोळखी व्यक्ती सांगेल तो 'यूएसएसडी कोड' कधीही डायल करू नका.
- मोबाइलवर *#21# हा क्रमांक डायल करून कॉल फॉरवर्डिंग सक्रिय आहे का, हे तपासा. कॉल फॉरवर्डिंग 'एनेबल्ड' दिसल्यास त्वरित बंद करा.
- सर्व कॉल फॉरवर्डिंग थांबवण्यासाठी ##002# हा कोड डायल करा.
- मोबाइल कंपनीच्या कस्टमर केअरशी संपर्क साधा.
- बैंकिंग व्यवहारांबाबत तत्काळ बँक शाखेशी संपर्क साधून खाते लॉक किंवा फ्रीझ करा.

### या प्रकारातून होणारे नुकसान...

- ओटीपी चोरी : बँक, यूपीआय, क्रेडिट, डेबिट कार्ड व्यवहारांशी संबंधित 'ओटीपी' थेट फसवणूक करणाऱ्यांकडे पोहोचतात.
- मोबाइल कॉल्स न मिळणे : तुमच्या नंबरवर कोणी कॉल केल्यास तो दुसऱ्या व्यक्तीकडे डायव्हर्ट होतो.
- सोशल इंजिनीअरिंग: मित्र, नातेवाइक किंवा व्यावसायिक संपर्कातून गुन्हेगार विश्वास मिळवून मोठी फसवणूक करू शकतात.
- गोपनीयता धोक्यात बँक, जॉब, बिझनेस इत्यादी कॉल्सही गुन्हेगारांकडे पोहोचू शकतात.

# अवैधरित्या वापर होणारे १० घरगुती गॅस सिलेंडर जप्त

**कार्तिकीच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० ऑक्टोबर-**

पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेचा सोहळा सुरु झाला आहे. त्यामुळे पंढरपूर शहर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते. या गर्दीमध्ये घरगुती सिलेंडरचा अवैद्यरित्या वापर केल्यास मानवी जीवित हानी होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन दि.२८ रोजी तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात अवैधरित्या घरगुती गॅसचा हॉटेलम ध्ये वापर होत असल्याच्या ठिकाणी कारवाई करण्यात आली.



या मध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर व्यावसायीक कामासाठी करताना जप्त करण्यात आले तर व्यावसायीक वापरातील तीन गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पुरवठा निरीक्षक विजय बादल, पोलीस उपनिरीक्षक पिसाळ तसेच पुरवठा शाखेतील महसूल सहाय्यक उमेश हिंगमिरे, नेताजी ओव्हाळ यांच्या संयुक्त पथक कार्यरत आहे.

पंढरपूर शहरातील मंदिर परिसर, प्रदक्षणा मार्ग, उज्वला सेतू लगत, गजानन महाराज मठालगत घरगुती वापरातील गॅस सिलेंडरचा वापर करणाऱ्या हॉटेल मधून घरगुती वापरातील एकूण सात सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. तर व्यावसायिक वापरातील तीन गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. कार्तिकी यात्रेत येणारे लाखोंच्या संख्येने भाविक पाहता पंढरपूर शहर व परिसरातील हॉटेल विक्रेते यांना घरगुती गॅसचा वापर न करता व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करण्याचे प्रशासनामार्फत आवाहन करण्यात आले.



# ठोकळ प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी बँक व्यवहाराविषयी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात बँकांचे महत्त्व अत्यंत मोलाचे आहे. ठेवी, आरडी, एफडी, चलन व्यवहार, सरकारी योजना यांसह ऑनलाईन बँकिंग, इंटरनेट बँकिंग आणि एसएम एस बँकिंगमुळे आर्थिक व्यवहारात मोठे बदल झाले आहेत.

याच पार्श्वभूमीवर श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, विजापूर रोड येथे बँक व्यवहाराविषयी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत ब्रह्मदेव माने बँकेचे व्यवस्थापक संजय कदम यांनी विद्यार्थ्यांना बँक खाते उघडणे, ठेवी भरणे, पैसे काढणे, एटीएमचा वापर, डेबिट-क्रेडिट कार्ड, सेव्हिंग व करंट अकाउंट, शैक्षणिक कर्ज यांसारख्या विविध बँक सुविधा यांविषयी मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.

कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ व सचिव भिकाजी गाजरे यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.



# लेखी आश्वासनानंतर वेताळ परिवाराचे उपोषण मागे

**नामंजूर घरकुलासाठी केले होते उपोषण**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३० ऑक्टोबर-**

मोडनिंब (ता.माढा) येथे घरकुलासाठी श्री वेताळ परिवाराच्या वतीने आमरण उपोषण करण्यात आले होते. दोन दिवसांनंतर पंचायत समितीच्या अधिकाऱ्यानी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले. प्रधानमंत्री आवास घरकूल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना न्याय मिळावा, थांबवलेले हप्ते तत्काळ सोडावेत आणि पात्र नागरिकांना घरकुलाचा हक्क मिळावा, या मागण्यांसाठी ग्रामदैवत श्री वेताळ परिवार, मोडनिंब यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.

प्रकाश गिड्डे, ऋषिकेश कोठावळे आणि समस्त वेताळ परिवार यांनी केले. २३३ लाभार्थ्यांचे हप्ते थांबवणे आणि १०९ घरकूल नाकारणे या अन्यायकारक निर्णयाविरोधात गावात तीव्र असंतोष निर्माण झाला होता. ग्रामपंचायतीकडे आणि प्रशासनाकडे अनेकवेळा पत्रव्यवहार करूनही तोडगा न निघाल्याने अखेर वेताळ परिवाराने उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. या पत्रात पंचायत प्रशासनाने मागण्या मान्य करत काही महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. त्यानुसार, ४९१ लाभार्थ्यांपैकी २३३ जणांना पहिला हप्ता आधीच देण्यात आला असून, उर्वरित १८२ लाभार्थ्यांना लवकरच हप्ता मंजूर करण्यात येईल. तसेच १०९ लाभार्थ्यांच्या पात्रतेची फेर तपासणी करून १० नोव्हेंबरपर्यंत अहवाल सादर करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच, पूर्वीच्या कामांमध्ये झालेल्या संभाव्य अनियमिततेची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याचे आणि पारदर्शकतेने योजना राबविण्याचेही ग्रामपंचायतीने लेखी दिले आहे. याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर कांबळे, हनुमंत कुंभार, धनाजी लादे, सुरेश जाडकर, किरण तोडकरी, दीपक सुर्वे, राजकुमार खडके, शंकर कोठावळे, दत्ता जाडकर, संजीव शिंदे, चंद्रकांत ओहोळ उपस्थित होते.

# निसर्ग सर्वांना समान वागणूक देतो

**▶▶संत श्री हवा मल्लिनाथ महाराज; श्री सिध्दारूढ महात्मे या विषयावर पुराण**



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० ऑक्टोबर-**

या पृथ्वीवर मानवसारखं पशु, पक्षी, प्राणी, कीटकसह लाखो जीव वावरत आहेत. मात्र निसर्ग या सर्वांना कोणताही भेदभाव न करता समान वागणूक देत आहे. यामुळे मानव धर्माचा जय असो म्हणण्यापेक्षा निसर्ग धर्माचा जय असो असे जयजयकार करण्याचा संदेश जय भारत माता सेवा समितीचे नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज यांनी दिले.

तालुक्यातील मैंदर्गी येथील श्रीक्षेत्र सिध्दाश्रम विरक्त मठ येथे प.पु म.नी प्र बसवलिंग महास्वामिजी वीरक्त मठ अक्कलकोट यांच्या सानिध्यात तसेच मैंदर्गी येथील सिध्दारूढ वीरक्त मठाचे मठाधीपती प. पु. मृतंजय महाराज यांच्या नेतृत्वखाली २४ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान प.पु. श्री ष ब्र. चिदानंद भारती महास्वामीजी सिध्दारूढ मठ, चिक्कोडी जिल्हा, बेळगाव यांच्या रसाळ वणीने रोज सायंकाळी श्री सिध्दारूढ महात्मे या विषयावर पुराण कार्यक्रम सुरु आहे. मादन हिप्परगा येथील शांतमल्लाप्पा बट्टरकी व बसवराज गुरुपादप्पा बुट्टरकी यांचा गायनाचा आणि वीरेश एम. सोन्नाडा यांचा तबला वाद्याचा साथ त्यांना लाभला आहे. याप्रसंगी राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज यांचा मैंदर्गी गावातून एका रथा विविध वाद्य समवेत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील जमेलला सर्व भक्तांना आशीर्वाद देऊन दिव्य संदेश दिले. याप्रसंगी पूज्य घनलिंग स्वामीजी निरीलकिरी, पूज्य सिधलिंग देवारू मठ नागणसूर महास्वामीजी प. पु. सिद्धलिंग देवरु बिजापुर, अँड बसवराज सलगर उपस्थित होते. सूत्रसंचालन कल्याणप्पा बिज्जरगी यांनी केले.

> देश सेवा हेच इश सेवा आहे. कोणीही जात, पात, धर्म, पक्ष यांच्या आधारावर लढू नये. आज प्रत्येकासाठी देश आणि राष्ट्रधर्म हा सर्वोच्च असला पाहिजे. सर्व धर्मांम ध्ये समानता असली पाहिजे. देशाला होणाऱ्या त्रासातून बाहेर पडण्यासाठी सर्व भारतीयांनी एकरूप व्हावे, देशाची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा ठेवणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. सर्वांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन देशाच्या भल्यासाठी झटले पाहिजे
> **- राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज**
> राष्ट्रीय अध्यक्ष जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली

## इंचगाव येथे शेतीच्या वादातून शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

शेतीच्या वादातून इंचगाव (ता. मोहोळ) येथे शेतकऱ्याने विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. गोपीनाथ बबन वराडे (वय ४२) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. दि.३० ऑक्टोबर रोजी दुपारी गोपीनाथ वराडे यांनी स्वतःच्या शेतात शेतीच्या वाद-ातून पिकांवर फवारणी करण्याचे औषण प्राशन केले.

त्यामुळे वराडे यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# ओंकार कारखाना उच्चांकी दराची परंपरा कायम ठेवणार

**चेअरमन बोत्रे-पाटील; गळीत हंगामाचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० ऑक्टोबर-**

मी शेतकरी कुटुंबातील असल्याने शेतकऱ्यांच्या काय अडचणी आहेत याची जाणीव मला आहे. त्यामुळेच ओंकार साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून ऊसाला गेल्या पाच वर्षांपासून सर्वात जास्त दर दिला. २०२५ व २०२६ या सिझनला दर सर्वोत्तम राहिल. ओंकार कारखाना उच्चांकी दराची परंपरा कायम ठेवणार, अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी दिली.



माळशिरस तालुक्यातील ओंकार साखर कारखान्याचा सहाव्या गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

रायगड जिल्हा बँकेचे चेअरमन जयंत पाटील, ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बोत्रे-पाटील, अर्बन बँकेच्या चेअरमन सुप्रिया पाटील, संचालिका रेखा बोत्रे-पाटील यांच्या हस्ते गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. जयंत पाटील म्हणाले, ओंकार साखर कारखाना परिवाराने बंद अवस्थेत असणारे साखर कारखाने चालू करून शेतकऱ्यांना सर्वात जास्त बाजार भाव देऊन वेळेत ऊस बीले वेळेत, दिली लाखो हातांना काम दिले व या भागाचा कायापालट केला ही बोत्रे-पाटील यांची कौतुकास्पद कामगिरी आहे. गत वर्षीच्या ऊसास ३००५ दर दिल्याबद्दल ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने बोत्रे-पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अर्बन बॅंकेच्या चेअरमन सुप्रिया पाटील, ओंकारच्या संचालिका रेखा बोत्रे-पाटील, चांदापुरी सरपंच जयवंत सुळ, जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, केन मॅनेजर शरद देवकर, तरंगफळचे सरपंच नारायण तरंगे, निमगावचे माजी सरपंच हनुमंत पवार ,जवाहर शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष महादेव मगर, सर्जेराव पवार, प्रकाश पवार, रावसाहेब तरंगे, दत्ता मगर, प्रकाश मगर, नितीन जाधव, सर्जेराव पिंगळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावता शिंदे निलेश गुरव रमेश आवताडे, सर्जे राव कचरे यांनी परिश्रम घेतले.

# वेळापूर, तांबवे येथील विकासकामांसाठी निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

वेळापूर व तांबवे परिसरातील महत्त्वाच्या विकासकामांसाठी तात्काळ निधी मंजूर करावा, यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षातर्फे हे निवेदन तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांना निवेदन देण्यात आले.

वेळापूर येथील सर्व सुविधा असलेले एस.टी. बसस्थानक मंजूर करणे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे ट्रॉमा केअर सेंटर किंवा ग्रामीण रुग्णालयात रूपांतर, फुले शाहू आंबेडकर नगर येथे तक्षशिला बुद्ध विहारासमोर सभा मंडप बांधकाम, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व व्यायामशाळा उपलब्ध करणे, तसेच तांबवे परिसरातील पायरीपूल ते तांबवे रस्ता दुरुस्ती या मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी माजी आ.राम सातपुते सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस. एम. गायकवाड, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे विनोद रणदिवे, रोहित सोरटे उपस्थित होते. निवेदनातील मागण्यांचा सकारात्मक विचार करून कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री गोरे यांनी यावेळी दिले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आदिलाबाद आणि पंढरपूर दरम्यान विशेष रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
कार्तिकी एकादशी निमित्त प्रवासी भाविकांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी रेल्वे आदिलाबाद आणि पंढरपूर दरम्यान विशेष गाड्या चालवणार आहे. ट्रेन क्रमांक ०७६१३/०७६१४ आदिलाबाद-पंढरपूर विशेष ४ फेऱ्या असतील. ट्रेन क्रमांक ०७६१३ विशेष ३१ ऑक्टोबर आणि ४ नोव्हेंबर रोजी आदिलाबादहून सकाळी ८:३० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री २ वाजता पंढरपूरला पोहोचेल. या गाडीच्या २ फेऱ्या होतील. तर ट्रेन क्रमांक ०७६१४ स्पेशल पंढरपूर येथून १ आणि ५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता निघेल आणि आदिलाबादला दुसऱ्या दिवशी दुपारी १२:१५ वाजता पोहोचेल. या गाडीच्या ही फेऱ्या होतील. किनवट, बोधडी बुजुर्ग, धानोरा डेक्कन, सहस्त्रकुंड, हिमायतनगर, भोकर, मुदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, पानगाव, लातूर रोड, लातूर, हरंगुळ, औसा रोड, ढोकी, येडशी, धाराशिव, पांगरी, बार्शी टाऊन, शेंद्री, कुर्डुवाडी, मोडलिंब असे थांबे असतील तर १- टियर, ४ स्लीपर क्लास, १३ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ लगेज कम गार्डच्या ब्रेक व्हॅन. २० कोच अशी असणार आहे.



## लसीकरणामुळे लम्पीवर नियंत्रण मिळविण्यात यश

**सात लाख जनावरांना लस**

**जिल्ह्याला मिळालेली लसीची मात्रा : ७ लाख १ हजार ५०० डोस**

**लसीकरण झालेल्या जनावरांची संख्या : ६ लाख ९८ हजार ५००**

**लसीकरण केल्यामुळे लंपी या साथीच्या आजारावर**

> सद्य:स्थितीला जिल्ह्यात नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. सध्या या रोगाने प्रादुर्भाव असलेल्या जनावरांची संख्या अल्प आहे. साथ नियंत्रणात आल्यामुळे नुकसानीची तीव्रता कमी झाली आहे.
> - **विशाल येवले,** उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
जिल्ह्यात गोवंशातील जवळपास सात लाख पशूना लंपीची लस देण्यात आली आहे. लसीकरण पूर्ण झाल्यामुळे या साथीच्या रोगाची तीव्रता कमी झाली आहे. सर्वात जास्त लसीकरण हे सांगोला तालुक्यात करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये जिल्ह्यात लंपीच्या साथीने जनावरांचा बळी घेतला आहे. या साथीमुळे दूध उत्पादनही घटले आहे.


राज्य सरकारने गोवंशातील लंपी या जीवघेण्या चर्म आजाराच्या नियंत्रणासाठी प्रमाणात लसीकरण मोहीम राबवली आहे. या मोहिमे अंतर्गत जिल्ह्यात जवळपास सात लाख गाई बैल व वासरांना लस देण्यात आली आहे. जिल्ह्यात विशेषतः सांगोला, माळशिरस, माढा पंढरपूर या तालुक्यात लंपी रोगाचा प्रादुर्भाव जास्त झाला होता. संकरित गाई या रोगाला सर्वात जलद गतीने बळी पडत असल्यामुळे शेतकऱ्यांना फार आर्थिक फटका सहन करावा लागला. दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले व गोठ्यातील किमती गाई दगावल्या. खिलार जनावरांम ध्येही लंपी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला. यामुळे राज्य सरकारने गेल्या वर्षभरापासून या साथीच्या नियंत्रणासाठी लसीकरणाचा कार्यक्रम आखला होता. सरकारने राबवलेल्या लसीकरण मोहिमेमुळे या रोगाला नियंत्रित करण्यात यश आल्याचे दिसून येत आहे.

### महत्त्वाचे



### श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात ६७ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात गुरुवारी ६७ जणांनी रक्तदान केले. वेळेत रक्तपुरवठा झाल्यामुळे शहरातील रक्ताची गरज असणाऱ्या रुग्णांना दिलासा मिळाला आहे. शहरात निर्माण झालेल्या रक्ताच्या तुटवड्यामुळे रुग्णांना रक्ताची कमतरता भासू नये, याकरिता श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज भक्तांर्फे गुरुवारी सम्राट चौक येथील मंदिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर शहरात सध्या रक्ताच्या तीव्र तुटवड्याची स्थिती आहे. या संकटामुळे रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्तपुरवठा होण्याबाबत साशंकता निर्माण झाली होती. त्यामुळे श्री सद् गुरू प्रभाकर स्वामी महाराज भक्तांनी गुरुवारी तातडीने या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज भक्तांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ६७ जणांनी रक्तदान केले. डॉ. हेडगेवार रक्तपेढीने रक्त संकलनासाठी सहकार्य केले. याप्रसंगी श्री सद् गुरू प्रभाकर स्वामी महाराज सार्वजनिक ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वसंत बंडगर, वामन वाकचौरे, सम्राट राऊत, रवी गुंड, सुभाष बद्रूकर, रमेश देशमुख, मंदिराचे व्यवस्थापक निरंजन दंतकाळे, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष सतीश मालू, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, रवी कोटा उपस्थित होते.



### हावळे परिवाराकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल फेलोशिप पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
भारतीय दलित साहित्य अकादमी, नवी दिल्लीतर्फे प्रदान करण्यात येणारा 'बाबासाहेब डॉ. आंबेडकर नॅशनल फेलोशिप पुरस्कार - २०२५' हा प्रतिष्ठेचा सन्मान बीएसएनएल कार्यालय अधीक्षक आणि समाजसेवक श्री. सुजित सुरेश हावळे (सोलापूर) यांना जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर निवारा बालगृह, समतभूमी-मोहा फाटा (ता. जामखेड, जि. अहमदनगर) या संस्थेच्या प्रतिनिधींनी सोलापूर येथे हावळे परिवाराच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचा सत्कार केला. निवारा बालगृहाचे संस्थापक ॲड. डॉ. अरुण जाधव, संचालक बापू ओहोळ, अधीक्षक वैजिनाथ केसकर व व्यवस्थापक संतोष चव्हाण यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि बाबासाहेबांचा फोटो देऊन हावळे परिवाराचा सन्मान केला. हावळे परिवाराने गेल्या अनेक वर्षांपासून अनाथ, निराधार, ऊसतोड मजूर, विटभट्टी कामगार, भटके-विमुक्त आणि आदिवासी वंचित घटकांतील मुलांसाठी कार्यरत असलेल्या निवारा बालगृहास वेळोवेळी आर्थिक सहाय्य, धान्य व आवश्यक साहित्य देणगी स्वरूपात दिले आहे. या पार्श्वभूमीवरच दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेत त्यांना प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

## कार्तिकी वारीत सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य

- **गहिनीनाथ महाराज औसेकर**
- **वारकरी आणि भाविकांसाठी मंदिर प्रशासन सज्ज**
- **वॉटरप्रुफ दर्शनमंडपाची उभारणी व अन्नछत्र २ हजार ५०० कर्मचारी, स्वयंसेवकांची नियुक्ती**





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० ऑक्टोबर-**
कार्तिकी शुध्द एकादशीला म्हणजे दिनांक २ नोव्हेंबर रोजी कार्तिकी यात्रा संपन्न होत आहे. या दिवशी उपमुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा आयोजित करण्यात आली आहे.या यात्रेचा कालावधी दि.२६ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर असा आहे. या यात्रेला सुमारे १० ते १२ लाख भविक पंढरपूरात येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर वॉटरप्रुफ ताडपत्री शेड, जादा दर्शनमंडपाची निर्मिती, आपत्कालीन मार्ग, विश्रांती कक्ष, दर्शन रांगेत बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा - खिचडी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत. यात्रेनिमित्त भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात आले असून, दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविण्यासाठी अनुभवी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय सेवेच्या दृष्टीने रुग्णवाहिका वैद्यकीय पथकासह, प्रथमोपचार केंद्र, स्वयंसेवी संस्थेमार्फत मोफत वैद्यकीय व्यवस्था असणार आहे. याशिवाय, आरोग्य विभागामार्फत श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप व रिध्दी सिध्दी दर्शनमंडप येथे आयसीयु, बाजीराव पडसाळी, सारडा भवन इत्यादी ठिकाणी आरोग्य व्यवस्था असणार आहे.

महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष तसेच चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहेत. याशिवाय, सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यांसह, सिक्युरिटी यंत्रणा, अत्याधुनिक १२५ सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बॅग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलिसी व्यवस्था करण्यात आली असल्याचे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगितले. स्वच्छतेसाठी विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचाऱ्यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा ठिकाणची स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्दतीने करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत आहे. दर्शनरांगेत नवमीपासून चहा-शाबुदाणा, तांदळाची खिचडी तसेच रिध्दी सिध्दी दर्शनमंडप येथे दशमी, एकादशी व द्वादशीला अन्नछत्र सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंदिर समितीचे संकेतस्थळ (www.vitthalrukminimandir.org), मोबाईल ॲप (श्री.विठ्ठल रुक्मिणी देवस्थान,पंढरपूर) वरून श्रीचे लाईव्ह दर्शन उपलब्ध असून पत्राशेड दर्शन रांग व मंदिर परिसरात एल.ई.डी. स्क्रिन बसविण्यात येत आहे. याशिवाय, देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी QR CODE, RTGS, सोने-चांदी वस्तु दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडूप्रसाद व त्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व श्री विठ्ठल रुक्मिणी या तीन भक्तनिवासामधील ३६१ रूममध्ये सुमारे १ हजार ६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

यात्रा निर्विघ्नपणे आणि सुरळीत पार पाडण्यासाठी व वारकरी भाविकांना केंद्र बिंदू मानून त्यांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य सर्वश्री आ.रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ॲड. माधवी निगडे, ह्भप प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह्भप शिवाजीराव मोरे परिश्रम घेत असून २ हजार ५०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी दिली.

## जिल्ह्यात ६६ हजार ८४५ कुणबी नोंदी आढळल्या

- **आजतागायत ५२ हजार २४९ जात प्रमाणपत्रांचे वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
विविध जातींची प्रमाणपत्रे वाटप करणे, कुणबी जातीच्या नोंदी शोधण्यासंदर्भात सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांकडून सुधारित परिपत्रक मध्यंतरी प्रसिद्ध करण्यात आलं आहे. सुधारित परिपत्रकामध्ये सेवा पंधरवड्यात विविध जातीचे प्रलंबित प्रमाणपत्र वाटप करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर कुणबी जातीच्या नोंदी शोधण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत. यापूर्वीच्या परिपत्रकात सेवा पंधरवड्यात मराठा आरक्षण प्रमाणपत्रे वाटण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

जिल्हा प्रशासनाच्या विविध २५ विभागाकडून आजतागायत ९२ लाखाच्यावर कुणबी नोंदी तपासल्या असून, यामध्ये ६६ हजार ८४५ इतक्या कुणबी नोंदी आढळल्या आहेत. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर ५ दिवस आमरण उपोषण केले. त्यांच्या या लढ्याला यश आलं आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची प्रमुख मागणीसह हैदराबाद आणि सातारा गॅझेटची मागणी त्यांनी केली होती.

सरकारने त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या असून मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय काढण्यासाठी २ महिन्यांचा कालावधी मागितला आहे. तर इतर मागण्यांचे शासन निर्णय जारी केले आहेत. त्यानुसार, अखेर शासनाने हैदराबाद गॅझेट आणि इतर मागण्यांचे शासन निर्णय जारी केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतले होते. यावेळी जरांगे पाटील यांचा हैदराबाद गॅझेट अंमलबजावणीसाठी शासन निर्णय करण्याचे शासनाने मान्य केले आहे. तर आंदोलनातील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत, आंदोलनातील मृतांच्या वारसांना शासकीय नोकरी, मराठा आंदोलकांवरील केसेस मागे, प्रलंबित जात पडताळणीला मान्यता तर आंदोलकांवरील गुन्हे घेण्यास मान्यताही मान्य केली होती. इतकेच नाहीतर मनोज जरांगेंच्या प्रलंबित मागण्यांनतर सातारा गॅझेट अंमलबजावणीसाठी १ महिन्याची मुदत, मराठा-कुणबी एकच शासन निर्णय २ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

> **आजतागायत वितरित केलेल्या जात प्रमाणपत्रांची संख्या**
>
> दि. २४ ऑक्टोबर २०२३ ते आजतागायत कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा ५२ हजार ७६० इतके अर्ज प्राप्त झाले होते. यामध्ये कुणबी प्रमाणपत्र वाटप ५२ हजार ०५०, मराठा कुणबी ३१ आणि कुणबी मराठा १६६ अशा एकूण ५२ हजार २४९ इतक्या प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. ५०३ प्रमाणपत्रे कागदपत्राअभावी नाकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. यामध्ये उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ यांच्याकडून २२४५७, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. २ यांच्याकडून ६३, उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुर्डुवाडी यांच्याकडून २०,६१०, उपविभागीय अधिकारी पंढरपूर ८ हजार २४०, उपविभागीय अधिकारी मंगळवेढा १३३ आणि उपविभागीय अधिकारी माळशिरस विभाग अकलूज ७५६ अशी एकूण ५२ हजार २४९ प्रमाणपत्रे वितरित केली आहेत.

## तीन हजार पोलिसांचा ताफा तैनात

- **उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे**
- **वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा सज्ज**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० ऑक्टोबर-**
कार्तिकी शुद्ध एकादशी २ नोव्हेंबर रोजी असून या यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.



वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाद्वार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १२ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली. तसेच वारकरी भाविकांना रहदारीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी ५ अतिक्रमण पथके नेमण्यात आली आहेत. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ७ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतूक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे. तसेच वाहतूक नियमनासाठी शहराबाहेर १२ तर शहराअतर्गत १० ठिकाणी डायव्हर्शन पॉईंट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खासगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १६ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली असून या ठिकाणी सुमारे १० ते ११ हजार वाहनांची पार्कींग व्यवस्था होणार आहे.



> **असा आहे पोलिस बंदोबस्त**
>
> कार्तिकी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षा तसेच अतिक्रमण मोहिमेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतूक नियंत्रणासाठी तीन हजार ५७ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, एक अप्पर पोलीस अधिक्षक, १२ पोलीस उपअधिक्षक, ३० पोलीस निरिक्षक, १२७ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, एक हजार ३८६ पोलीस अंमलदार व एक हजार ५०० होमगार्ड तसेच २ एसआरपीएफ कंपनी, ४ बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके, क्युआरटी दोन पथके, आपत्कालिन परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशिक्षित १० कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने ८ ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

## 'दक्षिण'मध्ये नेत्यांची राजकीय कोंडी

**महिला आरक्षणाचा परिणाम; यंदाची निवडणूक ज्येष्ठ नेत्यांसाठी आरपारची**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी काढण्यात आलेल्या आरक्षणामध्ये दक्षिणमधील महिलांना अधिक संधी मिळाल्याने दक्षिणमधील दिग्गजांना फटका बसला आहे. स्वताच्या मतदारसंघात महिला व इतर प्रवर्गासाठी आरक्षण पडल्याने नेत्यांची कोंडी झाली आहे. जिल्ह्याचे किंगमेकर सुरेश हसापुरे, माजी पदाधिकारी डॉ. चनगोंडा हविनाळे, अशोक देवकते, दादा कोरे, अमर पाटील, मळसिध्द मुगळे, अण्णाराव बाराचारे, आप्पा सतुबर, यतीन शहा, भीमाशंकर बबलेश्वर यांचा समावेश आहे.

दक्षिणमध्ये सहा जिल्हा परिषद गट व बारा पंचायत समिती गण आहेत. आमदार सुभाष देशमुख व आमदार सचिन कल्याणशेट्टी या दोन भाजपा आमदारांचे या भागावर वर्चस्व आहे. तीन जि.प. गट व सात पं.स.गण दक्षिण विधानसभा मतदारसंघात आहेत, तर दोन जि.प. गट व पाच पं.स. गण अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात आहेत. त्यामुळे दोन आमदारांच्या मर्जीतील कार्यकर्त्यांना या निवडणूकीचे संधी मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या निवडणूकीत जिल्ह्याचे किंगमेकर म्हणून ओळख असणारे सुरेश हसापुरे यांचा भंडारकवठे मतदारसंघ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव झाल्याने त्यांची गोची झाली आहे. हसापूरे सध्या काँग्रेसपासून दूर गेले असून भाजपाचे आमदार कल्याणशेट्टी यांच्या संपर्कात आहेत. त्यामुळे आमदार कल्याणशेट्टी यांचे प्रभाव असणाऱ्या वळसंग गटाच्या ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढण्याची तयारी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र आमदार कल्याणशेट्टी यांनी वळसंग गटासाठी तरुण उमेदवाराला संधी देणार असल्याचे सांगत हसापूरे यांच्या उमेदवारीविषयी गोपनीयता ठेवली आहे. हसापूरे यांनी आ. कल्याणशेट्टी यांच्यासाठी बाजार समिती वर्चस्वासह सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून त्यांचे सहकार क्षेत्रात प्रवेश होण्यासाठी मार्ग सुकर केला आहे. आ. कल्याणशेट्टी हसापूरेंना उमेदवारी देऊन न्याय देतील का ? याकडे जिल्हावासियांचे लक्ष लागून राहिले आहे. हसापूरे यांचे होमपीच असणाऱ्या भंडारकवठे गटात आरक्षण अनूसूचित जमाती महिलासाठी राखीव झाल्याने त्यांची कोंडी झाली आहे. याच गटासाठी भाजपाचे चिटणीस यतीन शहा व भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर इच्छुक होते. मात्र, त्यांचीही निराशा झाली आहे. वळसंगसाठी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. मंद्रूप गट महिला सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव झाल्याने त्या जागेसाठी इच्छुक असणारे भाजपाचे मळसिध्द मुगळे, राष्ट्रवादीचे दादा कोरे, प्रशांत कडते यांची गोची झाली आहे. त्यामुळे मुगळे व कोरे काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे. इच्छुकांच्या कुटुंबातील महिला सदस्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. हत्तूर गटासाठी शिवसेनेचे अमर पाटील, आप्पा सतुबर, भाजपाचे डॉ. चनगोंडा हविनाळे, कॉंग्रेसचे माजी सभापती अशोक देवकते हे इच्छुक होते. मात्र, या गटासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण झाल्याने त्यांची कोंडी झाली आहे. हत्तूर मतदारसंघ सर्वसाधारण महिलासाठी राखीव असल्याने त्यांच्या कुटुंबातील महिलांना संधी मिळणार असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे त्यांच्यासाठी थोडी खुशी थोडी गम असल्यासारखे आहे. या मतदारसंघात माजी उपसभापती संदिप टेळे यांच्यासह अमर पाटील, डॉ. हविनाळे व देवकते यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांना उमेदवारी देणार असल्याचे सांगण्यात येते. बोरामणी गट सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित आहे. त्यामुळे इच्छुकांना संधी मिळणार आहे. मात्र आमदार कल्याणशेट्टी यांच्या निकटवर्तीय कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याचे निश्चित आहे. कुंभारी गट इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षित आहे. त्यामुळे इच्छुक असणाऱ्या पुरुष मंडळींमध्ये नाराजी आहे.

> **भाजपामध्ये इच्छुकांची गर्दी**
>
> दक्षिणमध्ये आ. देशमुख व आ. कल्याणशेट्टी यांच्या कार्यकर्त्यांमध्ये गटबाजी आहे. त्यामुळे भाजपामध्ये निवडणूकीसाठी असणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी आहे. मात्र गटबाजीमध्ये कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आलेगाव येथे एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
आलेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे एकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. हरिबा बळी चोरमुले (वय ५३, रा. आलेगाव, पो. कणबस, ता. दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी राहत्या घरी सिलिंगच्या हुकला हरिबा चोरमुले यांनी दोरीच्या सहाय्याने अज्ञात कारणावरून गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी हरिबा चोरमुले यांना गळफासातून खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजदीपसिंग भिसे यांनी हरिबा यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.